सुबोधसंग्रह.

(सुबोधपत्रिकेंत प्रसिद्ध झालेले कांहीं लेख).

मुंबईत

निर्णयसागरछापखान्यांत छापिलें.

किंमत सहा आणे.

सूचना.

या पुस्तकामध्यें छापिलेले लेख पूर्वी सुबोधपत्रिकेंत प्रसिद्ध झाले आहेत. एका बंधूंच्या सूचनेवरून त्यांचा येथें संग्रह करून ते पुस्तकरूपानें पुनः प्रसिद्ध करण्यांत येत आहेत.

मुंबई, ता. २१ मे १९०५.

सु० प० सं०

अनुक्रमणिका.

सुबोधसंग्रह.

१. विद्येचा सदुपयोग व दुरुपयोग.

घातला दुकान । देती आलियासी दान ॥ १ ॥
संत उदार उदार । भरलें अनंत भांडार ॥ २ ॥
मागत्याची पुरे । धणी आणिकांसी उरे ॥ ३ ॥
तुका ह्मणे पोतें । देवें भरलें नव्हे रितें ॥ ४ ॥

संतांचा उदीम उपदेशाची पेंठ । प्रेमसुख साटीं घेती देती ॥ १ ॥
तुका ह्मणे तेथें आणिक नाहीं परी । ह्मणोनि भिकारी झालों त्यांचा ॥ २ ॥

आपल्या चोहों बाजूंस काय चाललें आहे याजकडेस जर आपण आपली दृष्टि वळविली, तर पूर्वी नव्हत्या अशा ज्या कांहीं विशेष गोष्टी आपल्या ध्यानांत एकदम येण्यासारख्या आहेत त्यांमध्यें सध्यांचा विद्याप्रसार ही एक होय. पूर्वी, ह्मणण्यासारखी विद्या, जे कांहीं थोडेबहुत शास्त्री असत, त्यांजमध्येंच असे आणि नुसतें लिहिण्यावाचण्याचेंही ज्ञान फारच थोड्यांस असे. सध्यां विद्येचा प्रसार किती झाला आहे याचा जर डोळ्यांनीं प्रत्यय पाहिजे तर तोही परीक्षांच्या दिवसांत मुंबई शहर जेव्हां उमेदवारांनीं फुलून जातें तेव्हां मिळतो. नांवाजलेल्या लोकांचीं राजकीय विषयांच्या संबंधानें जेव्हां जाहीर सभेमध्यें भाषणें व्हावयाचीं असतात त्या वेळेस जो शाळांतील विद्यार्थ्यांचा श्रोतृसमाज जमतो त्यावरूनही असाच प्रत्यय मिळतो. याप्रकारें केवळ लिहिणें वाचणेंच नव्हे पण वक्तृत्वही जिकडे तिकडे पसरलेलें दिसतें. हें लिहिण्यावाचण्याचें ज्ञान व आपआपल्या शिक्षणाच्या मानानें कठिण किंवा सोपे ग्रंथ वाचून समजण्याची शक्ति, या कांहीं लहानसान गोष्टी नव्हत. यांची अत्यंत मोठी योग्यता आहे ह्मणूनच, जे देश विद्येच्या संबधानें सर्वांपेक्षां अगदीं पुढें गेले आहेत, त्यांमध्येंही, ज्यांनां शाळा किंवा कालेजें यांमध्यें जाऊन ज्ञानसंपादन करण्यास द्रव्यसामर्थ्य किंवा संधि नाहीं, अशांसही ज्ञानदान देण्याचे हजारो तऱ्हांचे यत्न सतत अव्याहत चालू आहेत. परंतु ज्या ज्या गोष्टी आपणांस साध्य आहेत त्यांचे नेहमीं दोन प्रकारचे उपयोग करण्यासारखे असतात. एक सदुपयोग व दुसरा दुरुपयोग. हातांनां कारणाशिवाय कोणाच्या थोबाडींत देतां येतें किंवा कोणाचें कामही करितां येतें. जिव्हेनें गोड बोलून कोणाचेंही समाधान करितां येतें किंवा कारणाशिवाय

कठोर शब्द बोलून कोणाचेंही मन दुखवितां येतें. विद्येचीही गोष्ट तशीच आहे. मोठ्या गोष्टींत विद्येपासून अभिमान, वितंडवादीपणा, वगैरे वाढतात; लहान गोष्टींत लावण्यांचीं पुस्तकें वगैरे अश्लील ग्रंथांचें वाचन अभ्यास हीं वाढतात. वाचण्याचें ज्ञान नसतें, तर लावण्यांचें ज्ञान करून घेण्यास दुसऱ्याची आवश्यकता असल्यामुळें थोडीशी अडचण पडली असती, ती मात्र या ज्ञानानें दूर झाली. ह्मणून जे या प्रकारचें ज्ञान लोकांस करून देतात त्यांचें हेंही कर्तव्य आहे कीं त्या ज्ञानाचा कोणत्या प्रकारें उपयोग करावा हें, सदुपदेशानें, चांगल्याची गोडी लावून, सद्वर्तनानें किंवा अन्य ज्या तऱ्हेनें लोकांवर अधिक शुभ परिणाम होईल त्या तऱ्हेनें, दाखवून द्यावें.

तर विद्येचा सदुपयोग कोणता? कोणत्याही वस्तूची मनुष्यास किती किंमत किंवा तिचा श्रेष्ठ उपयोग तो कोणता हें ठरविण्यास, आपलें जगामध्यें जें कर्तव्य त्यास ती कितपत सहायभूत होते व कोणत्या प्रकारें उपयोग केला असतां ती अत्यंत सहायभूत होते, याचा विचार केला पाहिजे. तर आपल्यास जगामध्यें येऊन काय संपादिलें पाहिजे? ईश्वरसिद्धि किंवा आपली आध्यात्मिक उन्नति हीच. ह्मणून या संपादनीय अर्थाच्या सिद्ध्यर्थ ज्या मानानें जी गोष्ट आपल्यास साक्षात् किंवा परंपरेनें सहायभूत होईल त्या मानानें तिचें आह्मांस महत्त्व; व जो उपयोग केला असतां आपल्यास अधिक सिद्धि होईल तो तिचा श्रेष्ठ उपयोग. या खऱ्या आत्महिताची ज्या मानानें ती घातक होईल त्या मानानें ती त्याज्य. तर वर दिलेल्या तुकोबांच्या वचनांमध्यें दर्शविलेल्या रीतीप्रमाणें विद्येचा उपयोग केला असतां, तो सदुपयोग होईल. आपल्या उक्तींच्या योगें व चरित्राच्या योगें साधुसंतांनीं उपदेशरूपी अन्नाचें छत्र घातलें आहे. ज्याला त्याला पुरे इतकें अन्न त्यांच्याकडेस आहे. एकमेकांविषयीं, जीवजंतूंविषयीं व देवाविषयीं जें प्रेम त्या प्रेमापासून होणारें सुख त्यांच्यापाशीं आहे. तें किती जरी त्यांच्याकडेस येऊन लोकांनीं नेलें तरी तें संपावयाचें नाहीं. त्यांचें भांडार अनंत आहे, त्यांचें पोतें कधीं रिकामें व्हावयाचें नाहीं. म्हणून तुकोबा त्यांजपाशीं भिकारी होऊन भीक मागावयास गेले. आम्हींही तसेंच केलें पाहिजे. आह्मीं त्यांजपाशीं, तुकोबापाशीं व इतर जे साधु तुकोबांस माहीत नव्हते त्यांजपाशीं गेलें पाहिजे. पण ही भीक मागण्याचा प्रकार कोणता? विद्येचा उपयोग करून शुद्ध भावानें, सरळपणानें, श्रद्धेनें व आस्थेनें त्यांचीं चरित्रें व वचनें वाचणें व त्यांचें मनन करणें हाच. अन्य ठिकाणीं तुकोबांनीं ह्मटलें आहे कीं:—

घेसी तरी घेईं संतांची हे भेटी । आणीक ते गोष्टी नको मना ॥ १ ॥
सर्व भावें त्यांचें देव भांडवल । आणीक ते बोल न बोलती ॥ २ ॥
करिसील तो करी संतांचा सांगत । आणीक ते मात नको मना ॥ ३ ॥
बैससी तरी बैस संतांच मधीं । आणीक ते बुद्धि नको मना ॥ ४ ॥

जासी तरी जाईं संतांचिया गांवा । होईल विसांवा तेथें मना ॥ ५ ॥
तुका ह्मणे संत सुखाचे सागर । मना निरंतर धणी घेईं ॥ ६ ॥

ज्या अर्थीं संतांची साक्षात् भेट क्वचितच होते त्या अर्थीं या अभंगामध्यें सांगितल्या-प्रमाणें वागावयाचें, तें वर सांगितलेल्या प्रकारेंच. इतकें मात्र समजूं नये कीं ग्रंथांमध्यें उपदेश प्रत्यक्ष रीतीचाच असला पाहिजे. अप्रत्यक्ष रीतीचाही उपदेश ग्रंथांतरांमधून पुष्कळ मिळण्यासारखा आहे. ज्या ग्रंथामध्यें प्रत्यक्ष रीतीचा उपदेश नसतां, जो वाचून आपल्या शुद्ध मनोभावांचा विकास होतो, अशुद्ध मनोभाव विरून जातात, शुद्ध विचार, उच्चार व आचार यांजविषयीं अंतःकरणाची साहजिक प्रवृत्ति होते, व अशुद्ध विचार उच्चार, व आचार, यांचा स्पर्शही आपणांस नसावा असा साहजिक तिटकारा मनामध्यें उत्पन्न होतो, त्या ग्रंथापासून अप्रत्यक्ष रीतीचा बोध होतो. व पुष्कळदां अशा अप्रत्यक्ष प्रकारच्या बोधाचा लोकांच्या मनांवर विशेष शुभ संस्कार होतो. फार कशाला? आपलें आपण इहलोकींचें कर्तव्य जर या देहाच्या द्वारें करीत असलों तर त्या कार्यासाठीं त्या देहास अधिक समर्थ करण्यास आवश्यक जें आरोग्य तें आरोग्य कसें राखावें हें ज्यांमध्यें सांगितलें आहे, असेही ग्रंथ यांमध्यें गणले पाहिजेत.

ज्या विद्येचा वर सांगितलेल्या प्रकारचा उपयोग केला जात नाहीं, आपलें या जगांतील सर्वांत श्रेष्ठ कर्तव्य करण्याकडेस साक्षात् किंवा परंपरेनें ज्या विद्येची योजना केली जात नाहीं, ती विद्या असून नसून सारखी. "काय ग्रंथ पढोन एका ब्रह्मज्ञानावांचोन ?" ज्या विद्येचें पर्यवसान आपल्या शाश्वत कल्याणाच्या ठायीं, आपल्या आध्यात्मिक उन्नतीच्या ठायीं केलें जात नाहीं, ती विद्या व्यर्थ. ऐहिक जरी कांहीं अर्थ तिजपासून प्राप्त झाला तरी त्या अर्थाची परमार्थापुढें कांहींच किंमत नाहीं.

परंतु सध्यां जर पाहिलें तर विद्येचा फारच थोडा या प्रकारचा उपयोग केला जात आहे. जो केला जात आहे तो हा. ज्याला लोकांमध्यें मानमान्यता हवी अशी वाटते तो आपला विद्याव्यासंग पुढें कायम ठेवतो, परंतु केवळ मानमान्यतेसाठींच. व असाही पुरुष एखादाच. परंतु बाकीचे येथून तेथून सगळे विद्येच्या बळावर जो रोजगार चालवावयाचा, तो एकदां प्राप्त झाल्यावर, तिजपासून, जितकें अलिप्त रहावेल तितकें, अलिप्त रहाण्याचा जणूं काय बुद्ध्या यत्नच करितात. परंतु येथपर्यंत विद्येचें वैयर्थ्यच झालें. कित्येक विद्वान् नांवाजलेले गृहस्थ असे आहेत कीं ते विद्येचा दुरुपयोगच करितात. लोकांच्या मनासारखें बोलून त्यांजपासून वहावा मिळवावयाची, त्यांच्या डोळ्यांत धूळ टाकून, हळूहळू आपल्याही डोळ्यांत ती उडेशी करून, आपला व त्यांचा नाश करून घ्यावयाचा, याच उद्देशानें जणूं काय त्यांनीं विद्येचें अर्जन केलें, अशा रीतीनें ते नेहमीं वागतात. रूढीमुळें आपली व समाजाची कितीही आध्यात्मिक व ऐहिक हानि व नाश होत असतां, ती हानि नव्हे, तो नाश नव्हे असें, हरएक ठिकाणीं चार चार तास व्याख्यानें देऊन, प्रतिपादन करण्याकडेस ते

आपल्या विद्येचा उपयोग करितात. त्यांना कधीं कधीं–निदान जेव्हां अशा प्रकारच्या उद्योगास ते प्रारंभ करितात आणि त्यांच्या स्वतःच्या डोळ्यांत अजून धूळ उडालेली नसते तेव्हां तरी–कळत नाहीं असें नाहीं. "अहो तुह्मीं असें असें म्हटलेंत, तें तुम्हांला खरें वाटतें का ? " असें जर कोणी जाऊन त्यांस एकांतीं विचारलें तर ह्मणतात कीं, "अहो तें आह्मांस खरें वाटत नाहीं हें खरें, परंतु आपण जर लोकांस वस्तुस्थिति काय आहे ती सांगितली तर आपल्या सनातन वैदिकधर्मावरील लोकांची श्रद्धा उडेलना." ह्मणजे पूर्वीच्या ऋषींनीं सांगितलेल्या शुद्धधर्माच्या कितीही जरी उलट एखादी गोष्ट असली, ज्यांस आपण तोंडानें पूज्य मानतों अशा साधुसंतांनीं तिची कितीही निंदा केली असली तरी, ती केवळ कांहीं काळच्या रूढीस अनुसरून आहे ह्मणून, ती सत्य व ग्राह्य आहे व वैदिकधर्मांत सांगितली आहे असें, लोकांकडून वाहवा मिळविण्याकरितां, प्रतिपादन करावयाचें; व दुसरा कोणी कांहीं हिताची गोष्ट सांगत असल्यास व ती ऋषींच्या जुन्या शुद्धधर्मास संमत असूनही केवळ रूढीच्या मात्र विरुद्ध असल्यास, ती धर्माच्या विरुद्ध असें लोकांस सांगून त्यांस तिजपासून पराङ्मुख करावयाचें, यांविषयीं जणूं काय त्यांनीं विडाच उचलला आहे. कोणामध्यें जर सोशिकपणा असला आणि आपला हात खरोखरी जळत असतां त्यानें जरी ह्मटलें कीं माझा हात जळत नाहीं, माझ्या हाताला शीतच स्पर्श होत आहे, तरी त्याचा हात जळणार तो जळणार, जळावयाचा कांहीं रहाणार नाहीं. तद्वत् चाललेला अनाचार व त्यापासून होणारा नाश हीं तुह्मी नाकबूल केलींत, तरी त्यांची गति कांहीं खुंटत नाहीं, उलट मुद्दाम डोळेझांक केल्यामुळें ती अधिकच वेगानें वाढूं लागेल. यास्तव जोंपर्यंत डोळे उघडून, प्रांजळपणें वाईट तें वाईट असें, व चांगलें तें चांगलें असें, कबूल करून, आपण लोकांस त्याप्रमाणें दाखवून, त्यांस व आपणांस वाइटाच्या त्यागाविषयीं व बऱ्याच्या ग्रहणाविषयीं यत्न करण्यास प्रवृत्त तुह्मी करीत नाहींत, तोंपर्यंत आपला व लोकांचा नाश करण्याकडेस तुह्मी आपल्या विद्येचा उपयोग करीत आहां व आपल्या आणि लोकांच्या नाशाची जबाबदारी व पातक आपणांवर घेत आहां.

---

२. ऐहिक स्थिति.

क्षणभंगुर नरतनु जाइल राजहंसा । ओढ जळते घरचा वांसा ॥ ध्रु० ॥ जाति लव पळ घटिका काळ लेखा करितो । दिनरजनी मापें भरितो । माय ह्मणती माझा पुत्र थोर होतो । काळ आयुष्य हिरवुनि नेतो ॥ चाल ॥ यासाठीं सावध व्हावें । श्रीहरिला शरण रिघावें । पाहुनि पाउल टाकावें । आप पर एकचि जाणावें ॥ जाणुनी लीन असावें हरिच्या दासां ॥ ओढ जळते० ॥

इहलोकींचें जीवित शाश्वत नाहीं, क्षणभंगुर आहे, हें सर्वांस ठाऊक आहे. समज न आलेलीं मुलें सोडून ही गोष्ट माहित नाहीं असा एकही मनुष्यप्राणी सांपडावयाचा नाहीं. या गोष्टीचा डिंडिम सदा आपल्या कानांमध्यें प्रत्यक्ष वाजत आहे. मोठमोठे ग्रंथकार व साधुसंत याविषयीं नेहमीं आह्मांस जागृत करीत आहेत. जीविताचा भंग झाला असें ह्मणण्यास त्याचा पूर्णपणें नाशच झाला पाहिजे असें कांहीं नाहीं. जीवंत असूनही जर आपले हातपाय हालतनासे झाले, ज्या कार्यासाठीं जीविताचा उपयोग करावयाचा तें कार्य करण्यास जर आपण असमर्थ झालों, तरीही जीविताचा वस्तुतः भंगच झाला म्हणावयाचा. तरी या प्रकारें वस्तुतः व शब्दशः सुद्धां जीवित क्षणभंगुर आहे. घरानें ज्या प्रकारें पेट घ्यावा आणि तें जळून केव्हां खाक होईल याचा नेम नसावा, तशा प्रकारची जीविताची स्थिति आहे. अशा प्रसंगीं "ओढ जळते घरचा वांसा." एकच वांसा कां होईना, परंतु तितका तरी ओढून बाहेर काढ. मुळींच कांहीं हातीं न लागण्यापेक्षां तितका वांसाच हातीं लागला तरी बरें. व खरोखरीच्या घरास आग लागली असतां कोणीं सांगितल्याशिवाय याप्रमाणें लोक करितातही; परंतु या जीविताच्या संबंधानें हा विचार फारच थोड्यांस सुचतो, किंवा फारच थोडे लोक याप्रमाणें जळते घरचा वांसा ओढितात.

जर कोणीं आपणांस प्रिय अशी कांहीं वस्तु दिली व सांगितलें कीं, ही तुजजवळ असे तोंपर्यंत तूं पाहिजे तो हिचा उपयोग कर, परंतु तुझ्याकडून मी ती परत केव्हां घेईन तें मात्र तुला सांगणार नाहीं, तर ती जोंपर्यंत आपणांकडे आहे तोंपर्यंत उद्यांचा भरंवसा न धरितां तिचा जितका उपयोग करून घेतां येईल तितका किती दक्षतेनें आपण करून घेऊं? कोणत्या रीतीनें उपयोग केला असतां आपणांस अधिक लाभ किंवा सुख प्राप्त होईल, याचा पावलोपावलीं विचार करून त्या विचारास अनुसरूनच वागूं. जो असें करणार नाहीं त्याला आपण सर्व मूर्खांमध्यें गणूं. या मानव देहाची स्थिति अशीच आहे, ह्मणून यालाही हाच नियम लागू. ह्मणूनच प्रत्येक पाऊल टाकतेवेळीं

पाहून टाकिलें पाहिजे, व तसें पाऊल टाकलें तरच जळत्या घरचा वांसा ओढला असें होईल. आपणांस कोठें जावयाचें आहे, कोणत्या मार्गानें गेलें पाहिजे, मार्गांत कोठकोठें खांचखळगे आहेत, व कोठकोठें मार्गास भलतीकडेस नेणारे आडवे फांटे फुटतात, त्याकडेस नेहमीं दक्षतेनें लक्ष्य ठेविलें पाहिजे. कामक्रोधादि मोठमोठीं भयंकर सावजें प्रत्येक क्षणीं आपल्यावर तुटून पडण्यास पहात आहेत. अनेक दुर्गुण सद्गुणांचें पांघरूण घेऊन किंवा त्यांचा आधार धरून आम्हांस वश करून घेऊं पाहतात. ज्या वास्तविक रस्त्यानें आपण नेहमीं जातों, ज्यामध्यें अडचणी किंवा खांचखळगे मुळींच नाहींत असें आपण पाहतों, त्या रस्त्यानेंही, आपणांस कोणी डोळे झांकून चाल किंवा जिकडे जावयाचें तिकडे पाठ करून चाल ह्मणून सांगितलें तर, एक दोन पावलांपेक्षां अधिक टाकण्याची भीति वाटते. परंतु परलोकास जावयाचा जो मार्ग त्या मार्गामध्यें वर सांगितल्याप्रमाणें अडचणी व भीतीचीं कारणें जरी असलीं, आणि तीं कशीं, तर मोठमोठ्या ज्ञानी पंडितांस व साधुसंतांसही वाटवून जाणें अत्यंत दुष्कर, तरी सुद्धां आम्ही आपले डोळे झांकून निःशंकपणें सतत चालत आहों. ऐहिक विषयांच्या संबंधानें आपणांस कोणत्या वस्तूचें संपादन करावयाचें आहे हें जो सतत आपल्या दृष्टीपुढें ठेवित नाहीं, व तिच्या संपादनार्थ योग्य उपायांची योजना व दृढ यत्न करीत नाहीं, त्यास लोक नांवें ठेवितील. परंतु एका अर्थीं, त्या वस्तूचें विशेष महत्त्व त्या मनुष्यास वाटत नसेल, आणि ती प्राप्त न झाली तरी त्याला कांहीं क्षति वाटण्यासारखी नसेल ह्मणून, ती प्राप्त न झाली तरी त्याची त्यामध्यें कोणत्या प्रकारची हानि नाहीं. परंतु पारमार्थिक गोष्टींच्या संबंधानें तसा प्रकार नाहीं. आपणांस कोठें जावयाचें आहे, हें सतत लक्षांत न ठेविल्यास व तिकडेस जाण्यास योग्य उपायांची योजना व दृढ प्रयत्न न केल्यास, आह्मांस ठिकाणच्या ठिकाणीं राहतां येणार नाहीं. या संसाराच्या लहरी आम्हांस भलत्याच दिशेस वाहून नेऊन भलत्याच तडीस लावितील. आम्हीं डोळे झांकले असल्यामुळें, एकदम जरी मोठ्या वेगानें त्या लहरींनीं आम्हांस भलत्याच दिशेस नेलें, तरी आमच्या ध्यानांत यावयाचें नाहीं. मग जर हळूहळू नेलें तर ध्यानांत यावयाचा संभव अगदींच कमी. आणि वास्तविक पाहिलें असतां भलत्या मार्गानें जीं आपलीं पाउलें पडतात, तीं हळूहळूच पडूं लागतात. एकदम कोणी मोठें असत्कृत्य करावयास धजत नाहीं. लोकांच्या तें ध्यानांत येईल ह्मणून आपण सावधगिरीनें वागतों. तसेंच, धर्माचें बीज आपल्या अंतःकरणामध्यें आहे व पूर्वींचा संस्कार मनावर आहे, ह्मणून एकदम तितकें धैर्य होत नाहीं. यास्तव आपणांस कोणते दुर्गुण व कोणतीं व्यसनें कसकशीं जडलीं, याचा जर विचार केला, तर बहुतकरून आपणां सर्वांस दिसून येईल कीं, त्यांचा उगम फारच क्षुल्लक, ध्यानांत सुद्धां न येण्यासारखा होता. जें आपल्याकडून पहिलें गैर वर्तन झालें, त्यापासून इतका अनर्थ होईल, त्यामध्यें इतका विकास पावण्याची शक्ति होती, हें आपल्या स्वप्नींही त्या वेळीं आलें नसेल; आणि आतां

तर संवईमुळें त्या दुर्गुणांतून किंवा व्यसनांतून सुटण्याची कितीही प्रबळ इच्छा आपली झाली तरी सुटणें फार कठीण. तर याचें कारण, पाहून पाऊल टाकण्याची आपली चाल नाहीं हें. सर्व लोकांनीं पाहून जर पाऊल टाकिलें, तर ज्या ज्या बाबतींत जी जी सुधारणा मनुष्यांमध्यें झाली पाहिजे ती ती लागलीच होईल. जे जुन्या मताचे आहेत व कर्में उदंड करितात, त्यांनीं विचार करावा कीं, "आह्मीं कर्में करितों खरीं, परंतु आह्मांस यत्किंचित् तरी त्यापासून परब्रह्माचें वर्म कळूं लागलें आहे काय? यत्किंचित् तरी आपल्या अंतरात्म्याची उन्नति त्यांपासून झाली आहे काय? व नित्यनैमित्तिक कर्मांव्यतिरिक्त जो आचार तो शुद्ध करण्याविषयीं आपली प्रवृत्ति त्यांपासून थोडी तरी बलवत्तर झाली आहे काय?" जर ते असा विचार करतील तर त्यांस दिसून येईल कीं, या प्रकारचा शुद्ध परिणाम, ज्या तऱ्हेचीं आपण कर्में करितों त्यांपासून, कांहींच होत नाहीं, व होण्याचा संभवही नाहीं; आणि धर्म व कर्म, परमार्थ व संसार यांचा समेट करण्याचें त्यांच्या मनांत थोडें तरी येईल. सामाजिक सुधारणेस हीच गोष्ट लागू आहे. कित्येक ह्मणतात कीं सुधारणा हळूहळूच व्हावयाची. खरें आहे. पण तें कां? जनसमूहामध्यें पाहून पाऊल टाकणारे असे लोक फारच थोडे आहेत ह्मणून. परंतु अशा प्रकारें जनसमूहांत सुधारणा हळूहळूच होणार, ह्मणून आपण आपल्या संबंधाचीही सुधारणा हळूहळूच केली पाहिजे असें कांहीं नाहीं. ज्याला कळतें, त्याच्यावर कळूं लागल्यापासूनच पाहून पाऊल टाकण्याविषयींची जबाबदारी येते. त्यानें जर ह्मटलें कीं, मी आपल्या संबंधाचीही सुधारणा हळूहळूच करीन, तर तो आपलें कर्तव्य करावयास चुकला असें ह्मटलें पाहिजे. आतां असे खरें आहे कीं, आपल्या अंतरात्म्याची उन्नति कष्टसाध्य आहे व तावडतोब होणारी नव्हे. याविषयीं स्वतःचा व साधुसंतांचा अनुभव साक्ष देत आहे. परंतु तसें आहे ह्मणून ती साध्य करून घेण्याचा यत्नही मी हळूहळूच करीन असें ह्मटलें असतां चालणार नाहीं. उलट सर्व बळ खर्चून तिच्या सिद्ध्यर्थ यत्न केला पाहिजे. सुधारणा हळूहळू होणारी आहे हें ध्यानांत येवढ्यापुरतेंच ठेवावयाचें कीं आह्मीं निराश होऊन आपले यत्न मुळींच शिथिल होऊं देऊं नयेत.

३. लोकलाज.

नको येऊं लाजे होय तूं परती । भजों दे श्रीपती सखा माझा ॥ १ ॥
तुझे संगतीनें मोठा झाला घात । झालों मी अंकित दुर्जनांचा ॥ २ ॥
तुका ह्मणे दुष्टे घेइन काठीवरी । धनी सहाकारी राम केला ॥ ३ ॥

आजिवरि होतों तुझे सत्तेखालीं । तोंवरी तों केली विटंबना ॥ १ ॥
आतां तुज राहों नेदीं या देशांत । ऐसा म्यां समर्थ केला धणी ॥ २ ॥
सापें रिग केला कोठें बाळपणीं । होतीसी पापिणी काय जाणों ॥ ३ ॥
तुका ह्मणे म्यां हा बुडविला वेव्हार । तुझेची ढोंपर सोलावया ॥ ४ ॥

मनुष्याच्या आध्यात्मिक उन्नतीच्या किंवा परमेश्वरप्राप्तीच्या आड येणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. धन, ऐश्वर्य, कीर्ति, विद्या वगैरे अनेक ऐहिक विषय त्याच्या चित्तास त्या गोष्टींतून काढून आपल्याशीं मोठ्या जोरानें ओढून घेतात. काम, क्रोध वगैरे अनेक मनोविकार जोरानें त्याला अशा प्रकारचें आचरण करावयास लावितात कीं त्यामुळें त्याला परमेश्वरप्राप्ति न होतां उलट तो परमेश्वरापासून वेगानें अधिक दूरच जातो. या विकारांच्या योगें मनुष्यास एका प्रकारची अंधता येऊन आपण काय करीत आहों याचा मनांत विचार मुळींच न येतां तो त्यांच्या आवेशामध्यें अनन्वित किंवा अघोर कृत्यें करितो. या कारणानें त्या विकारांचा व्यापार लोकांस नेहमीं ढळढळीत दिसत असल्यामुळें, त्यांच्या समुदायास लोकांमध्यें षड्रिपु अशी प्रसिद्ध संज्ञाही प्राप्त झाली आहे. लोकलाजेमुळें कांहीं अशीं अनन्वित कृत्यें केलेलीं फारशीं आढळण्यांत येत नाहींत. ह्मणून परमेश्वरभक्तीच्या आड येणाऱ्या गोष्टींमध्यें तिची गणना केलेली फारशी प्रचारांत दिसत नाहीं. परंतु तीही आपल्या उन्नतीच्या संबंधानें अत्यंत घातुक आहे आणि तुकोबा वरील अभंगांत तेंच दर्शवितात. परंतु अशी शंका मनांत येते कीं चांगलें करण्यामध्यें लाज ती कोणती आणि ती कां म्हणून वाटावी. पण प्रकार तसा आहे खरा. चांगलें करणाऱ्यांची चांगलें करण्याबद्दल लोक थट्टा करितात आणि हा प्रकार कोणत्या थरास जाऊन पोंचतो हें एका लहानशा उदाहरणानें स्पष्ट होतें. ब्राह्मणानें सुरापान केलें असतां त्यास देहान्त प्रायश्चित्तावांचून दुसरें प्रायश्चित्त हिंदुशास्त्रांमध्यें सांगितलेलें नाहीं. परंतु सध्यां अशी स्थिति झाली आहे कीं, ज्याला आधुनिक शिक्षण प्राप्त झालें आहे अशा एखाद्या ब्राह्मणानें ह्मटलें कीं आपण सुरापान करीत नाहीं, तर " तूं ब्राह्मसमाजाचा सभासद झाला आहेस काय ? " ह्मणून लोक त्याला पुष्कळदां थट्टेनें विचारितात. तेव्हां, ज्या गोष्टीची खरोखरी प्रौढि वाटावी, तिची प्रौढि न वाटतां उलट लाज वाटते असा लोकांचा नेहमींचा प्रकार झाला आहे.

याचें कारण असें कीं सर्व जग एका मार्गानें चाललें आहे. ज्याला ज्याला जो जो ऐहिक विषय प्रिय तो तो त्या त्या विषयाच्या मागें लागला आहे. त्या विषयाचें संपादन करण्याच्या उद्योगामध्यें बऱ्यावाइटाकडे कोणीही लक्ष्य पुरवीत नाहीं. व कित्येक आपणांस ज्ञानी ह्मणविणारे लोक असेंही सांगतात कीं, प्रसंग आला असतां न्याय, नीति, धर्मशास्त्रें, वगैरे सर्व कांहीं एकीकडेस गुंडाळून ठेवावें असें श्रुति सुद्धां सांगते; आणि शिवाय ह्मणतात कीं श्रेष्ठ लोक त्याप्रमाणें आजपर्यंत करीतही आले आहेत. तेव्हां अर्थातच ज्याला ईश्वराची प्राप्ति करून घ्यावयाची असेल, त्याची जाण्याची दिशा, अगदींच भलत्याच दिशेस झुकलेलें जें हें जग, त्याच्या दिशेच्या प्रत्यक्ष उलट असली पाहिजे. त्याचें बोलणें, चालणें, वगैरे सर्व प्रकारचें वर्तन इतर लोकांच्या वर्तनापासून अत्यंत भिन्न असतें, ह्मणून, पूर्वी कधीं न पाहिलेल्या अशा अतिविलक्षण वस्तूकडे जसें तटस्थ होऊन पहावें त्याप्रमाणें, लोक त्याजकडेस पाहूं लागतात; व विलक्षण वस्तु पाहिली ह्मणजे थट्टा करण्याचा जो साधारण प्रघात आहे त्यास अनुसरून ते त्याची थट्टाही करूं लागतात. आतां लोकांचे डोळे 'येन केन प्रकारेण' आपल्याकडेस लागावे म्हणून मुद्दाम जो कोणी कांहीं विलक्षण प्रकार करितो, त्याला त्याप्रकारें लोकांचे डोळे आपल्याकडेस लागले ह्मणजे समाधानच वाटतें. परंतु साधारणतः, आपल्या ठिकाणीं जणूं काय एक कांहीं विलक्षण गोष्ट आहे अशा प्रकारें, लोक आपल्याकडेस टेहेळूं लागले ह्मणजे पुष्कळांस ती स्थिति दुःसह होते. कोठें पहावें तें त्यांस समजत नाहीं व ते अगदीं गोंधळून जातात. आपआपल्यांत कुजबुजून कोणा तरी माणसाकडे एकसारखें पुष्कळांनीं पाहणें, यासारिखा त्यास खजील करण्याचा दुसरा कोणताही उपाय नाहीं. मनुष्यास एखादे वेळेस लोकांनीं केलेली हालअपेष्टा पुरवेल, प्रसंगविशेषीं सर्व शक्ति वेंचून व मोठा धीर करून मोठ्या श्रमाचें किंवा शौर्याचें नेटासरशीं तो काम करूं शकेल; परंतु उत्साह पळवून टाकणारी लोकांनीं पावलोपावलीं आपल्याकडेस लाविलेली टक त्याला दुःसह होते. लोकलाजेचा हा असा प्रकार आहे ह्मणून तुकोबा ह्मणतात कीं तिनें आपली विटंबना केली. ही खरी विटंबना. मनांत योग्य वाटते गोष्ट एक व लोकलाजेमुळें आपण करितों दुसरी. काम, क्रोध, वगैरे मनोविकारांच्या वेळीं एका प्रकारची अंधता तरी अंगीं येते, व तिजमुळें योग्यायोग्यतेचें भान राहात नाहीं. परंतु लोकलाजेच्या प्रसंगीं तें भान असतें. अमुक कांहीं गोष्ट करणें आपलें कर्तव्य असा जेव्हां मनांत विचार येतो तेव्हां, लोक मला नांवें ठेवतील, हा विचार मनांत येऊन आपली वृत्ति डळमळीत होते. या विटंबनेचा आपल्याशीं आध्यात्मिक संबंध आहे. लोकांनीं केलेल्या विटंबनेच्या किंवा उपहासाच्या योगें ही जी दुसऱ्या प्रकारची आपली विटंबना होते, ती जर होऊं दिली नाहीं, तर लोकांनीं केलेली विटंबना केवळ बाह्य आहे. तिचा संबंध देहाशींच आहे. फार झालें तर देह आहे तोंपर्यंतच कायती ती आह्मांस जाचणार व कदाचित् तेथपर्यंत सुद्धां ती जाचणार नाहीं. आपल्यामध्यें खऱ्या भक्तीचा अंश आहे असें जर पाहिलें तर कित्येक लोक उलट कांहीं काळानें आपली स्तुति गाऊं लागतील, आणि

ती इतकी कीं तिजमुळें आपल्या वाटेला फांटे फुटण्याचा संभव आहे. तसेंच ही विटंबना आपल्यावर अवलंबून नसल्यामुळें ही टाळण्याचें आपल्या स्वाधीन नाहीं. कांहीं कारण नसतांही ही विटंबना कोणकोणाची कधीं कधीं होत असते. परंतु दुसरी विटंबना टाळण्याचें आपल्यावर अवलंबून आहे.

शिवाय कोणताही ऐहिक लाभ प्राप्त करून घ्यावयाचा असला ह्मणजे लोकलाजेस झिड-कारून आह्मी दूर करितों. परमार्थाचा संबंध जेव्हां येतो तेव्हां मात्र तिचा पगडा आपल्यावर बसूं देतों. या लोकलाजेस आपल्या अंतःकरणांतून हद्दपार करण्याकरितां तुकोबांनीं सर्वसमर्थ जो परमेश्वर त्यास आपला धनी व सहाकारी केला. लोकलाजेस जे गणतात त्यांचा धनी लोक. ज्या धन्याचें चालणें, बोलणें व करणें एका वेळेस एक व दुसऱ्या वेळेस दुसरें, अशा धन्याच्या सेवेस होतां होईल तों आपण राहात नसतों. पण 'लोक' अशा प्रकारचा धनी आहे असा आपणांस पदोपदीं प्रत्यक्ष अनुभव येत असतांही त्यांस आह्मी आपण होऊन आपला धनी करून घेतों. परंतु या धन्यास तुकोबांनीं सोडून देऊन देवास जसें आपला धनी केलें तसें आपणांस केलें पाहिजे. वस्तुतः देव आपला धनी व सहाकारी नेहमींच आहे. परंतु त्याचें व आपलें हें नातें ध्यानांत वागवून त्याची प्रेमानें व निष्ठेनें सेवा केली पाहिजे. दुसऱ्या कोणा धन्याची सेवा जर या सेवेच्या आड येईल तर ती सोडून दिली पाहिजे. आपलें कोणावर जर निःसीम प्रेम असलें, तर त्याचें ज्या कार्यानें हित होईल तें करण्यास आपण हाल, कष्ट, स्तुति किंवा निंदा यांस कांहींच जुमानीत नाहीं. ह्मणून देवास जर आपला धनी केलें, त्याजवर जर आपलें प्रेम जडेल असें केलें, तर लोकलाज सहजच दूर होईल.

---

४. निंदास्तुति.

भाव धरा रे । आपुलासा देव करा रे ॥ ध्रु० ॥ कोणी काय ह्मणो यासाठीं । बळकट प्रेम असावें गांठीं । निंदास्तुतिवर लावुनि कांटी । मीतूं हरा रे ॥ आपुलासा० ॥

या जगामध्यें आपण जीं सर्व कृत्यें करितों किंवा करण्याविषयीं प्रवृत्ति होत असतां करीत नाहीं, तीं करण्यामध्यें किंवा न करण्यामध्यें आपला साधारणपणें हेतु काय असतो याचा विचार केला ह्मणजे दिसून येईल कीं आपली जगीं स्तुति व मान्यता व्हावी, निंदा व अवहेलना होऊं नये, असा बहुशः हेतु असतो. कोणीही वाईट मार्गानें जात असल्यास आपण त्यास शुद्धीवर आणण्याकरितां बोध करितों, त्या वेळीं त्यास सांगतों कीं "बाबारे, तूं अमुक अमुक गोष्ट करीत आहेस, तें ठीक नाहीं. तुला लोक नांवें ठेवितील, तुझ्या तोंडावर ते थुंकतील. परंतु तूं जर आपला सध्यांच्या वर्तनाचा क्रम सोडून देशील व अमुक अमुक रीतीनें वागशील तर तुला चारचौघांत मान मिळेल." लहान मुलांनांही चांगल्या मार्गास लावण्याचा आह्मी याच प्रकारें यत्न करितों. परंतु स्तुति व निंदा यांपासून होणारीं आनंद व दुःख हीं केवळ मनानेंच ग्राह्य आहेत. ह्मणून स्तुति व निंदा हीं सर्वांचींच प्रवर्तक कारणें होतात असें नाहीं. कारण केवळ मनानें संवेद्य आनंद व दुःख यांची कल्पनाही पुष्कळांस नसते व कल्पना असली तरी त्यांचें मोल फारसें वाटत नाहीं. त्यांचीं प्रवर्तक कारणें लोकांपासून आपलें होणारें हित किंवा छळ हीं होतात. परंतु जसा स्तुतीपासून मनास आल्हाद होतो तसा लोकांकडून होणाऱ्या हितापासून आपल्या देहास होतो व तोच प्रकार निंदा व छळ यांचा. व लोकांमध्यें आपल्याविषयीं जे भाव उत्पन्न झाले ह्मणजे ते आपली स्तुति किंवा निंदा करितात तेच भाव उत्पन्न झाले असतां ते आपलें हित किंवा अहित करण्यास प्रवृत्त होतात. ह्मणून लोकांपासून होणारें आपलें हित किंवा छळ यांस स्तुति व निंदा यांचेंच रूपान्तर किंवा प्रकारान्तर असें धरलें असतां चालेल. तेव्हां स्तुति व निंदा हीं आपलीं प्रवर्तक ज्या रीतीनें होतात त्या रीतीनें तीं प्रवर्तक होणें किंवा त्यांस होऊं देणें, हें ठीक आहे कीं काय व त्यामुळें आपलें खरें हिताहित कितपत होतें याजविषयीं आपण अवश्य विचार केला पाहिजे.

जोंपर्यंत मनुष्याचा स्वभाव सध्यां आहे तसा आहे तोंपर्यंत स्तुतिनिंदेकडेस लक्ष्य दिल्यापासून जगाचें थोडें बहुत हितच होईल. कारण मनुष्य स्वभावतःच इतका स्वार्थप्रिय आहे कीं आपला स्वार्थ साधण्यासाठीं दुसऱ्याचा कोणत्याही प्रकारचा नाश करण्यास तो सहज प्रवृत्त होतो व दुसऱ्याचें हित करण्याकरितां आपल्या देहाचा, वेळाचा, किंवा धनाचा यत्किंचितही उपयोग करणें त्यास फार कठीण जातें. अशा माणसाबर सदसद्वि-

वेकाचा किंवा ईश्वरभीतीचा दाब फारच थोडा असतो. परंतु स्तुतिनिंदेचा किंवा लोकांपासून होणाऱ्या हिताहिताचा दाब अतिशय असतो. ह्मणूनच हें सर्व जग कांहीं तरी सुरळीत रीतीनें चाललें आहे, व एक दुसऱ्यावर कांहीं तरी उपकार करितो. तसेंच आपण जें कांहीं करितों तें वाईट कीं बरें आहे, याचा जर आपणांस संशय पडला, तर स्तुतिनिंदेपासून लोकांचें त्या विषयीं बहुमत काय आहे तें आपणांस कळतें व आपलें मत दृढतर होतें किंवा आपली चुकी आपणांस कळते.

परंतु स्तुतिनिंदेकडे लक्ष्य देऊन केलेलीं कार्यें ज्या भावानें तीं करावीं त्या भावानें केलीं जात नाहींत. आपणांस आपल्या अंतरात्म्याची उन्नति साध्य आहे. ह्मणजे आपल्यामध्यें जे सद्भाव ईश्वरानें बीजरूपानें ठेविले आहेत त्यांचा विकास होऊन ते पूर्ण दशेस येतील असें आपणांस केलें पाहिजे. ते सद्भाव तेव्हांच विकास पावतील, जेव्हां जीं आपण कृत्यें करितों तीं त्या सद्भावांनींच प्रेरित होऊन करूं, इतर कोणत्याही भावानें प्रेरित होऊन करणार नाहीं. जर आपण लोकांचें वारंवार हित करीत गेलों परंतु केवळ आपली स्तुति व्हावी ह्मणूनच, परोपकारबुद्धीनें किंवा भूतदयेनें नव्हे, तर तें हित करण्यापासून आपली परोपकारबुद्धि किंवा भूतदया लेशमात्र सुद्धां वाढणार नाहीं, हें सांगावयास नकोच. तेव्हां त्या दृष्टीनें आपलीं परोपकाराचीं कृत्यें व्यर्थ गेलीं यांत संशय नाहीं. ह्मणून जीं जीं सत्कृत्यें आह्मी करितों तीं तीं तत्तदनुरूप सद्भावांपासूनच उद्भूत झालीं पाहिजेत. स्तुतिनिंदेवर दृष्टि ठेवून केलेल्या सत्कृत्यांपासून येवढाच उपयोग होतो, कीं त्या कृत्यांकडे, मग कोणत्याही कारणामुळें असेना कां, तनमनधनाचा उपयोग करण्याची संवय थोडीशी तरी लागते. मग, उचित भावानें तीं आपल्या हातून झालीं पाहिजेत असें जेव्हां वाटेल, तेव्हां त्या भावानें तीं करण्यास सोपें जाईल. लहान मूल कोणत्याही वस्तूस धरून उभें रहावयास शिकतें, किंवा एका प्रकारच्या गाडीस धरून चालावयास शिकतें. परंतु त्यापासून अंतीं कोणत्याही वस्तूस धरल्याशिवाय उभें रहावयास किंवा चालावयास आलें पाहिजे तरच त्याचा उपयोग. त्याचप्रमाणें निंदास्तुतिविषयीं आपणांस अंतीं तरी अगदीं निरपेक्ष झालें पाहिजे. असा मात्र यांत बिलकुल अर्थ नाहीं, कीं सांगितलेली संवय लागण्यास प्रथम कोणत्याही प्रकारें निंदास्तुतिविषयीं अपेक्षा धरणें जरूर आहे.

दुसरी अशी गोष्ट आहे कीं, लोक एका क्षणीं ज्याची स्तुति करितील, त्याचीच दुसऱ्या क्षणीं निंदा करितील, व तसेंच एका क्षणीं ज्याची निंदा करितील त्याचीच दुसऱ्या क्षणीं स्तुति करितील. त्यांच्या निंदास्तुतिमध्यें नेहमीं धरबंद असतोच असा कांहीं नियम नाहीं. व त्यांनां धरून जर आपण नेहमीं चाललों तर आपल्याही आचरणांत धरबंद रहाणार नाहीं.

कधीं कधीं असें होतें कीं, पुष्कळ लोकांमध्यें एक दोघेच जे विद्वान् असतात, ज्यांस इतर लोकांपेक्षां ईश्वरानें अधिक बुद्धि दिली आहे, त्यांस इतर लोकांपेक्षां अधिक कळतें, नवीन कांहीं तरी गोष्टीचें त्यांस ज्ञान होतें, नवीन कांहीं सत्य त्यांच्या ध्यानांत येतें.

व त्याजमुळें त्या गोष्टीचें किंवा सत्याचें ज्ञान इतर लोकांस करून देण्याची, व त्या गोष्टीस किंवा सत्यास अनुसरून वागण्याची, आणि लोकांस कित्ता घालून देण्याची जबाबदारी त्यांजवर येते. प्रकार नवीन असल्यामुळें लोकांस पहिल्यानें आवडत नाहीं. ते निंदा व छळ अशा पुढारी लोकांचा करितात. परंतु, नवीन कळलेल्या सत्याच्या प्रसारार्थ ते पुढारी लोक कोणत्याही प्रकारचा छळ अथवा हानि सोसण्यास तयार आहेत व मोठ्या उत्साहानें तो छळ अथवा ती हानि सोसतातही, असें जेव्हां इतर जन पहातात तेव्हां त्या सत्यामध्यें कांहीं तरी तथ्य आहे असें त्यांस वाटूं लागतें. त्यामध्यें जर कांहीं तथ्य नसतें तर त्यासाठीं कोणीही इतका त्रास सोसताना, असा विचार मनांत येऊन ते त्या सत्याचा हळू हळू स्वीकार करूं लागतात. ह्मणून अशा वेळीं निंदेला व छळाला भिऊन जर असे अग्रगण्य पुरुष वागले तर त्यांनीं आपल्या शिरावर ईश्वरानें ठेविलेली जबाबदारी झुगारून दिली असें होईल.

ज्यास स्तुति प्रिय झाली व जो निंदेला भितो, त्याची स्तुतिविषयीं रुचि व निंदेची भीति उत्तरोत्तर अधिकाधिक वाढत जाते, ती इतकी कीं त्यांच्या बंधनापासून मुक्त होणें अशक्य असें ह्मटलें असतां चालेल. किती जरी शुद्ध भावानें आपण अमुक कृत्य केलें असें त्यास वाटलें, तरी त्यांत कोठें तरी कोनाकोपऱ्यांत लपून राहिलेला अशुद्ध भावाचा अंश असतोच; व निष्पक्षपातानें जर त्यानें आपल्या अन्तःकरणाची परीक्षा केली तर तो त्यास दिसून येईल. किंवा ज्या मार्गाचें अवलंबन केलें असतां आपली स्तुति होईल व निंदा व छळ टळतील त्या मार्गाकडे मनांत नसतांही तो जोरानें ओढला जातो. त्यामुळें मनांत तर वाईट वाटतें, परंतु तो आपल्या मनाचें कसेंना कसें तरी समाधान करून घेतो व लोकांचें समाधान करूं पाहतो. आपण केलें तें ठीकच केलें, थोडेंसें लोकांच्या मनाप्रमाणें केलें त्यामुळेंच आपल्या ताब्यांत दिलेल्या सत्याचा विशेष जय होईल, अन्यथा मुळींच झाला नसता, केलें तें त्या सत्याच्या जयासाठींच केलें, असा आपला समज तो करून घेतो. याप्रमाणें त्यानें ईश्वराचा दास जें व्हावें, त्याची इच्छा ती आपली इच्छा असें जें करावें, त्याऐवजीं उलट तो लोकांचा दास होतो, लोकांची जी इच्छा ती आपली इच्छा असें करून घेतो.

तसेंच आपणांस जर स्तुति प्रिय असली, तर ती प्राप्त झाली असतां तिजमुळें आपणांस आपले दोष दिसतनासे होतात व ते सुधारले जात नाहींत; व आपण उत्तरोत्तर अतिनिंद्य दशेस ह्मणजे अधोगतीस जाऊन पोंचतों. ह्मणूनच तुकोबांनीं ह्मटलें आहे कीं:—

काय कीर्ति करूं लोक दंभमान । दाखवीं चरण तुझे मज ॥
मज आतां ऐसें नको करूं देवा । तुझा दास जावा वांयां वीण ॥
होइल थोरपण जाणिवेचा भार । दुरावेन दूर तुझ्या पायीं ॥
अंतरींचा भाव काय कळे लोकां । एक मानी एका देखोवेखीं ॥
तुका ह्मणे तुझे पाय आतुडती । ते मज विपत्ति गोड देवा ॥

---

५. कीर्ति.

काय कीर्ति करूं लोक दंभमान । दाखवीं चरण तुझे मज ॥
मज आतां ऐसें नको करूं देवा । तुझा दास जावा वांयां वीण ॥
होइल थोरपण जाणिवेचा भार । दुरावेन दूर तुझ्या पायीं ॥
अंतरींचा भाव काय कळे लोकां । एक मानी एका देखोवेखीं ॥
तुका ह्मणे तुझे पाय आतुडती । ते मज विपत्ति गोड देवा ॥

काय विलक्षण मागणें मागितलें हें तुकोबांनीं ! लोकांवेगळाच हा प्रकार ! सर्व लोक कशाच्या मागें लागले आहेत याचा जर विचार केला, तर दिसून येईल कीं, ऐहिक विपत्ति मुळींच नाहींशी व्हावी व ऐहिक संपत्ति जितकी संपादितां येईल तितकी व बाकीच्या सर्वांपेक्षां अधिक संपादावी, या विषयींच प्रत्येक जणाचा उद्योग चालला आहे. कीर्ति हा एक त्या ऐहिक संपत्तिचाच प्रकार आहे. धन लोकांस प्रिय, परंतु कीर्ति नसली तर त्या धनानेंही व्हावें तसें समाधान होत नाहीं; धन मोबदला देऊन श्रीमंत लोक कीर्ति मिळवावयास पहातात. वास्तविक पहातां बहुतांशीं देहच काय तो अशा लोकांचें परम दैवत आणि कीर्तिपासून तर देहास कोणतेंच सुख नाहीं. तथापि कीर्तिसाठीं लोक नाना प्रकारचे बरे वाईट खटाटोप करितात. आणि कित्येक तर तिच्यासाठीं आपल्या धनाचा व देहाचाही नाश करून घेतात. कीर्ति व इतर प्रकारची ऐहिक संपत्ति हे सकाम भक्तीचे मुख्य उद्देश होत. असें असूनही ही कीर्ति, ही संपत्ति, तुकोबांस नकोशी वाटली आणि उलट त्यांनीं विपत्तिच आपणास गोड ह्मणून सांगितलें.

कोणी जर आपणांस सांगितलें कीं, मला धन नको, मला यश नको, मला कीर्ति नको, यांजबद्दल मला ऐहिक विपत्ति असली तरी चालेल, केवळ मला देवाचे चरण पाहिजेत, तर आपणांस कांहीं तें खरें वाटणार नाहीं. आपणांस ह्या गोष्टी इतक्या प्रिय, आपण यांजविषयीं इतके लंपट असतों कीं, त्या कोणास नको असतील असा संभवच आपणांस वाटत नाहीं. आपली मनोदेवता आपणांस सांगते कीं, अशा प्रकारची बुद्धि असणें हें योग्य आहे, व यामुळें ज्यांची अशी बुद्धि ते आपल्यापेक्षां श्रेष्ठ. पण आपल्यापेक्षां कोणी श्रेष्ठ आहे, हें तर कबूल करवत नाहीं. ह्मणून ज्या मनुष्याची अशा प्रकारची बुद्धि आहे असें वाटण्यास कांहीं कारण होतें, त्या मनुष्याविषयीं आपण संशय घेतों. यामध्यें कांहीं तरी गोम आहे असें आपणांस वाटतें. त्याचा निरभिलाषीपणा दाखविण्याचाच आहे, कीर्ति संपादण्याचा मार्गच तो त्यानें योजिला आहे, असें आपणांस खचित वाटतें. आणि जेव्हां आमची खात्रीच होते कीं, हा त्याचा निरभिलाषीपणा खरा आहे, ढोंगीपणाचा नाहीं, तेव्हां अशा माणसास आपण खुळ्यांमध्यें गणतों. उपाय नाहींच तेव्हां मात्र आह्मी कबूल करितों कीं, अशा प्रकारचे

साधुसंत सध्यां कांहीं नाहींत, परंतु पूर्वी होऊन गेले खरे. ते कांहीं खुळे होते असें ह्मणतां येत नसून, त्यांची बुद्धि अशा प्रकारची निरभिलाषीपणाची होती. परंतु, जसें खुळ्यांनां, तसें त्यांनांही आपण एका प्रकारें आपल्या मधून वगळतोंच, व त्यांच्या प्रमाणें आह्मांस कोठें करितां येणार आहे असें ह्मणून त्यांचें अनुकरण करण्याचा विचारही सोडून देऊन आपण आपल्या मार्गानें जातों.

आतां कित्येक उपहास करणारे कदाचित् ह्मणतील कीं, ज्यांनीं धन व कीर्ति यांविषयीं निरभिलाषीपणा दाखविला त्यांनीं तीं आंबट द्राक्षें ह्मणून सोडून दिलीं असतील. तर पुष्कळ साधूंविषयीं दाखवून देतां येईल कीं तसा प्रकार त्यांचा नव्हता, त्यांजकडे असलेल्या किंवा आलेल्या संपत्तीवर त्यांनीं लाथ मारून तिला झुगारून दिलें. तुकोबांनां शिवाजीपासून "दिवट्या, छत्री, घोडे" हीं आलीं होतीं. सर्वांत श्रेष्ठ जी कीर्ति साधुत्वाविषयीं, ज्या कीर्तीमुळें लोक मनुष्यास देवाप्रमाणें किंवा देवच मानितात, तीही त्यांस प्राप्त झाली होती. तेव्हां या विषयांची त्यांस गोडी कळली नव्हती ह्मणून कांहीं त्यांनीं हे धिक्कारिले नाहींत, तर त्यांनां दुसऱ्या एका रसाची, ह्मणजे ब्रह्मरसाची किंवा भक्तिरसाची सर्वथा अनुपमेय जी गोडी, जी बोलून दाखवितां येत नाहीं, केवळ अनुभवानें ज्याची त्यासच कळायाची, ती त्यांस कळली होती. ह्मणून जेव्हां त्यांनां कीर्ति प्राप्त झाली, ऐश्वर्य जेव्हां त्यांजपाशीं येऊन उभें राहिलें, तेव्हां त्यांस आनंद न होतां उलट भीति पडली. जरी भक्तिरसाची त्यांनां गोडी कळली होती, तरी, तो रस मोठ्या कष्टानें सिद्ध होतो, ह्मणूनच त्यांस अशी मोठीच दहशत पडली कीं, कदाचित् हे विषय मला गोंवून टाकितील, त्यांच्याच रसास मी लोलुप होऊन भक्तिरसास मुकेन. हें एक आपल्या वाटेंत विघ्न आलें, हा एक मध्येंच आपल्या वाटेस आडवा फांटा फुटला असें त्यांस वाटलें. भक्तीमध्यें इतर विघ्नें येतात, तीं बाहेरचीं येतात, हें विघ्न जें प्राप्त झालें तें भक्तीपासूनच प्राप्त झालें. ज्या विषयांविषयीं आपली बुद्धि निरपेक्ष करून, ते प्रथम भक्तिमार्गास लागले, तेच विषय, त्यांच्या भक्तीची त्यांच्या साधुत्वाची आख्या जिकडे तिकडे पसरल्यामुळें, त्यांजपुढें अधिक मनोहर स्वरूप धारण करून त्यांस मोहावयास उभे राहिले. ह्मणून त्यांनां हे विषय नकोतसे वाटले आणि ज्या विपत्तीपासून देवाचे पाय प्राप्त होतील ती विपत्तिच गोड वाटली व त्याप्रमाणें त्यांनीं देवापाशीं निवेदन करून विपत्तिच मागितली.

---

६. विधिनिषेध.

सुटायाचा कांहीं पाहातों उपाय । तों हे देखें पाय गोंवियेले ॥ १ ॥
ऐसिया दुःखाचे सांपडलों संदी । हरपली बुद्धि बळ माझें ॥ २ ॥
प्रारब्ध क्रियमाण होतें संचिताचें । वोढत ठायींचें आलें साचें ॥ ३ ॥
विधिनिषेधाचे सांपडलों चपे । एकें एक लोपे निवडेना ॥ ४ ॥
सारावें तें वाढे त्याचियाचि अंगें । तृष्णेचिया संगें दुःखी झालों ॥ ५ ॥
तुका ह्मणे आतां करीं सोडवण । सर्व शक्तिहीन झालों देवा ॥ ६ ॥

या संसारामध्यें मनुष्यास अनेक प्रकारचीं बंधनें आहेत. कांहीं विषयांचीं, कांहीं जातीचीं किंवा वर्गाचीं, कांहीं रूढीचीं, कांहीं अशाच प्रकारच्या दुसऱ्या कशाचींही बंधनें आहेत. यांतून आपण आपली सुटका करून घेतली पाहिजे हें फारच थोड्यांच्या मनांत येतें. "आयुष्य हेचि रत्नपेटी," हें लक्ष्यांत कोणाच्या येत नाहीं व आलें तरी मनामध्यें नित्य वागत नाहीं. ह्मणून आपणांस जें जीवित प्राप्त झालें आहे त्याचा पदोपदीं विचार करून यथायोग्यच उपयोग केला पाहिजे, हा विचार फारच थोडक्यांच्या मनांत येतो. संसारसागराच्या लहरींस पूर्णपणें वश होऊन, जिकडे त्या नेतील तिकडे, त्यांस आपणांस यथेच्छ नेऊं देणें हें मनुष्यप्राण्यास अत्यंत अनुचित आहे; व त्या लहरींच्या बलाचा प्रतिकार करून, येवढेंच नव्हे, तर त्यांच्या त्या बलाचें, आपल्या मार्गानें जाण्यास, आपणांस उलट साहाय्य होईल, अशी योजना करून, आपणांस ज्या स्थानाप्रत जावयाचें त्या स्थानाकडेस आजूबाजूस यत्किंचित्ही न वळतां सरळ रेषेनें जाणें हेंच आपलें कर्तव्य, हें फारच थोड्या लोकांच्या ध्यानांत येतें. आणि तें कर्तव्य करावयास प्रवृत्त होतात असे त्या थोड्यांतही फारच थोडे. जो एखादा अशा प्रकारें प्रवृत्त होतो, त्याच्या ध्यानांत वर सांगितलेलीं बंधनें येऊन त्यांतून सुटायाचा कांहीं उपाय तो पाहतो, व अर्थात् त्याच्या पूर्वींच्या व नवीन वर्तनक्रमामध्यें फरक पडतो. पूर्वीं कदाचित् तो स्नेह्यांमध्यें बसून रिकामटवळ्या गोष्टी बोलण्यामध्यें, अश्लील भाषण करण्यामध्यें, किंवा कोणाची व्यर्थ निंदा नालस्ती करण्यामध्यें वेळ घालवीत होता असेल. आतां तसें करणें त्याला आवडेनासें होतें, व त्यांतून तो आपलें मन हळूहळू काढून घेतो. आपले ज्ञातिबंधु व इष्टमित्र यांप्रमाणेंच तो पूर्वीं संसारामध्यें पूर्णपणें रत होऊन संसार चालवीत होता; परंतु आतां त्याची संसारावरील भक्ति कमी झाली यामुळें त्याच्यामध्यें व त्याचा ज्ञातिवर्ग व मित्रमंडळी यांमध्यें अंतर पडतें. त्याला यामुळें आरंभीं फार कठीण वाटतें. सभोंवतालच्या मंडळीलाही त्याचा हा मूर्खपणा वाटून, तो मूर्खपणा त्याच्या ध्यानांत आणून द्यावयाचा ती यत्न करिते; त्याची टवाळी, त्याची मानखंडना करिते; व युक्तिप्रयुक्तीनें त्याला पूर्ववत् करूं पाहाते. आणि हें त्याच्या सुटण्यामध्यें

प्रथम विघ्न येतें. "यात्रिकक्रमण" या अर्थाच्या नांवाचें जें इंग्रजींत एक पुस्तक आहे त्यामध्यें हें विघ्न स्पष्ट रीतीनें दाखविलें आहे. येथें वादास आरंभ होतो. आणि, वाद हा अनेक अनर्थांचें मूळ असल्यामुळें, कधीं कधीं त्या मनुष्याचे पाय त्यामध्यें गोंवून जातात; त्याचें बुद्धिबळ हरपून जातें; विधिनिषेधाच्या चपेस तो सांपडतो; आणि एकदां एक बरें वाटतें, दुसऱ्या वेळेस दुसरें बरें वाटतें. याप्रमाणें बुद्धीस गोंधळ होऊन त्याला कांहीं निर्णय करितां येत नाहींसें होतें. वादाचा प्रकारच असा आहे कीं, जों जों वाद करावा तों तों बहुतकरून नेहेमीं तो आह्मांस प्रिय होतो; आपली वाद करण्याची शक्ति जगास अधिकाधिक दाखविण्याविषयीं आम्ही प्रवृत्त होतों; व अंतीं, जिच्यासाठीं वाद पहिल्यानें आरंभिला होता, ती गोष्ट एकीकडेसच राहून वादच काय तो आपल्या हट्टानें आपणांस प्रधान होऊन राहतो. जें आपणांस सत्यसें वाटतें तेंही वादप्रियतेमुळें आह्मी असत्य ह्मणून प्रतिपादन करावयास तयार होतों व याप्रमाणें अनेकवार प्रतिपादन करून करून कांहीं काळानें आपल्या मतीस कधीं कधीं असा भ्रम होतो कीं, जें आपण वादासाठीं केवळ हट्टानें असत्य ह्मणून प्रतिपादन केलें तें आम्हांस खरोखरी असत्यसें वाटूं लागतें, व उलट तऱ्हेनें असत्य तें सत्यसें भासूं लागतें. आधींच आपणांस फार कळतें असें नाहीं, आणि त्यांत आह्मी हा जास्ती आपला घोटाळा करून घेतों.

आपल्यामध्यें हा वादाचा प्रकार फार आहे. कांहीं वर्षांपूर्वीं पुण्यास कांहीं संन्यासी आले होते. त्यांच्या बरोबर वादविवाद करण्याकरितां शास्त्री व विद्वान् मंडळीची सभा जमली होती. कांहीं वेळ अद्वैतावर वाद चालला. त्यामध्यें त्या संन्याश्यांनीं अद्वैताचें मंडन चालविलें होतें. तो वाद संपल्यावर "इदमपि खण्ड्यते" ह्मणून ते संन्यासी म्हणाले; म्हणजे काय कीं, ज्याचें आह्मीं इतका वेळ मंडन केलें त्या अद्वैताचेंही आम्ही खंडन करून दाखवितों. एकून सारांश हा कीं, पाहिजे त्याचें पाहिजे त्या वेळीं खंडन करून व पाहिजे त्या वेळीं मंडन करून आपलें पांडित्य दाखवायाचें. अशा प्रकारच्या आख्यायिका-ही पुष्कळ आहेत. एके प्रसंगीं एक दूर देशचा वैयाकरण एका राजसभेमध्यें तेथील एका पंडित वैयाकरणाबरोबर वाद करावयास आला. दुसऱ्यानें अंगास कांहीं चमत्कारिक वन-स्पति मुद्दाम लाविली होती व तशा अंगानें पहिल्या पंडितास सभेमध्यें त्यानें भेट दिली. तेणेंकरून पहिल्या पंडिताचें सर्व भान नष्ट होऊन तो वादामध्यें भलभलतें बोलूं लागला, भलत्याच सूत्राचा भलताच अर्थ करूं लागला, आणि त्याची त्या दिवशीं फजिती झाली. घरीं जाऊन शुद्धीवर आला, आणि दुसऱ्या दिवशीं वादाच्या वेळीं प्रतिज्ञा केली कीं, "ज्या ज्या सूत्रांचे काल मीं भलभलते अर्थ केले ते ते त्या त्या सूत्रांचे खरे अर्थ असें सिद्ध करून आज दाखवीन." ती प्रतिज्ञा त्यानें सिद्धीस नेलीही, पण ती कशी नेली तें मात्र गोष्टींत सांगितलेलें नाहीं. सारांश काय कीं पांडित्याच्या सीमेची साधारणतः कल्पना ही, कीं जें सत्य तें असत्य करून दाखवावयाचें व जें असत्य तें सत्य करून दाखवावयाचें आणि इत-रांच्या व आपल्याही मतीस भ्रम पाडावयाचा. मोठ्या चतुराईनें सत्य काय तें शोधून

काढून इतरांस तें विशद रीतीनें सांगावयाचें ही गोष्ट स्वप्नींही नाहीं. अशा "वादें वांयां गेलीं ब्रह्मवृंदें" असें जें तुकोबांनीं ह्मटलें तें खोटें काय? हल्लीं अशा वादास नवीन तऱ्हेच्या शिक्षणानें थोडेंसें नवीन रूप प्राप्त झालें आहे. परंतु प्रकार तोच. तेव्हां मनुष्य सुटायाचा कांहीं उपाय जों पाहतो तोंच अशा प्रकारें विधिनिषेधाचे चपेस तो सांपडून त्याच्या मतीस भ्रम होतो व वादच कायतो प्रधान होऊन, वादापासून उत्पन्न होणारे, असहिष्णुता, क्रोध, वगैरे दुर्गुण त्याच्यामध्यें उत्पन्न होतात, आणि त्याचे पाय पुनः गुंतले जातात. वाद करूं नये असें नाहीं; वादापासून तत्त्वबोधही होण्यासारखा आहे. परंतु तो वाद निराळ्या प्रकारचा. दारू वगैरे भयंकर पदार्थांशीं जसें निष्काळजीपणें खेळ खेळणें ठीक नाहीं, तसें वादाबरोबर खेळ खेळणें ठीक नाहीं. जें आपणांस सत्य आहेसें कळतें तें कबूल करून, अधिक सत्य कळण्याकरितां वाद करावा; आपलें बुद्धिवर्चस व किंवा हुशारी दाखविण्याकरितां करूं नये. वाद ही कांहीं गोष्ट स्वतः इष्ट नाहीं, त्यापासून जो कांहीं तत्त्वबोध होणार त्यासाठीं तो करावयाचा, हें ध्यानांत ठेवावें; आणि ज्या रीतीनें वाद केला असतां त्याचा योग्य उद्देश सिद्धीस जाणार नाहीं, व कधीं कधीं त्या उद्देशाच्या उलटच परिणाम होईल, त्या रीतीनें कधींही वाद करूं नये.

---

७. एकान्त.

विरोधाचें मज न साहे वचन। बहु होतें मन कासावीस ॥ १ ॥
ह्मणऊनि जीवा न साहे संगती। बैसतां एकांतीं गोड वाटे ॥ २ ॥
देहाची भावना वासनेचा संग। नावडे उबग आला यांचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे देव अंतरे यामुळें। आशामोहजाळें दुःख वाढे ॥ ४ ॥

"सुटायाचा कांहीं पाहातों उपाय" या अभंगाचें विवरण करितेवेळेस विरोधापासून किंवा वादापासून काय काय अनर्थ होतात त्यांचें दिग्दर्शन केलें होतें. विरोधापासून सत्यासत्यतेचा विचार एकीकडेसच राहून प्रतिवाद्यावर जय मिळविणें हाच आपला प्रधान उद्देश होऊन जातो. तसेंच विरोधापासून मनास अस्वस्थता प्राप्त होते, मनाची शांति नाहींशी होऊन तें अत्यंत क्षुब्ध होऊन जातें. वादामध्यें काळ वांयां जातो, येवढेंच कायतें बहुतकरून सर्वदा होतें. त्यापासून तथ्यांश कांहीं प्राप्त होत नाहीं. अंगांतील विनीतपणा किंवा विनम्रपणा जाऊन त्याच्या ऐवजीं उद्धटपणा मात्र येतो. तेव्हां शांति आणि समाधान ज्यांस अत्यंत प्रिय, जे अत्यंत विनीत, जे सत्याचे एकनिष्ठ भक्त, अशा तुकोबांस विरोधाचें वचन न साहे यांत कांहीं नवल नाहीं. शांति ज्यांचा प्राणवायु, त्या तुकोबांचा जीव विरोधानें भरलेल्या हवेमध्यें कासावीस व्हावा हें साहजिकच आहे. सत्य काय, असत्य काय, बरें कोणतें, वाईट कोणतें, योग्य काय, अयोग्य काय, धर्म कोणता, अधर्म कोणता, हें कळण्यास जर पदोपदीं वादाची गरज असती तर गोष्ट निराळी. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. सत्यासत्य, बरेंवाईट, योग्यायोग्य, किंवा धर्माधर्म हीं मनुष्यास शंभर प्रसंगांतून नव्याण्णव प्रसंगीं स्पष्टपणें आपलीं आपणास कळतात, दुसऱ्यानें सांगण्याची जरूर पडत नाहीं. उलट मात्र पुष्कळदां असें होतें कीं, हें कळल्यापासून आपलें कर्तव्य किंवा आपला धर्म जो आपल्यापुढें उभा राहून आपणाकडेस टेहेळतो, त्यापासून आपली मुक्तता व्हावी, तें कांहीं आपलें कर्तव्य नाहीं, अशी आपल्या मनाची प्रतीति करून घेऊन, तें करण्याच्या आवश्यकतेपासून आपण सुटावें, या हेतूनें कांहीं तरी निमित्त काढून वाद करून आपल्या मतीस भ्रम पाडावयाचा यत्न लोक करितात. परंतु जें कांहीं आपणांस कळतें त्या संबंधानें मतीस भ्रम पाडण्याचा यत्न न करितां, तें पूर्णपणें लक्ष्यांत वागवून तदनुसार जर आपण वागलों, तर जें आपणांस सध्यां कळत नाहीं तेंही उत्तरोत्तर ईश्वराच्या अनुग्रहानें आह्मांस अधिकाधिक कळूं लागेल.

विरोधापासून वर सांगितलेले अनिष्ट परिणाम होतात व शांति जाऊन क्षोभ तिच्या जागीं येतो, तेव्हां ज्या मनुष्यांमध्यें राहून विरोध उत्पन्न होतो, त्या मनुष्यांची संगति नको असें तुकोबांस वाटलें व एकांतीं जाऊन बसणें त्यांस गोड वाटलें. वस्तुतः पाहातां साधुसंतांचा धर्म आहे—

आणि साधुसंतांचाच नव्हे तर प्रत्येक मनुष्याचा—कीं जें कांहीं आपणांस बरेंवाईट कळतें त्याचा लाभ इतर जनांस करून द्यावयाचा. तसेंच कोणताही धर्मपंथ घ्या, त्यामध्यें परोपकार करणें ह्मणजे मुख्य धर्म मानिला आहे. तर लोकांची संगत सोडिली असतां त्या धर्माचें आचरण कसें होणार ? तुकोबांसही हें पूर्णपणें अवगत होतें. "बुडत हें जग न देखवे डोळां । ह्मणोनि कळवळा येत असे" वगैरे अनेक अशा प्रकारच्या त्यांच्या उक्ति आहेत. असें असूनही तुकोबांस या विरोधाच्या पायीं माणसांची संगत नको, एकान्त बरा, असें तितक्या वेळापुरतें तरी वाटलें. अशा प्रकारचा एकान्त जरी सदा सर्वकाळ असून उपयोग नाहीं, तरी मधून मधून नियमित वेळीं अशा एकान्ताचा अभ्यास ठेविला पाहिजे. आणि संगतीपासून विरोध उत्पन्न होतो ह्मणूनच हा एकान्त पाहिजे असें नाहीं. या एकान्तापासून दुसरींही कार्यें होतात. संसार करावयाचा तो भगवान् परमेश्वराच्या प्रीत्यर्थच करावयाचा. म्हणजे तो अशा तऱ्हेनें करावयाचा कीं, तो करणें ह्मणजे ईश्वराची आराधनाच एका प्रकारची ती व्हावी. परंतु संसारकृत्यांमध्यें दक्ष असतां या तत्त्वाचा वारंवार विसर पडतो. यास्तव पुनःपुनः आपणांस त्याचें स्मरण झालें पाहिजे. संसारामध्यें असतांनां देहाची भावना आणि वासनेचा संग वाढतो; याचा तुकोबांस उबग आला होता. तसेंच मनुष्यांच्या संगतीमुळें अथवा संसारांत राहिल्यामुळें आशा, मोह, व दुःख हीं वाढतात व देव अंतरतो. या सर्व कारणांमुळें तुकोबांस एकान्त रुचला. अशा एकान्ताचा उद्देश हा कीं, ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन घेऊन, पुनः एकवार आपला अंतरात्मा शुद्ध करून, जेणेंकरून संसार केल्यानें आपलें आशेचें व मोहाचें जाळें वाढणार नाहीं, देहाची भावना व वासनेचा संग प्रबळ होणार नाहीं, व देव अंतरणार नाहीं, अशा रीतीनें मनुष्याची संगति करण्यास व संसार करण्यास होईल तितकें आपणांस योग्य अथवा समर्थ करावयाचें.

आम्हांस कांहीं देहाची भावना, वासनेचा संग वगैरे गोष्टींचा उबग आलेला नाहीं. परंतु तो आला पाहिजे. आणि तो तेव्हांच येणार, जेव्हां आह्मी एकान्तामध्यें जाऊन, आह्मीं कोणत्या प्रकारें संसार केला पाहिजे, व त्यापासून किती भिन्न प्रकारें करीत आहों, त्यामुळें आपली केवढी मोठी हानि होत आहे, व देव आह्मांस किती अंतरत आहे, इत्यादि सर्व गोष्टींचा विचार करूं. आम्हां सर्वांमध्यें जो थोडाबहुत विक्षिप्तपणा असतो तो संगतीपासून नाहींसा होतो, किंवा, इंग्रजींत ह्मणतात त्याप्रमाणें, आपले कोन झिजून जातात. परंतु त्याबरोबर योग्यायोग्यतेचा, धर्माधर्माचा, व पुण्यपापाचा जो विचार त्याच्या धारेची तीक्ष्णताही पुष्कळदां कमी होते, व अंतीं ती धार अगदीं बोंथट होऊन जाते. ह्मणून एकान्तामध्यें जाऊन विचार करून, ईश्वराचें ध्यान करून, आणि त्याच्या स्वरूपाचें अवलोकन करून, त्या विचाराच्या धारेस पाजळून पुनः पूर्ववत्, व होईल तर पूर्वीपेक्षां अधिकही, तीक्ष्ण केलें पाहिजे. तसेंच शिक्षणाच्या कामास आपण सदा योग्य राहावें

ह्मणून, शिष्यांस शिकवून बरोबर आपल्याही अभ्यासाचा क्रम शिक्षकानें ज्याप्रमाणें सुरू ठेविला पाहिजे, त्याप्रमाणें, आपणांस जें बरें वाईट कांहीं कळतें त्याचा लोकांस लाभ करून देणें हें ज्यांस आपलें कर्तव्य वाटतें, त्यांनीं एकान्तामध्यें जाऊन ईश्वराचें मनन व निदिध्यास करून आपला आध्यात्मिक ज्ञानाचा व अनुभवाचा अभ्यासक्रम अव्याहत चालू ठेविला पाहिजे.

८. आपलें मन व आपले अवगुण.

माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनावर ॥ १ ॥
आतां आड उभा राहें नारायणा । दयासिंधुपणा साच करीं ॥ २ ॥
वाचा वदे परी करणें कठीण । इंद्रियां अधीन झालों देवा ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझा जैसा तैसा दास । न धरीं उदास मायबापा ॥ ४ ॥

साधारण प्रतीचे सांसारिक जे लोक त्यांस या तुकोबांच्या उक्तीपासून समाधान उत्पन्न होण्यासारखें व धीर वाटण्यासारखा आहे. ज्याच्या ज्याच्यामध्यें ह्मणून परमार्थबुद्धि उत्पन्न झाली व देवाची सेवा करण्याचें आणि आपली उन्नति करून घेण्याचें मनांत आलें, त्याच्या त्याच्या अनुभवास वारंवार आलें आहे कीं, पहिल्या चरणांत वर्णन केल्याप्रमाणें आपली स्थिति आहे. आपण अवगुणांनीं पूर्ण भरलों आहों, आपलें मन अनावर आहे, आणि जें करूं नये त्याकडेस वेगानें व जोरानें धांव घेतें व जें करावें त्यापासून सर्वथा पराङ्मुख होतें, असें निष्पक्षपातानें विचार केला असतां आपल्या दृष्टीस येतें. शुभ जें त्यालाच धरून रहावें, अशुभ जें तें सोडून द्यावें, असें आपणांस वाटतें, परंतु मनापुढें आपलें कांहीं चालत नाहीं. कितीही निश्चय केला तरी पतंग जसा मोहवश होऊन दिव्यावर उडी घेतो, किंवा व्याधाच्या गीतास मोहित होऊन हरिण जसा व्याधाकडेसच धांव घेतो, तद्वत् आपली पदोपदीं स्थिति होते. असें जेव्हां आपल्या अनुभवास येतें तेव्हां अत्यंत उद्वेग उत्पन्न होतो. आपल्या उन्नतीविषयीं आपण अगदीं हताश होतों. आणि असें वाटतें कीं, धन्य ते प्राणी, जे आपल्या इंद्रियांचा व मनाचा निग्रह करून साधुत्वाप्रत पावले व, देवावर सर्व भरिभार घालून, “ देवाचें जें मनोगत तेंच आपुलें हित निश्चित ”, असें मानून त्याप्रमाणें वागले. ते कांहीं मनुष्ययोनींतील प्राणी नव्हत, ते कोणत्या तरी दुसऱ्या उच्च योनींतील प्राणी असले पाहिजेत, त्यांनीं जें केलें, ते ज्याप्रमाणें वागले, त्याप्रमाणें करणें व वागणें कांहीं मनुष्यप्राण्यास शक्य नाहीं, असा मनाचा ग्रह होतो. परंतु अशा प्रसंगीं जर आपणांस खात्रीपूर्वक कळलें कीं, ज्यांनां आपण इतके श्रेष्ठ मानितों, त्यांचींही मनें व इतर इंद्रियें आपल्याप्रमाणेंच अनावर होतीं, तर ते आपल्याच योनींतील प्राणी होते हें सिद्ध होईल. आणि, असें असूनही जर ते साधुत्वाप्रत पावले, तर आपणांसही त्यांच्याप्रमाणें त्यांच्यासारख्या स्थितीप्रत जाणें शक्य आहे, असें वाटेल. तुकोबांनीं आपल्या आयुष्यक्रमामध्यें अनेक प्रसंगीं असें वर्तन केलें कीं, त्याचें अनुकरण करणें आह्मांस अत्यंत कठीण आहे, व जर कोणी मनुष्यप्राणी उच्च योनींतील प्राणी असें मानण्यासारिखे असले, तर त्यांतील तुकोबा हे एक असलेच पाहिजेत. परंतु त्यांच्यामध्येंही अवगुण होते व त्यांचेंही मन अनावर होतें असें त्यांच्या सांगण्यावरून दिसतें. यास्तव, त्यांनीं कोणत्या उपायांनीं

आपले अवगुण नाहींसे केले व आपल्या मनास आवरिलें, हें जर कळेल, तर आपणही तेच उपाय योजून यत्किंचित् अंशानें तरी त्यांसारखे होऊं. आपणांस ज्या वाटेनें जावयाचें आहे, त्या वाटेनें जो कधींच गेला नाहीं, असा मार्गदर्शक आम्हांस त्या वाटेनें कसा नेऊं शकेल ? किंवा, जो त्या वाटेनें गेला आहे परंतु मागाहून येणाऱ्यास ती वाट कळेल अशा प्रकारचीं पाउलें किंवा इतर चिन्हें ज्याचीं मागें राहिलीं नाहींत, त्याच्या त्या जाण्यापासून आपणांस ती वाट कशी कळेल ? ते आपणांस पूज्य आहेत यांत कांहीं संशय नाहीं. परंतु आमच्या वाटेवर कांहीं त्यांजपासून कोणत्याही प्रकारें प्रकाश पडत नाहीं; व आपणांस ती वाट सुलभ होत नाहीं. तुकोबांविषयींचा असा प्रकार नाहीं. तुकोबांनीं आपले वेळोवेळींचे अनुभव व उद्गार लिहून ठेविले आहेत व ते आपल्या अनुभवांशीं व उद्गारांशीं विशेष प्रकारें जुळत असल्यामुळें त्यांच्या उक्तींपासून आह्मांस अनेक प्रकारचा अत्यंत महत्त्वाचा बोध होतो.

आपण उत्तरोत्तर पूर्ण दशेप्रत जाऊन पोंचावें हा तुकोबांचा सतत हेतु होता; व तो सिद्धीस नेण्याविषयीं ते सतत परिश्रम करीत असत. आपलाही हेतु तोच असला पाहिजे. साधारण प्रतीचें व लोकांस मान्य होईल अशा प्रकारचें विशुद्ध आपलें आचरण असलें म्हणजे झालें असें मानून स्वस्थ राहतां कामा नये. देवाचीं आज्ञाधारक व त्यास अत्यंत प्रिय अशीं बालकें होण्यास आपण सर्वांनीं झटलें पाहिजे. तसेंच आपल्यांतील जीं कांहीं न्यूनें असतील तीं नाहींतशीं झालीं ह्मणजे पूर्णदशा झाली असें न मानतां, आपल्यामध्यें जीं कांहीं सद्गुणांचीं बीजें असतील त्यांचा पूर्ण विकास झाला तरच ती पूर्ण दशा ह्मणावयाची, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. अशा पूर्ण दशेप्रत पोहोंचणें हें कांहीं या जगीं कोणास साध्य नाहीं. तरी जितकें सन्निध आपल्याच्यानें जाववेल तितकें जाण्याविषयीं आपण निर्धार केला पाहिजे.

आतां कोणी अशी शंका घेतील कीं, भजन, मनन व कीर्तन हा एकच तुकोबांस उद्योग होता; तेव्हां त्यांस विशेष सिद्धि प्राप्त झाली यांत कांहीं नवल नाहीं; परंतु तुकोबांनीं ज्या प्रकारें सर्व इतर उद्योग प्रायः पूर्णपणें सोडून दिले त्याप्रमाणें जर सर्वांनीं ते सोडून द्यावयाचे नाहींत तर बाकीच्यांस त्यांच्याप्रमाणें सिद्धि कशी व्हावी ? तर यास उत्तर हें कीं, ही जी पूर्णदशा किंवा उन्नति ती अमुक एका प्रकारचाच उद्योग निरंतर करण्यामध्यें नाहीं. उन्नति ही एका प्रकारची अंतरात्म्याची स्थिति आहे. तशी जर आपल्या अंतःकरणाची स्थिति झाली तर, आपल्या हातून दुसरे कोणतेही व कितीही उद्योग कां होईनात, आपणांस सिद्धि झालीच ह्मणावयाची. भजन, पूजन, मनन, कीर्तन हीं ती स्थिति प्राप्त करून घेण्याचीं केवळ साधनें आहेत; आणि ही जर स्थिति त्यांजपासून प्राप्त झाली नाहीं, तर तीं सर्वथा व्यर्थ आहेत. परंतु यांशिवाय दुसरीं कोणतींच साधनें नाहींत असें नाहीं. असुक कांहीं प्रमाणानें हीं सर्व मनुष्यमात्रास आवश्यकच आहेत. परंतु, ज्या ह्या व्यापारांस धर्मसि-

द्धीचीं साक्षात् साधनें असें मानिलें जातें, त्यांप्रमाणेंच संसारांतील इतर सर्व उद्योग अथवा कृत्येंही उचित मनोभावानें केलीं असतां तत्त्वतः उन्नतीचीं साधनें होतात. तींही एका प्रकारचें देवाचें भजनपूजनच होतात. या संसारामध्यें सहस्रशः जीं आह्मी कृत्यें करितों, तीं करण्याचे जे प्रसंग येतात, त्यांतील प्रत्येक प्रसंग ह्मणजे देवाच्या संनिध किंवा देवापासून दूर एक पाऊल टाकण्याचा प्रसंग असतो. नेहेमींचे यःकश्चित् सुद्धां मोह ह्मणजे, आम्ही देवाशीं अधिकाधिक सरूप होणार किंवा अधोगतीप्रत जाणार, याचा निर्णय करण्याचे प्रसंगच होत. ते प्राप्त झाले असतां ज्या प्रकारचें आपण वर्तन करूं त्यावर आपलें खरें व शाश्वत हिताहित अवलंबून आहे.

परंतु कोणत्याही प्रकारें ईश्वरसिद्धीचा उद्योग करावयाचें मनांत आणिलें असतां, " माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनावर ॥ वाचा वदे परी करणें कठीण । इंद्रियां अधीन झालों देवा ॥ " अशी आपली स्थिति आहे हें ध्यानांत येतें. ही स्थिति दूर करण्याचा उपाय एकच. तो हा कीं, " आतां आड उभा राहें नारायणा । दयासिंधुपणा साच करीं ॥ ," अशा प्रकारें देवाची विनवणी करणें.

आड उभें रहाणें याचा दोन प्रकारें अर्थ करितां येईल. आपले अवगुण आपणांस ढळढळीत दिसले, आपल्या दुर्बलतेचा आपणांस पदोपदीं यःकश्चित् प्रसंगींही अनुभव आला, ह्मणजे आपल्यामध्यें कांहींच शक्ति नाहीं, असा आपला दृढ ग्रह होऊन, पक्षघातानें जसा मनुष्यास आपला हातपाय उचलतां येत नाहीं तद्वत्, आपणांस पुढें आपल्या खऱ्या हिताच्या साधनाविषयीं निराशा उत्पन्न होऊन, त्यासाठीं हातबोटसुद्धां हालवितां येणार नाहीं, अशी स्थिति होईल. यास्तव अशा प्रसंगीं, आपलें तत्त्वतः जें स्वरूप आहे, त्याच्यामध्यें व आपल्या दृष्टीमध्यें देव जर आपल्या दयाशील स्वरूपानें राहिला, तर अशा प्रकारची आपली निराशा होणार नाहीं. देवाचें दयामय स्वरूप ध्यानांत येऊन, त्याच्या दयेवर आपला पूर्ण भरंवसा बसून, आपणांस धीर येईल व आपल्या हातून उचित यत्न होईल.

किंवा दुसरा अर्थ असा कीं, आपणांस ओढून नेणारीं जीं मन व इतर इंद्रियें, त्यांच्यामध्यें व आपल्यामध्यें येऊन जर देव आड उभा राहिला आणि आपणांस त्यांच्या पगड्यांतून सोडवून आपल्या दयेचा आह्मांस त्यानें अनुभव दिला, तरच आपण सुटूं, नाहीं तर सुटणार नाहीं.

९. आपली दुर्बलता.

माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनावर ॥ १ ॥
आतां आड उभा राहें नारायणा । दयासिंधुपणा साच करीं ॥ २ ॥
वाचा वदे परी करणें कठीण । इंद्रियां अधीन झालों देवा ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझा जैसा तैसा दास । न धरीं उदास मायबापा ॥ ४ ॥

पूर्वीच्या लेखांत या अभंगाविषयीं थोडासा विचार केला आहे, या प्रसंगीं आणखी थोडासा विचार करूं.

या अभंगांतील उद्गार ज्या वेळेस तुकोबांच्या तोंडून निघाले त्या वेळेस त्यांच्या मनाची स्थिति अत्यंत खेदाची व निराशेची होती हें त्या उद्गारांवरून स्पष्ट होतें. कोणतीही वस्तु प्राप्त करून घेण्याविषयीं यत्न कर कर करावा, रात्रंदिवस विसांवा घेतल्याशिवाय जिवापाड श्रम करावे, परंतु शेवटीं ते यत्न व ते श्रम फुकट जावे, आणि इच्छिलेला हेतु कांहीं सिद्धीस जाऊं नये, यासारखें दुःखकारक या जगामध्यें काय आहे ? यासारखें दुःखकारक कांहींच नाहीं, ह्मणूनच तर विषयासक्तीपासून प्राकृतजनांस परावृत्त करण्यासाठीं साधुसंत वारंवार स्मरण करून देतात कीं, हे विषय नश्वर आहेत, अंतीं हे सर्व सोडून आपणांस जावें लागणार, ह्मणून त्यांच्या साठीं जे आह्मी इतके अनिवार श्रम करितों, जे महत् कष्ट सोशितों, ते शेवटीं फुकट जाणार. संसाराचे दास ज्याप्रमाणें ऐहिक विषयांच्या संपादनासाठीं खटपट करितात, त्याप्रमाणें किंवा अधिकच तुकोबांची परमार्थाविषयीं खटपट चालली होती. आपल्यामधील अवगुण नाहींसे करावे, कामक्रोधादि आध्यात्मिक रिपूंस जिंकून टाकावें, मनास विवेकाच्या सत्तेंत पूर्णपणें ठेवावें, इंद्रियांचें दमन करावें व देवास आळवावें हा त्यांचा हेतु. परंतु, सर्व खटपट करून पहातात तों, त्यांची पूर्वीप्रमाणेंच स्थिति, किंवा सुधारलीच असली तर त्यांच्या दृष्टीनें फारच थोडी. दुसरा एखादा असता, तर त्यानें म्हटलें असतें कीं, "इतकी खटपट करूनही प्राप्त न होणाऱ्या परमार्थाशीं काय करावयाचें आहे आपल्याला ? आपण आपला संसारच बघूं". आणि असें ह्मणणाऱ्याच्या दृष्टीनें एका अर्थी यांत कांहीं वाउगें नाहीं. पण याचें कारण काय कीं, देवाशिवाय चालविलेल्या संसारामध्यें कांहीं गोडी आहे असें त्याला वाटतें ह्मणून. परंतु तुकोबांस देवाशिवाय संसार नीरस, दर्शनीं गोड परंतु अंतरीं विषमय, व परमार्थच खरें कल्याण. तेव्हां, परमार्थसिद्धि होत नाहीं ह्मणून, त्याच्या मागें लागावयाचें सोडून देऊन संसारच आपला पाहीन, असें तुकोबांच्या स्वप्नींही येणें शक्य नव्हतें. एखादी ऐहिक वस्तु जर प्राप्त झाली नाहीं, तर ह्मणतां येईल कीं, "त्या वस्तूपासून माझें हितच कशावरून झालें असतें ? त्या वस्तूचा दुरुपयोग करून उलटें तिजपासून मीं आपलें अहितच कशा-

वरून करून घेतलें नसतें ? तेव्हां ती जी मला प्राप्त झाली नाहीं ती, माझें अहित तिजपासून होईल ह्मणून, देवानेंच कदाचित् मला प्राप्त होऊं दिली नसेल." व असें ह्मणून आपल्या मनाचें समाधान करून घेतां येईल. परंतु परमार्थाविषयीं तसा प्रकार नाहीं. परमार्थासाठींच तर आपलें इहलोकींचें जन्म. तेव्हां, तो प्राप्त झाला असतां कोणत्याच प्रकारें त्यामध्यें दोष नसतां आपणांस इतकी खटपट करूनही प्राप्त झाला नाहीं ह्मणून, तुकोबांस खेद होणें साहजिकच आहे. आणि, तशा प्रकारचा खेद होऊन, ते देवापाशीं उद्गार काढितात कीं, "माझे मज कळों येती अवगुण. अवगुण माझे मला कळत नाहींत असें नाहीं. माझ्या ध्यानांत न आल्यामुळें त्यांचा माझ्या अंतःकरणांत रिघाव झाला व ते तेथें सुखवस्तु होऊन राहिले, असें नाहीं. परंतु काय करूं, मन अनावर, मन चंचल, मनाचें संयमन करणें कठीण. संसार सुटावा ह्मणून अरण्यांत जरी जाऊन राहिलों, तरी मन तेथेंही दुसरा संसार उभा करील. तेव्हां, दोघे जण भांडत असले ह्मणजे तिसरा जसा मध्यें पडून दोघांस एकमेकांपासून दूर करितो त्याप्रमाणें, मी व माझें मन यांजमध्यें तूं उभा रहा." तुकोबांचा देवावर भरंवसा होता. देव सोडवील तरच आपण या मनाच्या नीच गुलामगिरींतून सुटूं, सुटण्यास दुसरा कांहीं उपाय नाहीं, अशी त्यांची खात्री होती.

पुढें ते ह्मणतात कीं, "वाचा वदे परी करणें कठीण, इंद्रियां अधीन झालों देवा." याचा अनुभव तुह्मां आह्मांस नेहेमींच येत आहे. तेव्हां आपल्या सामर्थ्यानें कांहीं आपण सुटण्याचा संभव नाहीं. यास्तव, "पडतां जड भारी। दासीं आठवावा हरी॥" या आपल्याच उक्तीप्रमाणें तुकोबांनीं केलें. देव आपला मायबाप, बाळकाचा घात झालेला मायबापांच्यानें पहावत नाहीं, तेव्हां देव आपला कांहीं घात होऊं देणार नाहीं, असें मनांत आणून देवाची विनवणी केली कीं, "तुझा जैसा तैसा दास। न धरीं उदास मायबापा. कसा झालों तरी मी तुझा दास, तूं माझा स्वामी, मायबाप आहेस. तेव्हां तूं मला दूर धरूं नको, जवळ कर व माझा प्रतिपाळ कर."

१०. मनुष्याचीं दोन अंगें.

तुज पहावें हे धरितों वासना ॥ परि आचरणा नाहीं ठाव ॥ १ ॥
करिशी कैवार आपुलिया सत्ता ॥ तरिच देखता होइन पाय ॥ २ ॥

—तुकाराम.

मनुष्यास दोन अंगें आहेत, एक चैतन्यरूपी आत्मा व दुसरें जड देह. दोन त्याचे स्वभाव, एक आध्यात्मिक उन्नतीकडेस ओढणारा, दुसरा ऐहिक सुखें व स्वहित यांकडेस ओढणारा. यांतील पहिला दुसऱ्याच्या तंत्रानें किंवा दुसरा पहिल्याच्या तंत्रानें सर्वदा चालतो असें साधारण लोकांमध्यें कधींच होत नाहीं. कांहीं प्रसंगीं एक प्रबल, कांहीं प्रसंगीं दुसरा प्रबल असतो. जो जो ज्या ज्या वेळीं प्रबल असतो, त्याच्या त्याच्या अनुरूप मनुष्य त्या त्या वेळीं क्रिया करितो. यामुळें त्याच्या आचरणामध्यें एकसूत्रीपणा नसतो आणि, ज्या वेळेस जशी सहजगत्या प्रवृत्ति होईल किंवा जशी लहर लागेल, त्याप्रमाणें त्याला वागण्याची अत्यंत संवय लागलेली असते. यामुळें, आपल्या आचरणामध्यें एकसूत्रीपणा नाहीं, एकदां एका प्रकारचें आचरण, दुसऱ्या वेळेस दुसऱ्या प्रकारचें आचरण, अशा प्रकारें आपल्या आयुष्यक्रमास धरबंध नाहीं हें किती विलक्षण, असें सुद्धां त्याला वाटत नाहीं; आणि त्या त्या वेळेस जो तरंग प्रबल असेल तदधीन तो मनुष्य होऊन, जणू काय दुसरा कोणताही त्याच्यामध्यें स्वभाव नाहीं, असें होतें; व, पशुपक्षी जसे आपल्या उपजत बुद्धीस अनुसरून वागतात त्याप्रमाणें जणू काय, तो तितक्या वेळापुरता वागतो. आपण कोणत्या प्रवृत्तिबीजास अनुसरून किंवा दोहोंपैकीं कोणत्या स्वभावास अनुसरून वर्तन करीत आहों याचा त्या वेळेस विचार देखील तो करीत नाहीं.

ज्यांनीं आपल्या पहिल्या स्वभावास किंवा विवेकास आपल्या दुसऱ्या स्वभावावर प्राधान्य दिलें नाहीं, विवेक हा केवळ इतर प्रवृत्तिबीजांप्रमाणेंच आणखी एक प्रवृत्तिबीज ज्यांचें होऊन राहिलें, त्यांची अशी स्थिति होते. ज्या वेळेस ते निश्चय करितात कीं या पुढें मोहाचा प्रसंग आला तर आपण त्यास वश होणार नाहीं, त्या वेळेस त्यांचा विवेक जागृत झालेला असतो व ते तो निश्चय अंतःकरणापासून करितात. परंतु अर्जुनाप्रमाणें गुडाकेश ते नसल्यामुळें, त्यांची निद्रा किंवा तन्द्रा त्यांच्या स्वाधीन नसल्यामुळें, ते स्मृतिशील नसल्यामुळें, ते खडा पहारा ठेवीत नाहींत, मोह त्यांस एकदम येऊन गांठतो, आणि ते गैरसावध असल्यामुळें त्याच्या फशीं ते पडतात. परंतु, विवेकास किंवा अंतरात्म्यास देहावरील राज्यपद दिलें असतां, आत्मसंयमाची आवश्यकता ध्यानांत आणून त्याविषयीं कळकळ बाळगली असतां, मोहास मनुष्यावर जय मिळविणें फार कठीण जातें.

याप्रकारें आपल्या आयुष्यक्रमावर अंतरात्म्यास अधिकार दिला ह्मणजे आत्मा व शरीर यांतील विरोध ध्यानांत येतो. इतके दिवस ज्या ज्या अंगाचें प्राबल्य ज्या ज्या वेळेस असेल त्या त्या अंगाच्या प्रवृत्तीस अनुसरून क्रिया घडत होत्या व दुसऱ्या अंगाचें त्या वेळीं भानही नव्हतें, ह्मणून अशा प्रकारचा झगडा कांहीं नव्हता. आतां आत्म्याच्या शुभ वासना एकीकडेस ओढितात व देहाच्या विषयवासना दुसरीकडेस ओढतात. आत्म्याच्या मनांत एका मार्गानें जावयाचें असतें; परंतु, शरीराशीं तो बद्ध असल्यामुळें, शरीर जर त्याला वश नसलें तर त्याचें कांहीं चालत नाहीं. याप्रमाणें मनांत असलेलें करतां न येणें, वारंवार केलेले निश्चय न टिकणें, शुभाचा त्याग घडणें वगैरे जे पापीपणाचे प्रकार ते प्रत्ययास येतात.

मनुष्यांचा या जगाशीं संबंध बहुतकरून पुढें सांगितलेल्या तीन प्रकारांपैकीं कोणत्या तरी एका प्रकारचा असतो. सर्वथा आपल्या शुभ मतीस अनुसरून जगांतील आपले सर्व व्यापार घडतील असें होण्याचें कधींच संभवत नाहीं, असें वाटून जगापासून अलिप्त राहून शुभ जें आहे त्याचें कित्येक एकटे एकटेच चिंतन करीत रहातात. व याप्रकारें ते आपल्या आयुष्यक्रमामध्यें एकसूत्रीपणा आणतात. दुसरा प्रकार याच्या अगदीं उलट आहे. त्याचें अवलंबन करणारे लोक डोळ्यांपुढें दिसणारें जग व त्यांतील विषय यांमध्येंच कायावाचामनेंकरून अगदीं मग्न होतात व आपल्या धर्मप्रवृत्तीस विसरून जातात. पहिल्या वर्गांतील जन दृश्य लोकाकडेस डोळेझांक करितात. दुसऱ्या वर्गांतील अदृश्य लोकाकडेस डोळेझांक करितात. धर्मास अनुसरून जगांतील सर्व व्यवहार करून धर्म व संसार यांचा मिलाफ करणें हें जें आपलें मुख्य कर्तव्य तें करावयास या दोहोंपैकीं एकाही प्रकारचे लोक पहात नाहींत. साधारण जे लोक आहेत ते तिसऱ्या वर्गांतील आहेत. धर्माचा अवतार संसारामध्यें करावयाचा अथवा संसार धर्ममय करावयाचा याविषयीं त्यांची इच्छा खरी, परंतु यत्न करावयाचा तो दुबळ्यासारखा, कधीं कधींच, व अपुरतेपणें; आणि त्यामुळें, वारंवार आत्म्याच्या शुभ प्रवृत्तीचें मोहापुढें कांहीं न चालणें, व आपण पाप करीत आहों असें धडधडीत वाटत असून हातून पाप होणें, असे प्रकार होतात. आपलें जगांत मुख्य कर्तव्य काय हें या स्थितीमध्यें ओळखिलें असल्यामुळें जरी एका प्रकारें ही स्थिति चांगली असली, तरी इच्यामध्यें दुःख किंवा मनाच्या आधि फार; कारण अंतःकरणामध्यें सतत दोन प्रवृत्तींचा विरोध चाललेला असतो, आत्मा व शरीर यांचा झगडा चाललेला असतो. या झगड्यांतून पहिल्या दोन वर्गांतील लोक सुटले, परंतु त्यांच्या अंतःकरणांतील जी शांति त्या शांतीपेक्षां तिसऱ्या वर्गांतील लोकांच्या मनांतील आधि बरी.

या तिसऱ्या वर्गांतील लोकांच्या आध्यात्मिक स्थितीविषयीं आह्मांस विचार कर्तव्य आहे. जी उचित गोष्ट करावी असें मनांत येतें ती होत नाहीं व जी अनुचित गोष्ट करूं नयेसें वाटतें ती होते, ह्मणजे आत्म्याच्या इच्छेस शरीर हाणून पाडतें, हा असा प्रकार ज्या कारणांनीं घडून येतो तीं कारणें अनेक प्रकारचीं असतात.

आपल्या अंतःकरणामध्यें शुभाविषयीं प्रवृत्ति उत्पन्न होते, शुभ विचार मनामध्यें उत्पन्न

होतात, त्यामध्यें आपला कांहीं मोठेपणा नाहीं. आपण कांहीं त्यांना उत्पन्न करीत नाहीं. देवाचा अनुग्रह तो. ते विचार ह्मणजे केवळ अमुक अमुक करण्याविषयीं आपल्या अंतः- करणांत होणारी देवाची आज्ञा. त्यांस आचारांचें रूप देऊन जेव्हां आपलेसे करूं तेव्हां ते आपले, किंवा जितक्या प्रमाणानें करूं तितक्या प्रमाणानें ते आपले. अंतःकरणामध्यें सत्य, दया, क्षमा वगैरेंची जी स्फूर्ति होते, त्या स्फूर्तीप्रमाणें वागावयास सतत कायावाचामनेंकरून झटणें यांतच आपणांस आनंद, यांतच आपला चांगुलपणा; त्या स्फूर्तीमध्यें कांहीं इतका नाहीं. परंतु ज्या वेळेस हे शुभ विचार अंतःकरणामध्यें उद्भवतात त्या वेळेस त्यांचा इतका विशेष जोर असतो व त्यांपासून मनामध्यें एका प्रकारचें विलक्षण समाधान इतकें वाटतें कीं, ते विचार आपलेच असें आपणांस वाटतें व ते खरोखरी आपले असें केव्हां ह्मणतां येईल हें विसरतों. आपण जे पुष्कळदां कांहींतरी वचन देतों परंतु त्याप्रमाणें आपणांकडून होत नाहीं, याचें कारण वस्तुस्थिति अशी आहे हेंच. वचन अंतःकरणपूर्वक देतों आणि, जेव्हांच्या तेव्हांच आचाराचें स्वरूप प्राप्त करून घेण्याचें जर विचाराच्या स्वाधीन असतें तर, आपण त्याप्रमाणें करूंही. परंतु मनांतील सुविचार आपलेचसे वाटून आपल्याविषयीं घमेंडी वाटते व आपलें वचन पार पाडण्यास किती कष्ट सोसावे लागणार याचा विचार आपण मुळींच करीत नाहीं. आपणांस शरीर ह्मणून कांहीं आहे व त्या शरीरास सुख व चैन हीं प्रिय आहेत, ही गोष्ट विसरतों आणि वचन देतों. नाहींतर, वचन देतेवेळेस जर या गोष्टी ध्यानांत आणूं तर, आह्मीं वचन न देतां जें करावयाचें मनांत येतें तें करण्याविषयींचे उदार संकल्प मात्र करूं.

तसेंच शरीराचा विचार मनांत न आणतां दुरून कर्तव्याचा विचार केला असतां कर्तव्य सुकर वाटतें, परंतु करूं जातां कठिण जातें. हें जें महद् अंतर त्या अंतराच्या संबंधानें आधींच जर तरतूद केली नाहीं तर आत्म्यास आपल्या इच्छेप्रमाणें शरीर वर्तूं देत नाहीं. शरीराचें मांद्य व राजद्रोहीपणा ध्यानांत आणून त्याजवर जर प्रार्थनारूप पहारा ठेविला नाहीं तर, योजिलेलें कर्तव्य करण्याच्या ऐन प्रसंगीं कर्तव्याचा आपला भाग करावयास शरीर मागें घेईल. परंतु, जर आपण आपले गुणदोष, बलाबल देवास निवेदन करून त्याजवर सर्व भरिभार घालूं, "करिशी कैवार आपुलिया सत्ता ! तरिच देखता होइन पाय ॥" असें तुकोबांप्रमाणें ह्मणूं, तरच पूर्वीं ध्यानांत न ठेविलेला जो देह त्याजकडून अकस्मात् येणाऱ्या अडचणी नाहींशा करण्याची आपली सिद्धता होईल.

कधीं कधीं आंगचेंच आलस्य, क्रोध, विस्मृतिशीलता किंवा असाच कांहीं दुसरा दुर्गुण किंवा व्यसन आपल्या ठायीं असतें व तें आपल्या आत्म्याच्या इच्छेच्या आड निरंतर येतें व आपल्या आयुष्याचें मातेरें करून टाकतें.

कधीं कधीं ईश्वरेच्छेनें घडून येणाऱ्या आघातापासून आत्म्याचीच वृत्ति चळते. ज्या महाभागी पुरुषाच्या संसर्गानें आपली मति स्थिर राहिली होती, त्यास काळ अकस्मात् घेऊन जातो. किंवा या जगांतील आपल्या सर्व सुखाचें निबंधन व आपल्यावर प्रेम

करणारी अशी व्यक्ति मृत्युवश होते. कदाचित् कलुषित चरित्राच्या व्यक्तीशीं आपला संबंध जडतो. कदाचित् अशा प्रकारचा अपरिचित प्रसंग आपल्यावर येतो कीं, त्यावेळेस आपल्या विचारांस न सोडतां कसें वागावें हें कळत नाहीं. हे सर्व प्रसंग आमची श्रद्धा, आमचा भाव व आमचें अवधान यांस कसोटीस लावितात व तीं अस्सल नसलीं तर आपली वृत्ति पालटून टाकितात. निरंतर देवाची प्रार्थना करून व सर्वदा सावधान राहून आपणांस त्यांचें बळ मोडितां येईल.

कधीं कधीं वर ज्यांचा उल्लेख केला आहे अशा दुर्गुणांचें किंवा व्यसनांचें पुष्टीकरणच आह्मी करितों. सावधान राहून आपणांस शरीराच्या सत्तेंतून सोडविण्याविषयीं देवाची प्रार्थना करण्याच्या ऐवजीं त्या दुर्गुणांपासून उत्पन्न होणाऱ्या मोहास हात पसरून आपण जवळ बोलावितों, व अशा प्रकारें त्या दुर्गुणांस वारंवार क्षुब्ध करून, अंतीं आपल्या आत्म्याची शुभ मार्गानें जाण्याची इच्छाही नाहींशी होईल असें करितों.

याप्रमाणें शुभाकडेरा प्रवृत्ति हा आत्म्याचा स्वभाव; कष्ट व दुःख यांपासून आंग चोरण्याचा देहाचा स्वभाव. परंतु क्रियांचें साधन जो देह त्यावर पूर्ण सत्ता चालविण्यास आवश्यक जें बळ तें आत्म्यास देवापासून सदासर्वकाळ मिळण्यासारखें आहे, तें मिळविलें मात्र पाहिजे. मिळविल्यावर आत्मा व देह एका तंत्रानें सुरळीतपणें चालून दोघेही उन्नतीप्रत पावतील.

११. व्यवसायांनीं रंगलेला जीव.

एकविध वृत्ति न राहे अंतरीं । स्मरणींच हरि विस्मृति हे ॥ १ ॥
कैसा हा नवलाव वाटतो अनुभवें । मज माझ्या जीवें साक्षित्वेसीं ॥२॥
न राहे निश्चळ जागवितां मन । किती क्षणोक्षण सांवरावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे बहु केले वेवसाव । तेणें रंगें जीव रंगलासे ॥ ४ ॥

मन चंचल, मनाचा वेग वायूप्रमाणें आहे. वायूचा निग्रह करणें जसें कठीण तसेंच मनाचा निग्रह करणें कठीण. ज्याला ज्याला मन एकाग्र करण्याची आवश्यकता वाटते किंवा एकाग्र करण्याचे प्रसंग येतात, त्याला त्याला या गोष्टीचा नेहेमींचा अनुभव आहे. आणि मन एकाग्र करण्याचे प्रसंग सर्व प्रकारच्या लोकांस पावलोपावलीं येतात. देवाची प्रार्थना, ध्यान, किंवा दुसरें कांहीं देवाचें कार्य करणारासच तें करतेवेळीं मनाचा निग्रह केला पाहिजे अशी साधारणपणें समजूत आहे. परंतु विषयांचें ध्यान करणारे जे त्यांनांही आपल्या इच्छिलेल्या विषयांची सिद्धि करून घेण्यासाठीं मनाचा निग्रह करावा लागतोच. कोणतीही वस्तु सिद्ध करून घेण्यास तिच्या मानानें कष्ट करावे लागतात; व कष्ट मनुष्यास इतके अप्रिय आहेत कीं, मनाच्या निग्रहावांचून ते मनुष्याच्या हातून होऊं शकत नाहींत. इतकें मात्र खरें आहे कीं, मनुष्याच्या मनास विषयांची गोडी अधिक असल्यामुळें विषयांची प्राप्ति करून घेण्यासाठीं तशा प्रकारचा निग्रह करणें पुष्कळ जणांस सोपें जातें. परमार्थप्राप्तीसाठीं मनाचा निग्रह करणें बरेंच कठीण जातें.

अशा प्रकारचा आपला अनुभव तुकोबांनीं वरील अभंगांत सांगितला आहे. अंतर्वृत्ति एकविध रहात नाहीं. देवाचें स्मरण करावयास जावें तर स्मरण करतां करतांच विस्मृति पडते. ज्या वेळेस दुसऱ्या गोष्टींमध्यें मन घातलेलें असतें, किंवा तें आपणच होऊन गुंग झालेल असतें, अशा अन्य प्रसंगीं विस्मृति पडली तर कांहीं नवल नाहीं. परंतु अमुक एक कार्य करीत असतांनांच आपण काय कार्य करीत आहों याचें विस्मरण पडून तें कार्य करावयाचें रहाणें यासारिखें दुसरें काय आश्चर्यकारक आहे? परंतु तेंही आपल्याकडून घडतें. इंद्रियांच्या द्वारें कोणताही उद्योग करीत असतां निद्रेचा पगडा हळूहळू किंवा एकदम सुद्धां बसून जसा मनुष्याचा सर्व व्यापार हळूहळू किंवा एकदम बंद पडतो, किंवा थोडा वेळ तसाच चालत राहिला तर बाह्यतःच चालतो, तशा प्रकारची स्थिति शारीरिक निद्रा नसतांही देवाच्या स्मरणाच्या वेळीं होते. मोठें आश्चर्य! हें जर दुसऱ्या कोणीं सांगितलें असतें तर खरें सुद्धां वाटलें नसतें. आपला आपणाला अनुभव आहे, आपली आपणांस साक्ष याविषयीं आहे, ह्मणून हें खरें वाटतें. मनाला कितीही जागें राखावयास पहावें, कितीही क्षणोक्षणीं सांवरून पुनः पूर्वस्थितीवर आणावें, परंतु कांहीं इलाज चा-

लत नाहीं. तें कांहीं निश्चळ रहात नाहीं. वेताळपंचविशींतील वेताळ जसा पुनःपुनः विक्रमाच्या हातून निसटून झाडास लटकून रहात असे त्याप्रमाणें दुसऱ्या ज्या तरंगांमध्यें तें पूर्वी मग्न झालें होतें त्या तरंगांमध्येंच जाऊन तें बुडी घेतें. याचें कारण काय कीं, पुष्कळ व्यावहारिक व्यवसाय किंवा उद्योग जे आपण करितों त्या व्यवसायांच्या रंगानें हा जीव रंगला आहे आणि त्यावर दुसरा भक्तीचा रंग कांहीं चढत नाहीं.

आपणांस ठाऊक आहे कीं, आपण जर अतिशय वेगानें धांवत चाललों तर अमुकच ठिकाणीं आपणांस कांहीं एकदम सर्व वेग आटोपून थांबतां येत नाहीं, अमुकच ठिकाणीं एकदम वळतां येत नाहीं. तसेंच आपण एकसारखें आपल्या भोंवतींच कांहीं काळ वाटोळें फिरत राहून थांबलों किंवा हालणाऱ्या जहाजांतून प्रवास करून जमिनीवर उतरलों, तर वाटोळें फिरतेवेळीं किंवा जहाजांत असतांना जी गति आपल्या शरीरांत होती, त्या प्रकारची गति आपल्या ठिकाणीं नंतरही प्रत्येकाच्या प्रकृतीच्या मानानें थोडाबहुत वेळ रहाते. हा बाह्य सृष्टीचा नियम आहे व तो सर्वांस ठाऊकही आहे. हाच नियम अंतःसृष्टीसही लागू आहे. देवाच्या स्मरणाच्या पूर्वीं मनाचे जे व्यापार चालले होते, मनाची जी गति होती, त्या व्यापारांचा किंवा गतीचा मनावर संस्कार रहातो. तो संस्कार कांहीं एकदम नाहींसा करितां येत नाहीं.

तर परमेश्वराच्या चिंतनाच्या वेळेस अशा प्रकारच्या मनाचा निग्रह कशानें होणार ? गीतेंत सांगितल्याप्रमाणें अभ्यासानें व वैराग्यानें, हें तर खरें आहेच. पुनःपुनः यत्न करून देवाच्या स्मरणाच्या वेळीं मन देवाच्याच ठायीं निश्चळ राहील अशी त्यास संवय लाविली पाहिजे व त्याचा जो विषयांवरील " राग " ह्मणजे प्रीति ती कमी केली पाहिजे, किंवा तुकोबांची रंगाची उपमा घेऊन, त्या मनावर चढलेला जो विषयांचा "राग" ह्मणजे रंग तो उतरला पाहिजे. शिवाय वेगानें जाणारी वस्तु अमुकच ठिकाणीं थांबवावयाची असली ह्मणजे तें ठिकाण येण्याच्या पूर्वींच जसा तिचा वेग हळूहळू कमी करून ती निश्चित ठिकाणीं थांबवितात, त्याप्रमाणेंच देवाच्या स्मरणाच्या किंवा ध्यानाच्या वेळीं मनाची तयारी केली पाहिजे. तो वेळ येण्याच्या पूर्वींच कांहीं काळ अगोदर देवाविषयीं विचार मनांत आणावयास लागलें पाहिजे. तसेंच हा जो अनेक व्यवसायांचा रंग मनावर चढला आहे तोही हळूहळू उतरण्याविषयीं सुरुवात केली पाहिजे. सर्वदा अधिक अधिक चढत असलेला हा रंग कांहीं एकदम उतरावयाचा नाहीं. आतांच सांगितल्याप्रमाणें देवाविषयीं अगोदर विचार करावयास लागूनच हा उतरण्याचा व भक्तिरंग चढण्याचा कांहीं तरी संभव.

१२. तुकोबांची काकुळतीची दशा.

कुरंगीपाडस चुकलेंसे वनीं ।
फुटे दुःखेंकरोनि हृदय त्याचें ॥ १ ॥
तैसा परदेशी झालों तुजवीण ।
नको हो निर्वाण पाहूं माझें ॥ २ ॥
अपराधांच्या कोटी घालीं सर्व पोटीं ।
नको या शेवटीं उपेक्षूं गा ॥ ३ ॥
तुका ह्मणे असों द्यावी माझी चिंता ।
कृपाळु अनंता पांडुरंगा ॥ ४ ॥

हरिणाची जात फार भित्री आहे. जरी हरिणांस शिंगें असलीं तरी व्याधापासून व हिंस्र सावजांपासून पळण्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही उपायानें त्यांस आपलें रक्षण करितां येत नाहीं. त्यांनां कोल्ह्यासारखे डावपेंचही ठाऊक नसतात. असें हरिण जर आपल्या कळपांतून चुकून अरण्यामध्यें एकटें राहिलें तर त्याची फारच भयंकर स्थिति होते. त्यांत तें जर हरिण मोठें असलें तर त्याला कांहीं तरी धीर. कोणत्या रीतीनें कोणत्या बाजूनें पळून जाऊन, कोणती सावधगिरी राखून, आपण आपल्या शत्रूस टाळून कळपास जाऊन मिळावें, याची अनुभवानें कांहीं तरी त्यास माहिती असण्याचा संभव. परंतु तेंच जर पाडस असलें तर आत्मरक्षणाचे उपाय सुचविण्याच्या व योजण्याच्या संबंधानें सर्वथा आपल्या आईवर तें अवलंबून असतें. त्याला कांहीं अनुभव नसल्यामुळें तसले उपाय सुचावयाचे नाहींत. ह्मणून असें जर पाडस अरण्यामध्यें चुकून एकटें मागें राहिलें तर त्याची स्थिति अत्यंत धोक्याची व त्याचा नाश बहुतांशीं निश्चितच. अशी आपली स्थिति पाहून लाक्षणिक रीत्याच त्याचें हृदय फुटेल असें नाहीं तर केवळ भीतीनें खरोखरीच त्याचा प्राणांतही होईल. अशा पाडसाची जी स्थिति तीच स्थिति आपली असें तुकोबांनीं जाणलें व वरील उद्गार त्यांच्या तोंडावाटे निघाले. आपल्यास देवाची व्हावी तशी प्राप्ति न झाल्यामुळें, त्या पाडसाची जशी परदेशीपणाची स्थिति, तशीच आपलीही असें वाटून, सर्व धैर्य गळून त्या पाडसानें जसें भयभीत व्हावें त्याप्रमाणें, ते भयभीत झाले.

स्वदेशीं जसें आपणांस चैन पडतें तसें परदेशीं गेलों ह्मणजे पडत नाहीं. कधीं कधीं आपणांस परदेशाची भाषा ठाऊक नसते. ह्मणून आपल्या मनांत काय आहे तें दुसऱ्यास बोलून दाखवितां येत नाहीं,दुसऱ्याच्या मनांतलें आपणांस कळत नाहीं. अडचणीच्या प्रसंगीं स्वदेशांतील आपल्या जवळच्या माणसांकडून जशी आपल्यास मदत होईल तशी परदेशीयांकडून व्हावयाचा

संभव कमी. ही साधारण नेहेमींच्या परदेशीपणाची स्थिति. जिकडे मनुष्याचें वारेंही नाहीं अशा एखाद्या निर्जन प्रदेशामध्यें जर कोणी माणूस जाऊन पडला व त्याजपाशीं शस्त्र किंवा हत्यार कांहीं नसलें, तर त्याची स्थिति कांहीं पुसावयासच नको. आपल्या साउलीसही तो भितो. लोकांमध्यें असला ह्मणजे माणसांची घाण येऊन एकान्त कितीही त्यास प्रिय असो, वर सांगितलेल्या प्रकारचा एकान्त कांहीं त्यास सहन होत नाहीं. तुकोबांनीं वर्णिलेली आपली परदेशीपणाची स्थिति अशा प्रकारची, व त्यामुळें कुरंगीच्या पाडसाप्रमाणें त्यांचेंही हृदय दुःखानें फुटूं लागलें. अनेक ठिकाणीं आपल्या अंतःकरणाची अशा प्रकारची स्थिति त्यांनीं वर्णिली आहे. " जीवनावांचोनी तळमळी मासा । प्रकार हा तैसा होतो जीवा ॥ न सांपडे झालें भूमिगत धन । चरफडी मन तया परी ॥ मातेचा वियोग झालिया हो बाळा । तो कळवळा जाणा देवा ॥ " असें एके ठिकाणीं त्यांनीं ह्मटलें आहे.

अपराधांच्या कोटी ह्मणजे त्यांनीं उपलक्षित जे कामक्रोधादि मनोविकार त्यांच्यामुळें त्यांस परदेशीपणा आला होता. "कामक्रोध आड पडले पर्वत । राहिला अनंत पलीकडे ॥ नुलंघवे मज न सांपडे वाट । दुस्तर हा घाट वैरियांचा ॥." त्यांचा जो स्वदेश, ह्मणजे देवाचा जो गांव, त्याच्यामध्यें, व ज्या परदेशामध्यें ते पडले होते त्याच्यामध्यें, हे मोठे बिकट घाट होते. किंवा दुसऱ्या एका ठिकाणीं त्यांनीं ह्मटल्याप्रमाणें त्या परदेशामध्यें "कामक्रोधादि सावजें थोर । दिसताती भयंकर॥" व त्यांची त्यांनां भीति वाटली. अशा प्रसंगीं त्यांनीं देवाचा धांवा केला; व आपली उपेक्षा करूं नकोस, आपला अंत पाहूं नकोस, अशी त्याची विनवणी केली.

आतां तुकोबांस भक्ति प्रिय होती, देव प्रिय होता, तेव्हां देवावांचून परदेशी झालों असें त्यांस वाटलें, भीति वाटली, व त्यांनीं देवाचा धांवा केला, हें योग्यच आहे. परंतु वरील त्यांच्या वचनांचा आमच्याशीं काय संबंध? आमच्या मनाची कांहीं स्थिति त्यांच्याप्रमाणें झाली नाहीं, आह्मांस कांहीं काळजी किंवा भीति वाटत नाहीं. तर आह्मांस त्यांच्या उक्तीचा काय उपयोग? याला उत्तर हें कीं, आह्मांस त्यांच्याप्रमाणें काळजी किंवा भीति वाटत नाहीं, हेंच आपलें दुर्दैव. विचार जर केला तर आपली आध्यात्मिक स्थिति त्यांच्यापेक्षां सहस्रपट वाईट आहे हें कबूल करावें लागेल. या सृष्टीचा कोणी कर्ता व शास्ता आहे, व त्याच्या संबंधानें आणि त्यानें निर्मिलेल्या मनुष्य व इतर प्राण्यांच्या संबंधानें आपणास कांहीं कर्तव्य आहे, व या जगामध्यें त्याची भक्ति करून आपली उन्नति करून घेणें हाच काय तो आपला मुख्य धर्म, असें जो मानितो त्यास हें कबूल केलेंच पाहिजे. परंतु ही गोष्ट बिंबावी किंवा ठसावी तशी कोणाच्याही मनांत ठसत नाहीं; म्हणून आह्मी निर्धास्त रहातों. तर ती मनामध्यें पूर्णपणें बिंबेल व जोंपर्यंत आपली सध्यांची स्थिति बदलली नाहीं तोंपर्यंत तुकोबांच्या मनाच्या स्थितीप्रमाणें आपल्या मनाची स्थिति होईल, व दुःखेंकरून आपलेंही हृदय फुटेल, अशाविषयीं सतत यत्न चालविला पाहिजे.

---

१३. प्रपंचाविषयीं योग्य विरक्ति.

जाणोनि नेणतें करीं माझें मन । तुझी प्रेमखूण देऊनियां ॥ १ ॥
मग मी व्यवहारीं असेन वर्तत । जेवीं जळाआंत पद्मपत्र ॥ २ ॥
ऐकोनि नाइकें निंदास्तुति कानीं । जैसा कां उन्मनी योगिराज ॥ ३ ॥
देखोनि न देखें प्रपंच हा दृष्टि । स्वप्नींचिया सृष्टि चेविल्या जेवीं ॥४॥
तुका ह्मणे ऐसें झालियावांचून । करणें तें तें शीण वाटतसे ॥ ५ ॥

"देखोनि न देखें प्रपंच हा दृष्टि" असें तुकोबांनीं या अभंगामध्यें देवापाशीं मागणें मागितलें आहे. "सर्व संसाराचा त्याग करून रानावनामध्यें एकटें राहून सर्वकाळ तुझें ध्यान, भजन व पूजन यांशिवाय दुसरें कांहीं करूं नये अशी मला बुद्धि दे, अशी माझी प्रवृत्ति कर", असें कांहीं त्यांनीं मागितलें नाहीं. संसारामध्यें राहिलेंच पाहिजे हें जाणून, संसारांतील अनेक विषय देवामध्यें व आपणामध्यें जें अंतर पाडतात तें अंतर मात्र त्यांनीं पाडूं नये, या गोष्टीच्या संबंधानें प्रपंचामध्यें आपण असूनही त्यामध्यें आपण नाहीं अशा प्रकारची आपली स्थिति असावी, असें त्यांस वाटलें.

आपलीं इंद्रियें आपल्या मनास जोरानें विषयांकडेस ओढून नेतात, व आह्मी विषयां-विषयीं इतके लुब्ध होऊन जातों कीं, त्यांच्या पलीकडेस दुसरी कांहीं गोष्ट आहे याचें आह्मांस भान रहात नाहीं. आह्मी त्यांच्याच मागें लागून देवास विसरतों व इच्छिलेले विषय खोट्यानाट्या उपायांनींही प्राप्त करून घ्यावयास पहातों. यास्तव, अशा प्रकारें आपलीं इंद्रियें व आपलें मन विषयांकडेस आकर्षिलीं जाऊं नयेत ह्मणून, ज्या ठिकाणीं ते विषय नाहींत त्या ठिकाणीं गेलें असतां आपण विषयांच्या पगड्यांतून सुटूं असें वाटून, कित्येक लोक एकांतांत जाऊन राहतात. परंतु जर मनाचा व इंद्रियांचा निग्रह त्यांस साधला नसला तर रानांत जाऊन तरी त्यांची इच्छिलेली कार्यसिद्धि होईल काय? रानांत गेलें ह्मणून "हें नासारंध्र बुझालें । परिमळ नेघे " अशी स्थिति होईल काय? तिकडेसही ते आपलीं सर्व इंद्रियें घेऊन जातात, व तिकडेसही इंद्रियांचे विषय आहेत.

तसेंच साधूंचें कर्तव्यच आहे कीं, लोकांस बोध करून आपल्यासारिखें करावें. भगवद्गीतेमध्यें सांगितल्याप्रमाणें जेव्हां जेव्हां धर्माची ग्लानि होते, तेव्हां तेव्हां धर्माची पुनः संस्थापना व्हावी ह्मणून देवच, अर्थात् साधुपुरुषाच्या रूपानें, या जगामध्यें अवतरतो. जर असे साधुपुरुष रानामध्यें जाऊन राहिले तर ही धर्माची संस्थापना कशी घडेल?

शिवाय, जर आपल्या सर्व मनोवृत्ति समूळ काढून टाकिल्या, तर जड पाषाणामध्यें व माणसामध्यें कांहीं भेद राहणार नाहीं. भक्ति हाही अंतःकरणाचा एक भावच आहे, त्यासही जागा राहणार नाहीं. जर अंतःकरणाचे सर्व भाव नाहींसे करणें यामध्येंच सारें सार्थक्य

असतें, तर हे मनोभाव आपल्यामध्यें देवानें कां उत्पन्न केले असते? तसेंच, परोपकारबुद्धि, न्यायबुद्धि, दयाशीलता वगैरे ज्या ज्या गुणांनीं साधूंनां साधुत्व येतें, ते ते गुण अंतःकरणाचे भावच आहेत.

तर खरोखरी ह्मटलें ह्मणजे या मनोभावांचा त्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें आपल्यामध्यें विकासच झाला पाहिजे. ते योग्य स्थळीं, योग्य काळीं व योग्य प्रमाणानेंच आपल्या अंतःकरणामध्यें उत्पन्न होऊन त्यांचा आपल्या कृतींवर परिणाम झाला पाहिजे. उलट प्रकार होऊन त्यांस मनोविकार ही संज्ञा कधींही प्राप्त होतां कामा नये. ऐहिक संपत्ति व ऐश्वर्य प्राप्त झालें असतां अभिमान, लोभ, अंतःकरणाचा कठिणपणा वगैरे अनेक विकार अंतःकरणामध्यें उत्पन्न होतात. आपण कांहीं चांगलें कृत्य केलें तर जी स्तुति होते ती ऐकून गर्व उत्पन्न होतो, व स्तुतिच अत्यंत प्रिय होऊन बसते. ती इतकी कीं स्तुतिच व्हावी व निंदा होऊं नये ह्मणून लोकांस अप्रिय असें आपलें कर्तव्यही आपण करावयाचें सोडून देतों. मनुष्यांमध्यें संसारामुळें अशा प्रकारचे अनेक विकार होतात. परंतु या जगामध्यें येऊन जें आपलें मुख्य कर्तव्य तें सदा दृष्टीपुढें ठेवून त्यास आपण कधींही मुकणार नाहीं अशा रीतीनें जर वागलों, जर संसारामध्यें राहून आपले सद्भाव विकास पावतील अशा प्रकारचें आचरण केलें, जर संपत्ति, विपत्ति, सुख, दुःख वगैरे ऐहिक गोष्टींचा त्या सद्भावांवर कांहीं वाईट परिणाम होऊं न देतां चांगलाच परिणाम होईल असें केलें, तर ती स्थिति वरील अभंगांत वर्णिलेली स्थितिच झाली. व्यवहार आहे खरा, परंतु त्याच्या वाईट परिणामाच्या संबंधानें पाहातां त्याचा जसा केवळ आपणांस स्पर्शच नाहीं. निंदास्तुति होत आहे खरी, परंतु परिणाम पाहिला तर त्याचा आपल्या वरती कांहीं दिसत नाहीं; जणूं काय ती आपल्या कानींच पडत नाहीं. संसार पाहिला तर, सर्व व्यक्तींवर नेहेमीं होत असलेला जो त्याचा परिणाम आपणांस दिसतो, तो मुळींच नाहीं; जणूं काय त्या संसारास खरें अस्तित्वच नाहीं.

ह्मणून संसारामध्यें आपणांस जें सुख प्राप्त होईल त्याचा त्याग केला पाहिजे असें नाहीं; तें ज्यापासून प्राप्त झालें त्या ईश्वराचे आभार मानून योग्य रीतीनें त्याचा उपभोग घ्यावा. दुसऱ्यास अन्नोदक देऊन सुखी करावें असें सर्व धर्मांमध्यें सांगितलें आहे. परंतु, अन्नोदकाचें सेवन करून सुखी होणें ह्मणजे व्यर्थ संसारामध्यें आपणांस गोंवून घेऊन आपल्या खऱ्या कल्याणास मुकणें असें जर होतें, तर अन्नोदकाचा परोपकार करा असा उपदेश करणें ह्मणजे दुसऱ्यास संसारांत गोंवा आणि आपण मात्र त्यांतून निसटून जा असा उपदेश करण्यासारखें होतें. तर संपत्तीचा व ऐश्वर्याचा योग्य रीतीनें उपभोग घ्यावा. तसेंच दुःख किंवा विपत्ति प्राप्त झाली असतां, न डगमगतां, कोणत्याही रीतीनें आपली मति अशुभ होऊं न देतां, त्यांचा यथाशक्ति परिहार करण्यास यत्न करावा. संसारामध्यें असा कांहीं गुण नाहीं कीं त्यापासून मनुष्य आपल्या शाश्वत कल्याणास मुकलाच पाहिजे. तो कल्याणकारक किंवा अकल्याणकारक होणें हें तो कर-

ण्याच्या प्रकारावर सर्वथा अवलंबून आहे, व हें साधुसंतांच्या चरित्रांवरून उघड होतें. सर्व संसार जो करावयाचा तो देवानें लावून दिला ह्मणून करावयाचा; ईश्वर आपल्या संनिध आहे हें सर्वकाळ लक्ष्यांत बाळगून तो जेणेंकरून संतुष्ट होईल अशा रीतीनेंच सर्व कृत्यें करावयाचीं. जर मनास अशा रीतीचें आपण वळण लाविलें नाहीं, तर जे जे भजनपूजनाचे इतर प्रकार आपण करूं ते सर्व शीण मात्र होत, त्यांपासून कांहीं फळ प्राप्त व्हावयाचें नाहीं. संसार करण्याचा हा प्रकार तुकोबांच्या दुसऱ्या एका अभंगामध्यें चांगल्या रीतीनें वर्णिला आहे. त्याचा पहिला चरण " आला भागासी तो करीं वेवसाव । परी राहो भाव पायांपाशीं " असा आहे.

१४. देह व इंद्रियें यांचा योग्य उपयोग.

येणें मुखें तुझे वर्णी गुणनाम । तेंचि मज प्रेम देई देवा ॥ १ ॥
डोळे भरोनियां पाहें तुझें मुख । तेंचि मज सुख देई देवा ॥ २ ॥
कान भरोनियां ऐकें तुझी कीर्ति । ते मज विश्रांति देई देवा ॥ ३ ॥
वाहें रंगीं टाळी नाचेन उदास । हें देई हातांस पायां बळ ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझा सकळ देहभाव । आणिक नको ठाव चिंतूं यासी ॥५॥

प्रेम, सुख, विश्रांति, शरीराचें आरोग्य व बळ या गोष्टी साधारणतः सर्वांस इष्ट आहेत व त्या मिळविण्याविषयीं सर्वांचा नेहेमीं उद्योग सतत चाललेलाच असतो. आपल्यावरती लोकांनीं प्रेम करावें अशी इच्छा असतेच. परंतु आपल्याही प्रेमास कोणता तरी विषय असावा अशा प्रकारची माणसाची आवड फार असते. ज्याच्या वरती प्रेम ठेवितां येईल अशा प्रकारचा माणूस जर आपल्यास मिळाला नाहीं, तर एखादा पशु, पक्षी किंवा इतर प्राणी, अथवा निर्जीव वस्तु तरी आपण बाळगितों, व त्याजवर प्रेम करितों. त्याजपासून आपणांस कोणताही दृश्य लाभ प्राप्त होवो न होवो. तो प्रेमाचा विषय जर प्राणी असला तर, त्यानें आपल्यावरती उलट प्रेम मात्र करावें, ह्मणजे मग त्याची सेवा करणें, त्याच्या जवळ बसणें, उठणें, खेळणें, त्याच्याविषयीं मनांत विचार आणणें, यापासून आपणांला अत्यानंद होतो. सुख, विश्रांति व शारीरिक आरोग्य अथवा बळ यांची आपणांस किती आवड आहे, हें स्पष्टपणें आपल्या नेहेमींच्या सर्व उद्योगांवरून दिसून येतच आहे. तें उघड करून सांगण्याची आवश्यकता मुळींच नाहीं.

या चार गोष्टी मनुष्यास आवडतात खऱ्या; परंतु यांतील प्रत्येकीचे प्रकार फारच भिन्न भिन्न आहेत. एकच गोष्ट कोणास एका प्रकारची आवडते; कोणास त्या प्रकाराचा अत्यंत तिटकारा असून दुसऱ्या प्रकारची आवडते. कधीं कधीं या चार गोष्टींतील एकीविषयींचीच कित्येकांस इतकी आवड असते कीं, बाकीच्यांकडेस त्यांचें कमी अधिक दुर्लक्ष्य होतें. उदाहरणार्थ, कोणास धनापासून सुख होतें; कोणास कीर्तीपासून सुख होतें व तें प्राप्त झालें असतां दारिद्र्य असलें तरी चालतें. आणि एखाद्या प्रकारच्या सुखाविषयीं उद्योग एखाद्यानें आरंभिला ह्मणजे विश्रांतीकडेस लक्ष्य नाहीं, शरीराकडेस लक्ष्य नाहीं, प्रेमाकडेस लक्ष्य नाहीं असें कधीं कधीं होतें व या तिनही गोष्टींची त्याची हानि होते. आणि अंतीं शरीराचें स्वास्थ्य नाहीं, मनाचें स्वास्थ्य नाहीं, मन रिझविण्यास कोणीही प्रेमाचा विषय नाहीं, असें होऊन संकल्पिलेल्या सुखासही तो पुष्कळदां मुकतो.

तर या चारही गोष्टींचे जे सहस्रशः प्रकार त्या सर्वांत उत्तम असे जे प्रकार तुकोबांस

वाटले ते निवडून काढून त्यांनीं त्यांजविषयीं देवापाशीं वरील अभंगांत प्रार्थना केली आहे. त्यांनीं "पाहिलीं पुराणें धांडोळिलीं दरुषणें," व देवासारिखा प्रेमाचा श्रेष्ठ विषय दुसरा कांहीं त्यांस त्रिभुवनामध्यें दिसला नाहीं. ह्मणून ज्या प्रेमाच्या योगें त्यांचें मुख सदासर्वकाळ देवाचें नामोच्चारण व गुणानुवर्णनच करीत राहील अशा तऱ्हेचें प्रेम त्यांनीं मागितलें. रम्य वस्तु डोळ्यांनीं पाहून आपणांस सुख होतें. तर शुभ, अनंत, रम्य, गभीर, शांत, प्रेमळ असें जें देवाचें स्वरूप डोळे उघडिले असतां या सर्व विश्वामध्यें मनुष्यास दिसण्यासारखें आहे, तें आपणास दिसावें, त्याजकडेस आपली डोळेझांक न होतां तें पहाण्यांतच आपण गर्क व्हावें, यांत जें निःसीम सुख आहे त्याजविषयींचीच त्यांनीं आपली आवड दाखविली. तसेंच मित्रमंडळींत बसून आपल्या आवडत्या विषयाविषयीं गोष्टी करावयाच्या व ऐकावयाच्या यापेक्षां मनास उत्तम विश्रांति कोणती? व त्यांत त्या विषयाची योग्यता ज्या मानानें अधिक त्या मानानें ती विश्रांतिही श्रेष्ठ प्रकारची. तेव्हां कान भरून देवाची कीर्ति ऐकणें हीच विश्रांति तुकोबांनीं मागितली यांत कांहीं नवल नाहीं. भक्तांनां देवाविषयीं गोष्टी करणें व ऐकणें यांतच अत्यानंद व अशा प्रकारें देवाची कीर्ति मनुष्यांच्याच तोंडून कानीं पडते असें नाहीं. तुकोबांनीं एके ठिकाणीं आपलीं सोयरीं असें ह्मटलेलीं वनचरें व सुस्वरें तोषविणारे पक्षी यांच्याही शब्दांच्या द्वारें देवाची कीर्ति आपल्या कानीं पडण्यासारखी आहे. व वायु, नद्या, समुद्र इत्यादिकांचे जे ध्वनि त्यांच्याही द्वारा देवाची कीर्ति आपल्या कानांवर येऊन पडते. आपण दुर्लक्ष्य केलें तर मात्र ती कानीं पडूनही ऐकूं येत नाहीं.

शेवटीं आपणांस आरोग्य व शक्ति हीं जर असलीं तर, ज्या उद्योगांमध्यें आपल्या हातापायांचा उपयोग करितां येईल, अशांपैकीं देवाचें भजन व कीर्तन करीत तल्लीन होऊन, देहभान जाऊन, नाचणें याशिवाय दुसरा कोणता उद्योग श्रेयस्कर आहे?

या रीतीनें निरनिराळ्या इंद्रियांस निरनिराळे उद्योग तुकोबांनीं योजिले, व, त्या उद्योगांच्या योगें किंवा ते उद्योग आपल्या कडून व्हावे ह्मणून, सुख, प्रेम, इत्यादि मनुष्यमात्रांस जे जे अर्थ अत्यंत इष्ट आहेत ते ते अर्थ आपणांस प्राप्त व्हावे अशी आशा धरिली व एकंदर आपल्या सर्व देहभावास वर सांगितलेल्या गोष्टींशिवाय आणखी दुसरा विषय नको, असा आपल्या मनाचा त्यांनीं निर्धार केला.

आतां त्यांनीं आपल्या इंद्रियांसाठीं योजिलेल्या उद्योगांचा अर्थ सर्व ठिकाणीं केवळ शब्दशः घ्यावयाचा नाहीं, तर उपलक्षणासारिखा घ्यावयाचा. आपल्या मुखानें सदासर्वकाळ देवाचें केवळ नामोच्चारण व गुणानुवर्णनच करावयाचें असें नाहीं. तर देवाचें जें कार्य, ह्मणजे लोककल्याण आणि आपलें व दुसऱ्याचें पारमार्थिक हित, तें ज्यांच्या योगें अणुमात्र तरी सिद्धीस जाण्यासारखें आहे, असेच शब्द तोंडावाटे काढावयाचे, मग त्यामध्यें नामोच्चारण किंवा गुणानुवर्णन साक्षात् असो वा नसो. कोणास सदुपदेश करावयाचा, कोणास समाधानाच्या गोष्टी सांगून त्याच्या चित्ताचा उद्वेग किंवा खेद नाहींसा

करावयाचा, असें केल्यानेंही देवाचें कार्य केलेंसें होऊन मुखाचें सार्थक्य होतें. तसेंच हातापायांचा उपयोग कीर्तनाच्या वेळीं टाळ घेऊन नाचणें यासाठींच करावयाचा नाहीं. तर दुसरीं अनेक प्रकारचीं जीं सत्कृत्यें आहेत त्यांकडेसही त्यांचा उपयोग करावयाचा.

प्रेम, सुख, विश्रांति, शारीरिक बळ हीं जशीं तुकोबांस प्रिय तशीं आह्मांसही प्रिय. परंतु, या इष्ट वस्तूंचे विषय, त्यांच्या प्राप्तीचीं साधनें व त्यांचे उपयोग, यांच्या संबंधानें तुकोबांच्या व आमच्यामध्यें फारच मोठें अंतर आहे. आह्मी ऐहिक वस्तूंवर, इष्टमित्रांवर, व आप्तांवर प्रेम करितों, व पुष्कळदां तेंही प्रेम खरें निष्काम नसतें. ज्या दृश्य लाभाच्या हेतूनें तें प्रेम दाखवितों त्या लाभाविषयीं तें प्रेम खरें असतें. व जरी प्रेम खरें असलें तरी ज्या माणसावर आपण प्रेम करितों त्या माणसाचें प्रेम आपल्यावर असेल असेंच कांहीं नाहीं. ह्मणून आपल्या प्रेमापासून जसें मनास समाधान व्हावें तसें होईलच असेंही नाहीं. देवावरील प्रेमाचा प्रकार तसा नाहीं. आपल्या अपल्यांनीं आपल्यापाशीं प्रेमपुरःसर येऊन आपल्यास चिकटावें हीच त्याची इच्छा.

सुख व विश्रांति हीं नश्वर विषयांपासून प्राप्त करून घेण्याची आह्मी आशा धरितों, आणि त्या विषयांच्या प्राप्त्यर्थच सतत उद्योग करीत असतों. व शक्तीचा उपयोग ऐहिक विषय प्राप्त करून घेण्याकडे, दुसऱ्यावर प्रहार करण्याकडे, व अभिमान वाढविण्याकडेस करितों. परंतु जो देव मानितो त्याला असें मानिलेंच पाहिजे कीं, आपली खरी उन्नति, आपलें खरें सुख, काय तें देवाच्या पायीं रत होऊन त्याचें प्रिय कार्य करणें यांतच आहे आणि त्याच्याच साठीं आपण झटलें पाहिजे. व आपण पहातों कीं कोणतेंही लहानसान सुद्धां कार्य करावयाचें असलें तरी त्याकडेस आपलें सर्व तनमनधन लावावें लागतें. तेव्हां देवाच्या भक्तीसारखें कार्य करावयाचें असल्यास आपल्या सकळ देहभावास देवाशिवाय दुसरा ठाव चिंतून उपयोग नाहीं, अशी मनाची पक्की खात्री करून घेऊन तदनुसार आपण नेहेमीं चाललें पाहिजे.

१५. देवाच्या सेवेविषयीं चुकवाचुकव.

लाज वाटे पुढें तोंड दाखवितां । परि जाऊं आतां कोणापाशीं ॥ १ ॥
चुकलिया काम मागतों मुशारा । लाज फजितखोरा नाहीं मज ॥ २ ॥
पाय सोडूनियां फिरतों बासर । स्वामिसेवे चोर होऊनियां ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज पाहिजे दंडलें । पुढें हें घडलें न पाहिजे ॥ ४ ॥

मनुष्यजन्मास येऊन, खाणें, पिणें आणि मजा मारणें याहून आपणास कांहीं विशेष कर्तव्य आहे असें साधारणपणें सर्व विचारी मनुष्यांस वाटत असतें, व, तसें वाटणें, ही एक मनुष्यास देणगी आहे. अशी जरी स्वाभाविक स्थिति आहे, तरी तें कर्तव्य कोणतें आणि तें आपल्या हातून यथायोग्य रीतीनें कसें बजाविलें जाईल, याविषयीं सतत चिंता व जागृति ज्यांस असते असे हरीचे लाल फारच विरळा असतात. ईश्वर हा आपला खरा स्वामी; आणि सत्य, प्रेम, आनंद, दया, क्षमा, शांति, हे त्याचे गुण प्रथम आपल्या अंगीं आणावयाचा यत्न करून नंतर त्यांचा प्रसार त्याच्या राज्यांत सर्वत्र आपापल्या सामर्थ्याप्रमाणें करण्याविषयीं झटणें, ही त्याची सेवा. ही सेवा ज्या मानानें आपणाकडून घडेल त्या मानानें आपलें काम आपण केलें असें ज्यांनां वाटतें, ते खरे साधु आणि ते त्या सेवेबद्दल उन्नतिरूप मुशारा घेण्यास पात्र होतात. तुकोबांचें लक्ष्य सदासर्वकाळ परमेश्वराची सेवा करण्याकडे असे, असें त्यांच्या चरित्रावरून आपणांस दिसून येतें. असें असतां, आपण सेवेंत अंग चोरतों व त्यामुळें धन्याला तोंड दाखविण्यास आपणास लाज वाटते, असें जर वरील अभंगांत त्यांनीं ह्मटलें आहे व ह्याबद्दल खंती प्रदर्शित केली आहे, तर आह्मी जे अगदीं उलट दिशेनें चाललों आहों, म्हणजे सदासर्वकाळ प्रपंचाच्याच पाठीस लागलों आहों, त्या आह्मीं किती बरें खंती केली पाहिजे ! आह्मी ह्मटलें ह्मणजे धन मिळविण्याविषयीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत झटतों; मान, लौकिक संपादण्यास नाना उपाय योजितों; आणि तें धन आणि तो मान जर मिळाला नाहीं तर अत्यंत दुःखी होतों. आपले कोणी आप्त इष्ट आपणांस सोडून गेले तर आपणांस कांहीं सुचेनासें होतें. गांवांत कांहीं रोगराई उत्पन्न झाली असतां जीव घाबरतो आणि आतां आपलें कसें होईल याची मोठी चिंता पडते. आणि अशा प्रकारें दुःख झालें असतां आपण कधीं कधीं परमेश्वरास दोष देण्यास प्रवृत्त होतों.

परंतु धन, जन, मान व जीवित जरी आम्हांस इतकीं प्रिय आहेत, तरी यांपासून ज्या प्रकारचें समाधानकारक सुख आपणांस पाहिजे त्या प्रकारचें तें मिळत नाहीं. याचें कारण काय याविषयीं सूक्ष्म रीतीनें जेव्हां मनुष्य विचार करूं लागतो, तेव्हां तुकोबांनीं ह्मटलेल्या वचनाचा अनुभव त्याच्या प्रत्ययास येतो. "पाय सोडूनियां फिरतों बासर" ह्मणून सुख मिळत

नाहीं असें त्याच्या ध्यानांत येतें. बरोबरच आहे. सर्व सुखाचा दाता जो परमेश्वर त्याची सेवा सोडून अन्यत्र भटकत फिरलें असतां सुख कसें मिळेल ? आपणांस जें सत्यसें वाटतें, न्याय्यसें वाटतें, कर्तव्यसें वाटतें, त्यास अनुसरून वागलें असतां जें सुख होतें त्याचा कधीं कोणाच्यानें भंग करवत नाहीं. अशा आचरणाचा मनुष्य कोठेंही गेला किंवा त्यास कशीही स्थिति प्राप्त झाली तरी त्याची वृत्ति चलविचल होत नाहीं; तो नेहेमीं आनंदवृत्ति असतो. त्याजपाशीं धन असो वा नसो, त्याचें बोलणें लोकांस रुचो अथवा न रुचो, त्याची कीर्त्ति होवो किंवा अपकीर्ति होवो, किंवहुना त्यास कारागृहवास जरी भोगावा लागला, तरी सुख त्याच्या स्वाधीन असतें. परंतु देवाचें दास्य सोडून विषयांचें दास्य ज्यांनीं पतकरलें, ज्यांनां ऐहिक विषयांपासूनच सुख होतें, ते, धनलोभ, लौकिकेच्छा, आणि जनलज्जा हीं त्यांस जिकडे ओढून नेतील, तिकडे जातात. प्रतिमापूजन करणें अथवा सृष्ट पदार्थांचें पूजन करणें हा परमेश्वराच्या पूजनाचा खरा मार्ग नव्हे असें पक्कें ठाऊक असतां जनापवादास्तव, किंवहुना लोकप्रीतीचें संपादन करण्याकरितांही, प्रतिमापूजन किंवा सृष्टपदार्थपूजन करणारे, इतकेंच नव्हे, तर त्यांतच भूषणही मानणारे थोडे आहेत असें नाहीं. सर्व मनुष्यें ईश्वराचीं लेंकरें आहेत तेव्हां त्यांच्याशीं बंधुत्वाच्या नात्यानें वागणें हा आपला धर्म आहे, असें खात्रीपूर्वक वाटत असून, हा माझ्या जातीचा, हा माझ्या जातीचा नव्हे, असें मनांत वागवून एकाचा पक्षपात व दुसऱ्याची प्रतारणा करणारे किती सांपडतील ! ज्याप्रमाणें पुरुषांस बुद्धि आहे त्याप्रमाणें स्त्रियांसही आहे; आपल्या बुद्धीचा विकास झाल्यानें पुरुषांस जसें सुख होतें, तसेंच स्त्रियांच्या बुद्धीचा विकास झाल्यानें त्यांसही होईल; असें पक्कें ठाऊक असून, स्त्रीशिक्षणाची फिकीर न बाळगणारेही पुष्कळ आहेत. अशा प्रकारें स्वामीची आज्ञा क्षणोक्षणीं मोडीत असून, "दररोज आह्मी देवपूजा करितों, किंवा दर आठवड्यास उपासनेस प्रार्थनामंदिरांत जातों, किंवा व्रतें उपोषणें सगळीं करतों, तरी देव आमच्या मनास समाधान देत नाहीं," असें ह्मणणें म्हणजे कामाला चुकवाचुकव करून मुशारा मागावयास मात्र पुढें येण्यासारखें आहे. अशा प्रकारें वेतन मागण्यास आपणांस लाज वाटली पाहिजे. व आपली उन्नति व्हावी अशी जर खरोखर इच्छा असली तर ईश्वरावर दृढ भाव ठेवून कसाही प्रसंग आला तरी त्याची आज्ञा सर्वथैव प्रमाण मानून वागलें पाहिजे, तरच आपणांस खरें सुख प्राप्त होईल. नाहीं तर मनाची टोचणी जावयाची नाहीं. ह्मणूनच स्वामिसेवेमध्यें आपण पूर्वीपेक्षां अधिक दक्ष व्हावें या हेतूनें, तुकोबांनीं वरील अभंगांत शेवटीं मुशाऱ्याच्या ऐवजीं दंडच ईश्वरापाशीं मागितला.

---

१६. देवाचे याचक.

ठाकलोंसें द्वारीं । उभें याचक भिकारी ॥ १ ॥
मज भीक कांहीं देवा । प्रेम भातुकें पाठवा ॥ २ ॥
याचकाचा भार । नये घेऊं येरझार ॥ ३ ॥
तुका ह्मणे दान । सेवा घेतल्या वांचून ॥ ४ ॥

दारीं भिकारी आला ह्मणजे दरवाजांतून कोण दिसेल कीं काय ह्मणून इकडे तिकडे पहातो; व कोणी दिसल्यास आपण आलों आहें म्हणून नुसतें निवेदन करितो, कोणी न दिसल्यास "घरांत कोण आहे काय? दारीं भिकारी आला आहे" ह्मणून मोठ्यानें ओरडून कळवितो. तद्वत् "आपण दारीं आलों आहें" ह्मणून आपला यजमान जो देव त्यास तुकोबा वरील अभंगामध्यें निवेदन करितात. आतां देव तर अमूर्त आहे, मग त्याचें द्वार ह्मणजे काय? राजेरजवाड्यांचे जसे मोठे वाडे असतात, तसा कांहीं त्याचा वाडा असूं शकत नाहीं. तर देवाचें दार, देवाचें घर, देवाचा गांव, देवाचे पाय, देवाचा हात वगैरे शब्दांचा लाक्षणिक अर्थ घ्यावयाचा. कोणतीही भाषा घ्या, तिच्या स्वरूपाचा जर विचार केला तर दिसून येईल कीं, मानसिक किंवा आध्यात्मिक गोष्टींचे वाचक जे शब्द ते सर्व पूर्वी शारीरिक किंवा इंद्रियगोचर वस्तूंचे किंवा गोष्टींचेच वाचक असतात, व पुढें त्या गोष्टींशीं ज्यांचा सारखेपणा असतो अशा मानसिक व आध्यात्मिक गोष्टींचे ते वाचक होतात. उदाहरणार्थ "आघात" शब्द घ्या. मूळचा याचा अर्थ एका जड वस्तूवर दुसऱ्या जड वस्तूचें आपटणें. परंतु त्या व्यापारासारिख्या मनावर होणाऱ्या व्यापाराचाही वाचक तो शब्द झाला आहे. तेव्हां देवाच्या द्वारीं तुकोबा जाऊन राहिले आहेत, ह्मणजे काय कीं, अंतश्चक्षु उघडून त्यांनीं ते देवाकडेस लाविले आहेत, देवाचें चिंतन आपल्या मनामध्यें त्यांनीं चालविलें आहे.

देव मोठा श्रीमंत यजमान, त्याजकडूनच कांहीं अपूर्व दान मिळावयाचें, ह्मणून मोठ्या आशेनें तुकोबा त्याच्या दारापाशीं धांवले आणि बाहेरून ओरडून सांगतात कीं, "मी एक याचक तुझ्या द्वारीं येऊन उभा ठाकलों आहें." जे जे म्हणून आपण देवाची प्रार्थना किंवा भक्ति करितों ते ते सर्व देवाचे याचकच आहों. याचकाची स्थिति दानास पात्र असली पाहिजे. रेशीमकांठी धोतर नेसून, रेशीमकांठी उपरणें घेऊन, व बऱ्याच किंमतीचें पागोटें किंवा रुमाल घालून, भीक मागण्यास कोणी याचक एखाद्या यजमानाच्या दारीं गेला असतां त्याला कोणीही भीक घालणार नाहीं. कारण त्याला भीक मागण्याची जरूर नाहीं व भिकेची ज्यांस अत्यंत आवश्यकता आहे अशीं पुष्कळ दुसरीं माणसें आहेत. खऱ्या याचकाची स्थिति अशी असली पाहिजे कीं, जें दान त्याला पाहिजे त्याची

त्याला अत्यंत जरूर असली पाहिजे व तें त्याला आपल्या सामर्थ्यानें प्राप्त करून घेतां येण्यासारखें नसलें पाहिजे. ह्मणून देवापाशीं आपण जी भीक मागतों तिच्याविषयीं वाटावी तशी आवश्यकता किंवा कळकळ आपणांला जोंपर्यंत वाटत नाहीं, तोंपर्यंत आपण कांहीं खरे याचक नव्हत. तसेंच याचकाची वृत्ति विनम्रपणाची व सहनशीलतेची असली पाहिजे. यजमानाच्या मोठ्या कारभाराच्या मानानें त्यास अनेक कार्यें. त्यांजमुळें जर याचकाकडेस लागलेंच लक्ष न पोंचलें तर यजमानावर संतापून याचकानें चवताळतां कामा नये, किंवा त्याला नांवें ठेवतां कामा नये. यजमान ज्या प्रमाणानें मोठा त्या प्रमाणानें विनम्रवृत्ति अधिक असली पाहिजे. अशी वृत्ति असली म्हणजे मोठ्या आवडीनें दान करण्याविषयीं यजमानाच्या मनाची प्रवृत्ति होते. तुकोबा किती विनम्रपणानें देवापाशीं भीक मागत आहेत, हें " उभें" या शब्दाच्या लिंगावरून उघड होतें. आपण किंपदार्थ, यत्किंचित् क्षुद्र वस्तु, असें दाखविण्याकरितां त्यांनीं नपुंसक लिंगाची योजना केली आहे.

येवढें खरें आहे कीं, याचकास दान करून आपआपल्या सामर्थ्याप्रमाणें त्याच्या दुःखाचें निवारण करणें व या रीतीनें आपल्या मनास शुभ संस्कार लावून आपली वृत्ति उन्नत करणें, हा प्रत्येक मनुष्याचा धर्म आहे. तो याचकाच्या विनम्रपणावर किंवा उद्धटपणावर अवलंबून नाहीं. याचक उद्धट असला तरीही आपला धर्म जाणून जर यजमानानें दान केलें, तर यजमानाची त्यांत अधिक शोभा, अधिक कल्याण; वाईटपणा कायतो याचकाचाच. परंतु पारमार्थिक गोष्टींच्या संबंधानें अशी स्थिति आहे कीं, याचकाच्या अंगीं जर विनम्रपणा नसला तर ज्या प्रकारचें दान भक्तजन मागतात त्या प्रकारचें दान घेतांच येत नाहीं.

आतां लहानसान भिकारी जे आहेत ते राजाच्या द्वारीं कांहीं भिक्षेसाठीं सहसा जाणार नाहींत. राजाच्या द्वारीं पंडित, शास्त्री, यांसारख्या भिक्षुकांची दाद लागावयाची, लहानसान भिकाऱ्यांची दाद लागण्याचा संभव कमी. तरी दुसऱ्या यजमानाकडेस जाऊन अशा भिकाऱ्यांचें कार्य होतें. परंतु तुकोबांस व इतर भाविक जनांस जें दान पाहिजे तें देवावांचून दुसऱ्या कोणापासून मिळावयाचें नाहीं. ह्मणून, देवापाशीं जाऊन भीक मागण्याची किती जरी आपल्या क्षुद्रतेमुळें आपली अयोग्यता वाटली, तरी त्याजपाशींच त्यांस गेलें पाहिजे. तथापि इकडे एक समाधानाची गोष्ट आहे ती ही कीं, अन्य ठिकाणीं तुकोबांनीं ह्मटल्याप्रमाणें, देवापाशीं कोणी "थोरसाना" नाहीं व त्याला राव व रंक दोन्ही सारिखेच. तेव्हां या गोष्टीवरून धीर आला ह्मणून व गत्यंतर नाहीं ह्मणून तुकोबांसारिखे आपणांला "दीनाहुनी दीन" मानणारे भक्त देवाच्या द्वारीं जाऊन उभे राहिले. नाहींतर राहतेना.

याप्रमाणें सर्व सिद्धीचा जो दाता त्याचे द्वारीं जाऊन तुकोबांनीं काय मागितलें ? नुसतें प्रेम मागितलें. सर्व दानांमध्यें मुख्य गोष्ट प्रेम आहे. आपणांस द्यावयास एखाद्यापाशीं कांहीं जर नसलें, तर जरी त्यानें आपलें केवळ प्रेम दिलें, किंवा प्रेमानें केवळ दोन गोड शब्द

१७. देवाचें अनन्य दास्य.

लौकिका पुरती नव्हे माझी सेवा । अनन्य केशवा दास तुझा ॥ १ ॥
ह्मणऊनि करीं पायांसवें आळी । आणिक वेगळी नेणें परी ॥ २ ॥
एकविध आह्मी स्वामिसेवेसाठीं । वरी तोचि पोटीं एक भाव ॥ ३ ॥
तुका ह्मणे करीं सांगितलें काम । तुह्मां धर्माधर्म ठावे देवा ॥ ४ ॥

आपण कोणत्या हेतूनें व कोणत्या भावानें देवाचे दास बनलों आहों हें तुकोबा या अभंगामध्यें देवास विदित करितात. व्यवहारांतील दास पाहिले तर ते अनन्य दास नसतात. स्वामीची सेवा करावी हेंच आपणांस योग्य ह्मणून कांहीं ते सेवा करीत नाहींत, स्वामीची सेवा हाच त्यांचा इष्ट हेतु नसतो; तर सेवेपलीकडील सेवेपासून प्राप्त होणारा जो लाभ त्याजवर त्यांची दृष्टि असते. सेवेपासून प्राप्त होणारें जें वेतन तें जर यजमानापासून मिळणार नाहीं तर कोणी कोणाचा दास किंवा चाकर होणार नाहीं. आतां कधीं कधीं असें दृष्टीस पडतें कीं यजमान सुशील असला व चाकर मन लावून काम करणारा असला म्हणजे त्यांच्यामध्यें प्रेमभाव उत्पन्न होऊन तो वाढत जातो. मग यजमानाचा विपत्तिकाळ आला असतां वेतन कमी झालें तरी चाकर घरांतील माणसांप्रमाणेंच यजमानास चिकटून रहातो; किंवा चाकर काम करण्यास असमर्थ झाला तरी त्यास यजमान आपल्यापाशींच खाऊन पिऊन सुखी ठेवितो. परंतु हा नंतरचा कधींकाळीं मात्र घडून येणारा प्रकार. पहिल्यानेंच जो संबंध व्यवहारांतील यजमान व नोकर यांच जडतो तो वेतनामुळें जडत असतो.

तर अनन्य दास तो कसा असतो? तो कसा असतो याचें दिग्दर्शन वरील अभंगांत केलेंच आहे. स्वामीच्या सेवेशिवाय दुसरें ज्याला कांहीं प्रिय नाहीं, स्वामिसेवाच काय तें आपलें कर्तव्य असें जो मानतो, व त्या सेवेपासून आपणास कांहीं तरी ऐहिक लाभ व्हावा अशी इच्छा धरीत नाहीं येवढेंच नव्हे तर तीपासून कांहीं अनिष्ट किंवा हानि जरी प्राप्त झाली तरी जो जुमानीत नाहीं, तो अनन्य दास. अनन्य दास एकविध असतो. त्याचा आंत व बाहेर एकच भाव असतो. बाहेरून दाखवावयाचें कीं आपणास यजमानाची सेवा इष्ट म्हणूनच आपण ती करितों; परंतु जर वेतन किंचित् कमी झालें किंवा सेवेपासून थोडेसे नेहमींपेक्षां अधिक श्रम झाले तर लागलेंच असंतुष्ट होऊन मनामध्यें तरी कुरकुरावयाचें; अशी त्याची स्थिति नसते. अनन्य दासाची आणखी एक अशी खूण आहे कीं धन्यानें सांगितलेलें काम तो निमूटपणें करितो. तो कांहीं त्या कामाच्या संबंधानें धर्माधर्माविषयीं विचार करीत बसत नाहीं. ''स्वामीचे ते धर्म स्वामी जाणे '' असें ह्मणून तो स्वस्थ रहातो. हुकमी शिपाई जे असतात ते हुकूम होतांच शत्रूवर तुटून पडतात. शत्रु आपल्यापेक्षां प्रबळ आहे, त्याचे लोक

आपल्यापेक्षां संख्येनें फारच अधिक आहेत, तेव्हां हुकूम देण्यामध्यें कांहीं तरी चुकी झाली आहे, अशी जरी त्यांची पक्की खात्री झाली आणि मरण जरी निश्चित असलें तरी क्षणभरही न डगमगतां ते शत्रूशीं जाऊन भिडतात, अशीं अनेक उदाहरणें आहेत. आतां इतकें खरें आहे कीं धर्माधर्माविषयीं विचार न बाळगतां मनुष्याचा दास होणें हें अत्यंत अनुचित आहे. कारण कीं मनुष्यापेक्षां अत्यंत श्रेष्ठ पुरुष जो त्याचे आपण दास झालें पाहिजे; आणि धर्माधर्म हे त्याचे हुकूम. परंतु अनन्य दास जें म्हणावयाचें तें योग्यायोग्यतेविषयीं विचार न करितां धन्याचे हुकूम मानणाऱ्यासच म्हणावयाचें. आपल्या स्वामीच्या सेवे आड येणाऱ्या विषयांचा त्याग करावयास जितक्या प्रमाणानें आपण तयार होऊं व त्या सेवेसाठीं कष्ट व घीस सोसण्यास राजी होऊं, तितक्या प्रमाणानें आपल्या सेवेमध्यें अनन्यत्वाचा अंश येईल.

संपत्ति, ऐश्वर्य, अधिकार, लौकिक, इत्यादि अर्थांचे अशा प्रकारें अनन्य दास पुष्कळ असतात. विद्येचे, प्राणिमात्रांचे, यावत् सर्व मनुष्यजातीचे, राष्ट्राचे, समाजाचे, किंवा देवाचे, या प्रकारचे अनन्य दास आपण आहों असेंही नानातऱ्हेच्या खटपटी करून पुष्कळ लोक दाखवितात. परंतु त्यांमध्यें खरोखरी अशा प्रकारचे दास फारच विरळा. बहुतेक सारे पहिल्या वाक्यांत सांगितलेल्याच कोणत्या तरी अर्थाचे दास असतात; व तो प्राप्त करून घेण्यासाठींच त्यांची सर्व खटपट असते. ते एकविध नसतात. त्यांचा वर भाव एक आणि पोटीं दुसरा. उदाहरणार्थ, राष्ट्रीय चळवळीच्या संबंधानें कोठें भाषणाचा प्रसंग असला तर त्यामध्यें भाषण करणारांमध्यें आपलें नांव घातलें नाहीं ह्मणजे राष्ट्राचे हितकर्ते म्हणवून घेणाऱ्या कित्येकांस अत्यंत वाईट वाटून आपलें आंग काढून घेण्यास ते तयार होतात. वास्तविक पाहिलें असतां, ज्याला देशकल्याणच केवळ प्रिय त्याला आनंद व्हावा कीं या कामीं इतके पुष्कळ तयार आहेत कीं माझी गरज पडली नाहीं. त्याला असें वाटावें कीं मला जें इष्ट तें दुसऱ्या कोणाकडूनही घडो; माझा हात त्याला न लागल्यामुळें मला तें कोणत्याही रीतीनें कमी इष्ट नाहीं; व लोकांपुढें भाषण करण्याशिवाय देशाचें कल्याण करण्याचे इतर पुष्कळ व कदाचित् त्याहून श्रेष्ठ असे पुष्कळ मार्ग मला मोकळे आहेत त्या मार्गांचें मी अवलंबन करीन. परंतु हे विचार फारच थोड्यांच्या मनांत येतात. हाच प्रकार इतर सर्व बाबतींत आढळून येतो. तरी असे लोक ज्या स्वामीचे आपण अनन्य दास आहों असें म्हणतात त्या स्वामीचे खरोखरी तशा प्रकारचे ते दास नव्हत. पुष्कळ लोक असे आहेत कीं, देवाची ते भक्ति करितात ती केवळ आपण देवाचे भक्त आहों असा आपला लौकिक व्हावा याच हेतूनें, किंवा दुसऱ्या कोणत्याही अशाच प्रकारच्या ऐहिक विषयाच्या प्राप्तीच्या हेतूनें. ती भक्ति खरोखरी देवाची सेवा नव्हे. ती सेवा त्या त्या इष्ट विषयाची. तुकोबांची सेवा त्या प्रकारची नव्हती. व ज्या प्रकारची देवाची सेवा तुकोबांनीं केली त्याच प्रकारच्या सेवेची आपणांस गोडी लागेल अशाविषयीं प्रत्येक मनुष्यानें

झटलें पाहिजे. तशा प्रकारची सेवा न करितां भक्तीचे बाह्य आचार करून ईश्वराचे दास आपण झालों असें वाटून जर आह्मीं आपणांस धन्य मानिलें तर आमचें तें समाधान भ्रमात्मक आहे. व ज्या वेळेस अशा समाधानाची आपणांस अत्यंत आवश्यकता असेल त्या वेळेसच तें लय पावेल व आपणांस कोणी आधार नाहींसा होऊन आपली स्थिति अत्यंत शोचनीय व उद्विग्न अशी होईल. अनन्य सेवा केली असतां स्वामीचें सेवकावर प्रेम जडतें आणि सेवकास स्वामी प्रिय तसा स्वामीस सेवक प्रिय होतो व सेवकावर स्वामी पूर्ण अनुग्रह करितो. ईश्वरास आपण प्रिय होण्यास व त्याचा पूर्ण अनुग्रह संपादण्यास हाच एक काय तो उपाय.

१८. देवाचें स्मरण व सेवा आणि संतसंगति.

तुज मागणें तें देवा । आह्मां तुझी चरणसेवा ॥ १ ॥
आन नेघों देशी तरी । रिद्धि सिद्धि मुक्ति चारी ॥ २ ॥
संतसंगति सर्वकाळ । थोर प्रेमाचा सुकाळ ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाम । तेणें पुरे माझें काम ॥ ४ ॥

या अभंगामध्यें तुकोबांनीं ईश्वरापाशीं त्याची चरणसेवा मागितली व दुसरें कांहीं मागितलें नाहीं. ज्या ज्या वस्तूंचें इतर लोकांस अत्यंत महत्त्व वाटतें त्या त्या, देवानें दिल्या तरी, त्यांनीं, त्यांचें नांव घेऊन, आपणास नको ह्मणून ह्मटलें. यावरून ज्या ईश्वरसेवेविषयीं ते इतके आतुर झाले होते ती ईश्वरसेवा इतर व्यावहारिक सेवेपासून अत्यंत भिन्न प्रकारची असली पाहिजे. व्यावहारिक सेवा ह्मणजे वाणिज्याचा किंवा व्यापाराचाच भाग आहे. अमुक वेतन मिळालें तर अमुक सेवा करीन हा करार सर्व व्यावहारिक सेवेचा जीव आहे. त्या सेवेमध्येंच कांहीं स्वारस्य आहे असें वाटून मनुष्य ती करावयास प्रवृत्त होतो अशी गोष्ट नाहीं. ज्या प्रकारची ईश्वरसेवा तुकोबा मागतात त्या प्रकारच्या सेवेचें प्रवर्तक सेव्याविषयीं प्रेम हें होय. व्यावहारिक सेवेची तशी गोष्ट नाहीं. जरी त्या सेवेच्या संबंधानें सेव्य व सेवक यांजमध्यें कालानें कधीं कधीं प्रेमभाव उत्पन्न होतो, तरी प्रेम हें कांहीं त्या सेवेचें प्रवर्तक कधीं नसतें तर केवळ वेतन हेंच. या प्रकारचें वाणिज्य ईश्वरसेवेच्या संबंधानें पुष्कळ लोकांमध्यें आढळतें. कोणत्याही इष्ट लाभासाठीं सत्यनारायणाची पूजा, सौभाग्यासाठीं वटसावित्रीची पूजा, वगैरे प्रकार सर्व स्थळीं व सर्व काळीं कांहीं थोडे आढळून येत नाहींत. परंतु संतानप्राप्ति, धनधान्यवृद्धि इत्यादि गोष्टींविषयीं तुकोबांसारखे साधु अगदीं उदासीन असतात. या गोष्टी त्यांस प्राप्त झाल्या तरी सारख्या न झाल्या तरी सारख्या. प्राप्त न झाल्यास खेद नाहीं; प्राप्त झाल्यास अनुचित हर्ष होऊं न देतां ईश्वराचे आभार मानून त्या गोष्टींचा सदुपयोग करावयाचा. ह्मणून ऐश्वर्याची व समृद्धीची सीमा अशी मानलेली जी ऋद्धिसिद्धींची प्राप्ति तीही त्यांनीं नको ह्मटली. ज्ञानी ह्मणविणाऱ्यांनीं इजहूनही श्रेष्ठ मानिलेल्या ज्या चार मुक्ति त्याही त्यांनीं नको ह्मणून सांगितलें. त्या चार मुक्ति ह्मटल्या ह्मणजे सायुज्य, सलोकता, समीपता आणि सरूपता. खरोखरी पाहिलें असतां ह्या मुक्ति ईश्वराचें दास्य व सख्य यांचेच प्रकार किंवा परिणाम आहेत. तर तेही तुकोबांनीं नको ह्मटले कसे? याचें कारण हेंच दिसतें कीं ज्ञानी ह्मणविणाऱ्या लोकांचा मुक्ति किंवा मोक्ष यांजवर इतका भर असतो कीं मोक्ष ह्मणजे त्यांच्या दृष्टीनें एक स्वतंत्रच वस्तु होऊन जाते, मोक्षावस्थेचा ईश्वराशीं कांहीं संबंध आहे हें त्यांच्या ध्यानींही राहात नाहीं. तर या प्रकारचें रूपांतर पावलेल्या चार मुक्तिही त्यांस नकोत.

आतां ईश्वराच्या सेवेच्या आड येणारे कामक्रोधादि आपले मनोविकार आहेत व त्यांपासून आपलें अंतःकरण शुद्ध राखण्याविषयीं आम्हांस अत्यंत प्रयास पडतात व ईश्वराचें निरंतर साहाय्य मागावें लागतें. तर तीही षड्रिपूंपासून मुक्तता या चरणसेवेमध्येंच अन्तर्भूत होते. त्यांपासून आपली सुटका झाल्याशिवाय ईश्वरसेवा आपल्याकडून यथायोग्य रीतीनें होणार नाहीं व आपली सेवा ईश्वरास ग्राह्य होणार नाहीं.

परंतु कोणतीही सेवा आपणांस फार क्लिष्ट वाटते, ती आपणांस नेहमीं बंधनाप्रमाणें होते, व तिजमुळें आपलें स्वातंत्र्य गेलेंसें वाटतें. तिजपासून प्राप्त होणाऱ्या वेतनामुळें मात्र ती केवळ सह्य होते, किंवा असह्य वाटली तरी ती आपण करितों. परंतु खऱ्या भक्तांचा ईश्वरसेवेच्या संबंधाचा अनुभव पाहिला तर निराळा आहे. त्यांस ईश्वरसेवेपासून जो आनंद होतो तो दुसऱ्या कशापासूनही होत नाहीं. याचें कारण त्यांचें ईश्वरावरील उत्कट प्रेम हें होय. प्रपंचामध्येंही आपण पाहातों कीं, ज्या व्यक्तीवर आपलें अत्यंत प्रेम, तिजसाठीं आपण फार कष्ट सोसतों, व प्राणही देण्यास तयार होतों. त्यापासून अनेक वेळीं कष्टाच्या मोबदला आपला फायदा कोणताही नसतो, व असल्यास त्यावेळीं तरी ध्यानीं-मनींही नसतो. परंतु ते कष्ट आपणांस सह्य होतात येवढेंच नाहीं, तर ते केल्यापासून मनास एका प्रकारचें समाधान व आनंद वाटून आपण ते उल्लासानें सोसतों. तर सर्वांहून श्रेष्ठ जो परमेश्वर त्याजवर जर त्याच्या श्रेष्ठतेच्या मानानें आपलें प्रेम जडलें तर त्याची सेवा आपणांस क्लिष्ट कधींही वाटणार नाहीं, उलट तिजपासून आनंदच प्राप्त होईल.

या मागितलेल्या सेवेस सहायभूत अशी संतसंगतिही तुकोबांनीं देवापाशीं मागितली. आपण जें काम हातीं घेतलें आहे, तेंच काम दुसऱ्यांनीं उचललें आहे असें कळल्यास आपणांस उत्तेजन मिळतें. व त्यांस काम करतांनां पाहून आपलाही तें करण्याचा उत्साह वाढतो. त्यांचा अनुभव आपणांस कळवून घेतां येतो व आपला अनुभव त्यांस सांगतां येतो, व त्यापासून इच्छिलेल्या कार्याच्या संबंधानें परस्परांस मोठा लाभ होतो व ईश्वरसंबंधीं व परस्परांमधील स्नेह वाढतो. ईश्वरसेवेमध्यें दक्ष जे संत त्यांसही हा प्रकार लागू आहे. ते एकत्र जमले असतां भगवद्गीतेमध्यें सांगितल्याप्रमाणें एकमेकांशीं देवाविषयीं गोष्टी बोलून व एकमेकांस बोध करून संतोष पावतात. या प्रकारें त्यांजमध्यें परस्परांविषयींच्या व ईश्वराविषयींच्या प्रेमाचा सुकाळ होऊन जातो.

वरील अभंगाच्या शेवटींही पुनः एकवार तुकोबा अन्य शब्दांनीं देवापाशीं त्याची सेवाच मागतात. तुझ्या नामानेंच माझें काम पुरें होतें असें ते देवास उद्देशून ह्मणतात. आतां देवाचें नांव याचा अर्थ मात्र कधीं कधीं पुष्कळ लोक थोडाबहुत संकुचित करितात. लक्ष्य कोणत्याही ऐहिक वस्तूकडे गेलें असलें तरी केवळ तोंडावाटे केलेल्या नामोच्चारामध्येंच कित्येकांस सार्थक्य वाटतें. कित्येक, स्वस्थ बसून इतर सर्व व्यापार टाकून मनानें देवाचें सदैव चिंतन असाच केवळ, देवाचें नांव याचा अर्थ करतात; व जिकडे कोणाचें वारें नाह

अशा ठिकाणीं जाऊन मनानें देवाचें चिंतन करणें यांतच त्यांस सार्थक्य वाटतें. परंतु संतचरित्रांचें आपण यत्किंचित् जरी अवलोकन केलें, तर दिसून येईल कीं त्यांनीं देवाच्या नांवाचा तसा संकुचित अर्थ घेतला नाहीं. आपल्या व दुसऱ्यांच्या संबंधानें इहलोकीं कांहीं आपणांला कर्तव्यें आहेत हें जाणून व तीं केलीं नसतां आपण देवाच्या नांवाचा उच्चार करण्यास अयोग्य होऊं असें त्यांस वाटून, ईश्वरसेवेचा एक भागच ह्मणून तीं (परोपकार वगैरे) कर्तव्यें करून त्यांनीं आपला देह झिजविला. " माझी सेवा तुझें नाम " असें जें तुकोबांनीं अन्य एका स्थळीं ह्मटलें आहे त्यांतील " नाम " ह्मणजे याच प्रकारचें.

१९. देवाची सेवा.

हेंचि जतन करा दान । धरुनी चरण राहिलों तो ॥ १ ॥
आणिक कांहीं न घालीं भार । बहुत फार सांकडें ॥ २ ॥
घ्यावी माझ्या हातें सेवा । हेचि देवा विनवणी ॥ ३ ॥
तुका तुमचा ह्मणवी दास । त्याची आस पुरवावी ॥ ४ ॥

या अभंगामध्यें तुकोबांनीं देवापाशीं काय मागितलें आहे? दुसरें कांहीं नाहीं; आपण जी सेवा करीत आहों किंवा करणार आहों, तिचा देवानें स्वीकार करावा हेंच. येवढ्याविषयींच त्यांची आशा, व ती देवानें पूर्ण करावी, याविषयीं त्यांची अत्यंत उत्कंठा. व्यवहारामध्यें आपणांस पदरीं ठेवण्याविषयीं जेव्हां कोणाची आपण विनंती करितों तेव्हां त्याबद्दल आपणांस पगार मिळावा या हेतूनें विनवणी करितों. जिकडेस पगार अधिक मिळेल तिकडेस कमी पगाराची सेवा सोडून जातों. एकाच धन्याच्या सेवेंत बराच काळ राहिलों आणि उत्तरोत्तर अधिकाधिक बढती झाली नाहीं तर असंतुष्ट होतों. निरीच्छ अशी बाह्यतः वाटणारी जनपदांची किंवा देशाची जी आपण सेवा करितों तीही पुष्कळदां खरोखरी निरीच्छ नसते. त्यापासून जगीं आपली मानमान्यता होते ह्मणूनच आपण ती करितों. असा जर खरा प्रकार नसता तर जनपदांची किंवा देशाची सेवा करणाऱ्यांपैकीं जे लोक देव आहे असें मानितात ते देवाच्या सेवेविषयीं इतके उदास असते ना. ज्या मानानें जनपदसेवेपेक्षां किंवा देशसेवेपेक्षां देवाच्या सेवेची अधिक योग्यता त्या मानानें ते देवाचीही सेवा करते. दुसरें, सेवा करणें लोकांस अत्यंत अप्रिय; कारण सेवा ह्मणजे केवळ कमीअधिक प्रमाणानें स्वातंत्र्याचा नाश, आणि स्वातंत्र्य तर लहानापासून मोठ्यास इतकें प्रिय कीं, आपल्या इच्छेच्या आड येणारा एखादा कायदा किंवा नियम हितावह जरी असला तरी,त्या नियमाचा हितावहपणा आपण विसरून जातों,तो नियम केवळ आपल्या स्वातंत्र्याच्या नाशासाठींच योजिलेला आहे असा आपला दृढग्रह होतो, नियम दुःसह होतो, व आपण त्याचें उल्लंघन किंवा निर्मूलन करावयास पहातों. अशा प्रकारें सेवा अत्यंत अप्रिय असल्यामुळें तिजवांचून गत्यंतरच नाहीं ह्मणून आपण ती करितों. यामुळें, सेवेपासून प्राप्त होणारें वेतन सांचून सेवेशिवाय आपणांस सुखानें रहातां येईल, अशा काळाकडेस सेवा करितेवेळींही आपली दृष्टि असते व आपण त्या काळाची मार्गप्रतीक्षा करीत रहातों. आणि जर आपली विवेकबुद्धि फारशी जागृत नसली तर योग्य वेतन मिळत असतांही सेवा वेठीप्रमाणें जशी तशीच करितों. तर याप्रमाणें स्वातंत्र्याशीं जिचा विरोध, अतएव अप्रिय, अशी जी सेवा ती–देवाची मात्र–तुकोबांनीं देवापाशीं मागितली ती कोणत्या लाभाकरितां? कोणती आपली कामना पूर्ण व्हावी ह्मणून? वरील त्यांच्या प्रार्थनेमध्यें अशा सेवेच्या

मोबदला त्यांनीं कांहींच मागितलेंसें दिसत नाहीं. आपण देवाची निष्काम सेवा किंवा भक्ति करावी आणि देवास ती ग्राह्य व्हावी येवढीच काय ती त्यांची इच्छा. महासाधु ते तुकोबा! त्यांनां ऐहिक वस्तूंची व आध्यात्मिक उन्नतीची खरी योग्यता पूर्णपणें अवगत होती. ह्मणून ऐहिक वस्तूंविषयीं किंवा भोगांविषयीं त्यांनीं फारशी विवंचना केलीच नाहीं आणि देवाची भक्तिच त्यांनां गोड वाटली. आपला देह, आपलीं सर्व इंद्रियें व त्यांचें सामर्थ्य, आणि आपलें जीवित, यांपासून आपण आपलें खरें कल्याण करून घ्यावें ह्मणून, हीं आपणांस दिलेलीं आहेत, व देवाच्या सेवेकडेसच त्यांचा उपयोग केला असतां आपलें खरें हित होणार आहे. अनुभवाची गोष्ट आहे कीं, ज्या थोर पुरुषाच्या मुखावर समाधान, शान्ति, सुप्रसन्नता, गाम्भीर्य, उदारता इत्यादि सद्गुण व्यक्त होतात अशा पुरुषाच्या वारंवार मुखावलोकनानें अवलोकन करणाराच्या अंतःकरणांत ते गुण अवतीर्ण होतात. ह्मणूनच, अमुक अमुक व्यक्तीचें मुखावलोकन करण्यामध्येंच एका प्रकारचें शिक्षण आहे, असें ह्मणण्याचा प्रघातही आहे. केवळ मुखावलोकनाची गोष्ट ही, मग चिरकालच्या समागमाचा परिणाम अधिकच श्रेयस्कर असला पाहिजे. ह्मणून देवासारिखा स्वामी मिळून त्याच्या सेवेच्या निमित्तानें त्याचें दर्शन व त्याचा समागम जर निरंतर घडला तर दुसऱ्या कशाची आपणांस अपेक्षा राहिली? त्याचें सर्वप्रकारें सुंदर स्वरूप पाहून असा अत्यानंद होईल कीं त्यापुढें आपणांस दुसऱ्या कशाचेंही भान रहाणार नाहीं. आपल्यावर कोणतेंही संकट जरी वोढवलें तरी, त्याचें अतिवत्सल स्वरूप पाहून, तें संकट त्याच्याच इच्छेनें प्राप्त झालें आहे तेव्हां त्यापासून आपलें अहित कधीं व्हावयाचें नाहीं, उलट कल्याणच होईल अशी आपली खात्री होऊन, देव आपणांस विसरला नाहीं असें वाटून त्याजवर पूर्ण भरिभार घालून, आपली वृत्ति समाहित होईल. तेव्हां पुण्यपापाच्या बंधनानें बद्ध होणें किंवा देवाची सेवा करणें हें कांहीं खरोखरी दास्य नव्हे. व्यसनांचें दास्य हें खरें दास्य. त्यापासूनच सर्वथा आपली हानि होते, आपला नाश होतो.

देवाची सेवा करणें व ती त्यास मान्य होणें ही कांहीं लहानसान गोष्ट नव्हे. ती मान्य होण्यास आपलें अन्तःकरण, आपले सर्व मनोभाव अत्यंत विशुद्ध असले पाहिजेत. शुद्ध सेवा करण्याचा कितीही जरी यत्न मनुष्यप्राण्यानें केला तरी कांहींना कांहीं तरी अशुद्धतेचा अंश रहातोच रहातो. अशा सेवेसाठीं सर्व इतर गोष्टींचा अनादर केला पाहिजे आणि देवासच आपल्या अंतःकरणामध्यें प्राधान्य दिलें पाहिजे. ह्मणून धन्य तो पुरुष, ज्यानें केलेल्या सेवेच्या न्यूनाधिक्याचें पूरण करून ती सेवा देवानें मान्य करून घेतली. देवानें मान्य करून घेतलेल्या सेवेमध्यें अशा प्रकारची श्रेष्ठता आहे ह्मणूनच आपली सेवा मान्य व्हावी असें निष्काम भावानें तुकोबांनीं देवापाशीं मागणें मागितलें.

२०. भावयुक्त भक्ति.

गातों भाव नाहीं अंगीं । भूषण करावया जगीं ॥ १ ॥
परि तूं पतितपावन । करीं साच हें वचन ॥ २ ॥
मुखें ह्मणवितों दास । चित्तीं माया लोभ आस ॥ ३ ॥
तुका ह्मणे दावीं वेश । तैसा अंतरीं नाहीं लेश ॥ ४ ॥

देवाची भक्ति यथायोग्य होण्यास भावाची आवश्यकता आहे. भावाशिवाय जर भक्तीसंबंधीं कोणतेही व्यापार किंवा व्यवसाय केले तर ते सर्व व्यर्थ. केवळ शीण मात्र तो. यांत कांहीं नवें सांगितलें नाहीं, हें सर्वांस ठाऊकच आहे. परंतु हीच गोष्ट काय, अशा अनेक गोष्टी आहेत कीं ज्या पोरांबाळांस सुद्धां कळतात. वागतांनां मात्र, वयानें, मानानें व सत्तेनें लहानांपासून थोरांपर्यंत आह्मी सर्व अशा प्रकारें वागतों कीं, जणूं काय त्या गोष्टी आमच्या कानांवरूनही कधीं गेल्या नसतील. ज्या गोष्टी सर्वांस महशूर त्याच आह्मी अधिक विसरतों. जे आस्तिक आहेत त्यांनां ठाऊक आहे कीं, देव सर्वत्र आहे आणि प्रत्येक मनुष्य काय करितो तें तो पहातो येवढेंच नाहीं, तर प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांतील उत्पन्न होऊन तत्क्षणींच लय पावणारे विचारही त्याला अवगत असतात. हें जर सदासर्वकाळ आमचे लक्षांत वागेल तर आमचें पाऊल कधींच वांकडें पडणार नाहीं, आमचे आचार विचार नेहेमीं शुद्ध रहातील. संपत्तीनें किंवा सत्तेनें जो मोठा अशा गृहस्थाच्या समोर जर आपण असलों तर त्याला आवडणार नाहीं असें आचरण त्याच्या देखत आपल्या हातून कधींही होत नाहीं. तोच प्रकार, देवाच्या मोठेपणाच्या मानानें, देवाच्या संबंधानें आपला होईल. परंतु होतें काय कीं देव सर्वत्र आहे ही गोष्ट केवळ मतच होऊन बसते; ती पूर्णपणें आपल्या मनामध्यें ठसलेली नसते व लक्ष्यांत कधींच वागत नाहीं. त्याचप्रमाणें, खऱ्या भक्तीस भाव आवश्यक आहे हें जरी आह्मांस ठाऊक आहे तरी तें आम्ही बहुशः सर्वकाळ विसरून जातों. सर्वांस कळत असलेल्या गोष्टी, सर्वांस कळतात ह्मणूनच आह्मांस यःकश्चित् वाटतात व त्यांची आह्मांकडून उपेक्षा होते. ह्मणून ज्या प्रमाणानें कोणतीही गोष्ट सर्वांस अवगत असते त्या प्रमाणानें ती न विसरण्याविषयीं व तिचें अत्यंत महत्त्व मनांत वागविण्याविषयीं यत्न केला पाहिजे.

कोणताही भक्तीसंबंधीं व्यापार भावपूर्वक करावयाचा असला ह्मणजे तो लक्ष्यपूर्वक किंवा अंतःकरणपूर्वक केला पाहिजे. परंतु, ज्या ऐहिक विषयांची आम्हांस इतकी गोडी ते संपादण्याचे जे उद्योग त्यांच्या संबंधानेंही आपल्यापैकीं कितीजणांची अत्यंत अनास्था, दुर्लक्ष्य, आळस वगैरे दिसून येतात. तेव्हां परमार्थाच्या संबंधानें असा हा आपला प्रकार सहस्रगुणित आहे यांत कांहीं नवल नाहीं. याच कारणामुळें धर्मकृत्यांमध्यें अर्थाकडे लक्ष्य

न देतां वेदाच्या मंत्रांचा केवळ उच्चार करण्याचा प्रघात पडला. असें होतां होतां कित्येकांचें असें मत झालें कीं मंत्रांचें सामर्थ्य काय तें त्यांच्या शब्दस्वरूपांतच आहे आणि मंत्रांला मुळीं अर्थच नाहीं व तें मत खोडण्याचे प्रयास यास्कादि मुनींस करावे लागले. जप, संध्या, वगैरे गोष्टींचा तोच प्रकार. यामुळेंच, कवीचें लाघव किंवा अतिशयोक्ति ज्याला ह्मणावयाचें त्याचा भक्तीच्या संबंधानें पुष्कळदां शब्दशः अर्थ करण्यांत येत असतो. न कळतां जरी अमृत प्राशिलें तरी तें अमर करितेंच; त्याप्रमाणें देवाचें नाम कोणत्याही मिषानें जरी तोंडांतून निघालें, मग तें देवाला शिव्या देतांना कां निघेना, तरी मनुष्य पावन होतो, ही व अशा सारिख्या उक्ति शब्दशः खऱ्या वाटतात. वास्तविक पहातां भावाशिवाय किंवा देवाचें स्वरूप मनांत आणिल्याशिवाय केलेल्या देवाच्या नामोच्चारास अमृताची उपमाच प्राप्त होत नाहीं, हें कांहीं लक्ष्यांत येत नाहीं.

तर अशा प्रकारें भावाशिवाय आम्ही देवाचें नांव गातों व भक्तीचें अवडंबर मात्र दाखवितों, तें जगीं आपली मान्यता वाढविण्याकरितां किंवा दुसऱ्या अशाच कोणत्या तरी हेतूनें. तसेंच आपण देवाचे दास असें मुखानें ह्मणतों मात्र, परंतु ऐहिक विषयांच्या संबंधानें माया, लोभ व आस अंतरीं यथेच्छ नांदत असतात. खरोखरी ह्मटलें ह्मणजे, ज्यांच्या संबंधानें माया, लोभ व आस मनुष्याच्या अन्तःकरणांत वागतात त्यांचा तो दास; तेव्हां जोंपर्यंत आमच्यामध्यें विषयांची आस आहे तोंपर्यंत कांहीं आह्मी देवाचे दास होऊं शकत नाहीं. यामुळें ज्याचा आह्मी बाहेरून वेश दाखवितों त्याचा आमच्या अंतरीं गंधही नसतो. आह्मीं किती जरी भक्तीचे बाह्य व्यापार केले तरी पूर्वींप्रमाणें पतित रहातों ते रहातोंच. तेव्हां अशा स्थितींतून आपणांस सोडविणारा एकच पतितपावन, असा देवाच्या भक्तांनीं त्याचा महिमा गाइला आहे. तोच जेव्हां आपलें पतितपावनत्वाचें ब्रीद राखण्याकरितां कृपा करून अनुग्रह करील तेव्हांच आपली सुटका होईल.

२१. भवतरणाचा उपाय.

कंठीं राहो नाम । अंगीं भरोनियां प्रेम ॥ १ ॥
ऐसें द्यावें कांहीं दान । आलों पतित शरण ॥ २ ॥
संतांचिये पायीं । वेळोवेळां ठेवीं डोई ॥ ३ ॥
तुका ह्मणे तरें । भवसिंधु एका सरें ॥ ४ ॥

हा भवसागर तरून जावयाची तुकोबांची बळकट इच्छा. या जगीं येऊन त्याच्या द्वारा जी आपली उन्नति करून घ्यावयाची ती न घेतां त्याच्याच नादीं सर्वस्वी लागून जो तो आपला नाश करून घेत आहे, या भवसागरामध्यें बुडत आहे, त्याप्रमाणें आपली स्थिति होऊं नये, आपली उन्नति होऊन आपल्या जन्माचें सार्थक्य व्हावें, याविषयीं त्यांनां अतिशय काळजी. त्यासाठीं पाहिजे तो त्रास व कष्ट, पाहिजे ती ऐहिक हानि सोसण्यास ते तयार होते, व मनुष्यमात्रास अत्यंत प्रिय, परंतु परमार्थाच्या आड येण्याचा ज्यांचा संभव असे विषय त्यांजला प्राप्त झाले तरी त्यांचा धिक्कार ते करीत असत. यास्तव भवसागरांतून तरून जाण्याचा जो उपाय त्यांनां खात्रीचा वाटला तो उपाय आपल्या हातून व्हावा ह्मणून ते देवाची वरील अभंगामध्यें प्रार्थना करितात. तर तो उपाय कोणता? " कंठीं राहो नाम ". देवाच्या नांवाचा सदा तोंडावाटे उच्चार व्हावा. परंतु, नांवाचा उच्चार असा पुष्कळ लोक वारंवार करितात, तरी त्यापासून कांहीं लाभ झालेला दिसत नाहीं. नांव ह्मणजे नुसता शब्द. मुखांतील निरनिराळ्या भागांचा आघात होऊन कानास समजणारा केवळ वायु तो. त्या नांवाचा उच्चार करून जर देव प्राप्त होईल, तर "अन्न" या शब्दाचा उच्चार करून दुष्काळाच्या प्रसंगीं शेंकडों लोकांचे प्राण वांचतील; पाहिजे त्या इच्छिलेल्या विषयाचें नांव घेऊन लोक तो प्राप्त करून घेतील व इतका जो सर्व जगामध्यें खटाटोप चालला आहे त्याची कांहींच गरज रहाणार नाहीं. परंतु नांवाचा उच्चार केला असतां त्या नांवानें वाच्य जो विषय तो आपणास मिळेल असें वाटण्याइतका मूर्ख या जगामध्यें कोणीही नाहीं. परमार्थाच्या संबंधानें मात्र पुष्कळ लोक अशा प्रकारचे मूढ आहेत. त्यांनां वाटतें कीं केवळ देवाच्या नांवाचा उच्चार वारंवार केला असतां देव प्राप्त होतो, किंवा त्यांस तसें नच वाटलें तरी नांवाचा उच्चार केवळ तोंडावाटेच होत असतांही ते फळाची आशा धरून बसतात. तर अशा प्रकारचा केवळ बाह्य उच्चार व्यर्थ ह्मणून तुकोबा मागतात कीं,

नांवाचा जो उच्चार आपल्याकडून व्हावा तो अंगामध्यें देवाविषयीं प्रेम भरून व्हावा. "नाम आठवितां सद्गदित कंठीं । प्रेम वाढे पोटीं ऐसें करीं ॥ रोमांच जीवन आनंदाश्रु नेत्रीं । अष्टांगही गात्रीं प्रेम तुझें ॥" असें दुसऱ्या एका ठिकाणीं तुकोबांनींच ह्मटलें आहे. तर मुख्य गोष्ट कोणती कीं नांवाच्या उच्चाराच्या वेळीं देवाचें स्मरण होऊन, देवाचें स्वरूप ध्यानांत येऊन, त्याजविषयींच्या प्रेमानें अंतःकरण सर्व भरून जावें. या प्रकारें स्मरण आणि प्रेम या मुख्य गोष्टी असल्यामुळें देवास अमक्याच भाषेंतील अमक्याच शब्दांनीं आळविलें पाहिजे असें नाहीं. त्या गोष्टी जिकडेस असतील तिकडेस शब्द कोणतेही कोणत्याही भाषेंतील असले तरी चिंता नाहीं. आतां अशा प्रकारें प्रेमपूर्ण अंतःकरणानें देवाचें स्मरण करवेल तितकें केलेंच पाहिजे हें खरें आहे. परंतु हें नामस्मरण उपलक्षण आहे. जगांतील अनेक व्यवहार करीत असतां अशा प्रकारचें नामस्मरण करितां येण्यासारखें नाहीं. ह्मणून तो वेळ परमार्थाच्या दृष्टीनें व्यर्थच गेला असें होत नाहीं. कोणाचें वाचेनें समाधान करण्यामध्यें, कोणाची तृषा व क्षुधा शांत करण्यामध्यें, किंवा इतर दुसऱ्या परोपकाराच्या उद्योगामध्यें गुंतलें असतां जो वेळ जातो तो कांहीं परमार्थाच्या दृष्टीनें व्यर्थ नाहीं. देवास स्मरून, देव संतुष्ट व्हावा ह्मणून, त्यास संतोष होईल अशा रीतीनें जगांतील सर्व व्यवहार केले असतां देवाच्या नामस्मरणाचाच प्रकार तो होतो. अनेक प्रकारच्या मण्यांच्या गुंफलेल्या हारामध्यें सर्व मण्यांतून जसें सूत एकच असतें तसें सर्व व्यवहारांचें धोरण ईश्वरसंतोषरूप एकच असलें म्हणजे झालें.

तसेंच संतांच्या पायीं वेळोवेळां डोई ठेविली पाहिजे. थोर गृहस्थांची सुप्रसन्न, समाहित, गंभीर व प्रेमळ मुद्रा लांबूनही पाहिली तरी मनावर उत्तम परिणाम होतो. यत्किंचित् त्यांच्या अंगाचा स्पर्श झाला ह्मणजे कधीं कधीं वाटतें कीं त्यांच्या स्पर्शानें पवित्र झालेली काया दुराचरणानें इतःपर कधींही दूषित करूं नये. मग पूज्यभावानें त्यांच्या चरणीं मस्तक ठेंगणा केल्यास खरोखरच आपलें कल्याण होईल. तसेंच लाक्षणिक रीतीनेंही संतांच्या चरणीं डोई ठेविली पाहिजे. त्यांची चरित्ररूप व वचनरूप जी काया तिचा आपण आदर केला पाहिजे. त्यांचीं वचनें नेहेमीं मनामध्यें घोळवून त्यांच्या आचरणाचा कित्ता वळविला पाहिजे.

या प्रकारचा भवतरणाचा उपाय तुकोबांस खात्रीचा वाटला. आणि सर्व प्रकारच्या लक्ष्मीचा जो पति त्याजपाशीं हेंच श्रेष्ठ व सर्वांत कल्याणकारक ह्मणून दान मागितलें कीं, त्या उपायाची आपल्या हातून योजना व्हावी. ह्या जगाचा कोणी शास्ता आहे व आपणांस अंतीं त्याजवळ जावयाचें आहे असें जे जे ह्मणून मानितात, त्यांस भवतरणाची इच्छा असतेच; परंतु उपायाची योजना मात्र होत नाहीं. कारण कीं देहाविषयीं व्हावे त्या प्रकारें विरक्त ते झालेले नसतात व आत्म्याच्या कल्याणापुढें देह त्यांस तुच्छ वाटत नाहीं. रस्त्यानें चाललें असतां ज्या देहास महारमांगांचा हजारदां स्पर्श होतो, त्या देहास

प्राण गेला असतांही महारमांगांनीं स्पर्श करून श्मशानीं पोंचवूं नये, असें मोठमोठ्या श्रीमंत लोकांसच नव्हे तर यःकश्चित् मोलमजुरासही वाटतें. येवढा आपला देहाविषयीं अभिमान, मग विरक्ति कोठची ?

२२. आध्यात्मिक भरती ओहटी.

कां माझा विसर पडिला मायबापा । सांडियेली कृपा कोण्या गुणें ॥ १ ॥
कैसा कंठूनियां राहों संवसार । काय एक धीर देऊं मना ॥ २ ॥
नाहीं निरोपाची पावली वारता । करावी ते चिंता ऐशी कांहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे एक वेंचुनी वचन । नाहीं समाधान केलें माझें ॥ ४ ॥

या सृष्टीकडेस पाहिलें ह्मणजे आपणांस एक असा साधारण नियम दिसून येतो कीं, सर्वांत कनिष्ठ ज्या शक्ति आहेत त्यांच्यामध्यें कांहीं चलबिचल नसते. त्या एकसारख्या आपलें काम करीत असतात. त्यांचें काम एकाच वेगानें चाललें असतें. ताज्यातवान्या होण्यास त्यांस विश्रांति घ्यावी लागत नाहीं. परंतु उंच दर्जाच्या ज्या शक्ति आहेत, त्यांस कांहीं वेळ काम केल्यावर पूर्वीच्या वेगानें काम करण्यास समर्थ होण्यासाटीं आपआपल्या उच्चतेच्या मानानें कमीअधिक विश्रांति घ्यावी लागते. त्या शक्तींच्या व्यापारांमध्यें नेहमीं भरती ओहटी असते. आपल्या आध्यात्मिक स्थितीसही हा नियम लागू आहे. कित्येक भक्त ईश्वरभजनाविषयीं सर्वकाळ इतके उद्युक्त असतात कीं, त्यांस ईश्वराचें दर्शन, ईश्वराचा साक्षात्कार, सर्वकाळीं सारख्याच स्पष्ट रीतीनें होत असावा असें इतर लोकांस बाहेरून वाटतें. परंतु, एका क्षणीं एक दुसऱ्या क्षणीं दुसरा, अशा प्रकारें मनामध्यें जसे नानातरंग मनुष्यांवरील प्रेमाच्या संबंधानें उत्पन्न होतात, तसेच तरंग ईश्वराच्या प्रेमाच्या संबंधानें भक्तांच्या मनांत उत्पन्न होतात. व, आपणांस निरनिराळ्या वेळीं झालेले अनुभव, निरनिराळ्या वेळीं झालेली आपल्या मनाची स्थिति, ज्या ज्या भक्तांनीं आपल्या उक्तींनीं उघड केली आहे, त्यांच्या त्यांच्या त्या उक्तींवरून स्पष्ट दिसून येतें कीं, त्यांच्या ठायीं असे तरंग उत्पन्न होत असत. ह्मणून भक्तांचें वर्णन करितांनां ह्मटलें आहे कीं:—

वाग्गद्गदा द्रवते यस्य चित्तं रुदत्यभीक्ष्णं हसति क्वचिच्च ।
विलज्ज उद्गायति नृत्यते च मद्भक्तियुक्तो भुवनं पुनाति ॥

त्याची वाचा सद्गदित होते, त्याचें चित्त द्रवतें, तो वारंवार रुदन करितो, क्वचित् तो हंसतो, निर्लज्जपणें मोठ्यानें गातो व नाचतो. अशा प्रकारचे तरंग तुकोबांच्या अभंगांत फार दिसून येतात, कारण त्यांनीं आपलें सर्व अंतःकरण त्या अभंगांमध्यें जसें केवळ उघडें करून दाखविलें आहे. त्यांच्या कांहीं उक्ति आनंदाच्या, कांहीं ईश्वराशीं सलगीच्या, कांहीं निराशेच्या, व कांहीं खेदाच्या अशा आहेत. वर दिलेल्या अभंगामध्यें त्यांचे खेदाचे उद्गार आहेत. ज्या वेळेस असे उद्गार त्यांनीं काढले त्या वेळेस त्यांस, अन्य प्रसंगीं होणारें जें ईश्वरदर्शन, अंतःकरणामध्यें होणारा जो देवाचा साक्षात्कार, तो, यत्न

करूनही, झाला नसावा. ह्मणून देवाची, आपणावर गैरमर्जी झाली, देव आपणास विसरला, असें वाटून त्यांस पराकाष्ठेचें दुःख झालें असावें, व अशा प्रकारें देवाची विनवणी त्यांनीं केली असावी. तर त्यांस इतकें दुःख कां झालें? याचें कारण असें कीं, देवाच्या दर्शनाचें मोल त्यांस पूर्णपणें कळत होतें, आणि ह्मणूनच देवानें आपणास नेहमीं दर्शन द्यावें, आपला नेहमीं अंगीकार करावा, अशी त्यांची अत्यंत उत्कट इच्छा होती; आणि, कोणतीही इच्छिलेली वस्तु प्राप्त झाली नाहीं ह्मणजे इच्छेच्या मानानें दुःख होतें. तसेंच कोणतीही गोष्ट आपणांस साध्य होणें हें, ज्या मानानें आपण तिच्याविषयीं बळकट इच्छा धरितों व तिजसाठीं उद्योग करितों, त्यावर बहुतांशीं अवलंबून असतें, असें असूनही आपल्या इच्छेच्या व यत्नांच्या मानानें आपल्यास कांहींच फळ प्राप्त झालें नाहीं असें त्यांस वाटलें. शिवाय, दुसऱ्या एखाद्यास आपला विसर पडला तर चालेल, परंतु, ज्यांचें आपणांवरील प्रेम इतर व्यक्तींच्या प्रेमापेक्षां साहजिकपणें अत्यंत अधिक असावयाचें, अशीं जीं आईबापें, त्यांस जर आपला विसर पडला, तर तो अत्यंत दुःसह. ह्मणून प्रेमाचें पूर्ण अधिष्ठान व त्यामुळें मायबापांचा मायबाप असें ज्या परमेश्वरास तुकोबांनीं ओळखिलें होतें, त्यास त्यांच्या समजुतीनें पडलेला आपल्याविषयींचा विसर त्यांनां अत्यंत दुःसह झाला, व आपला विसर कां पडला, ह्मणून मोठ्या कळवळ्यानें ते देवास त्या विसराचें कारण पुसते झाले.

काळजीही त्यांनां उत्पन्न झाली. हा संसार फार दुस्तर आहे. यामध्यें शोकाचीं व दुःखाचीं अनेक कारणें आहेत, अनेक संकटें व अनेक अडचणी आहेत. कामक्रोधादि मनोविकारांपासून ऐहिक अहित पुष्कळदां होतेंच, परंतु आध्यात्मिक कल्याणाच्या संबंधानें जो त्यांजपासून आपला प्रतिक्षणीं नाश होत आहे त्याचें तर मानच करितां येत नाहीं. संसारांतून आपणांस सुरक्षितपणें पार पडलें पाहिजे, व पार पडणें तर अशा प्रकारें फारच दुष्कर हें तुकोबांस पक्कें ठाऊक होतें. यास्तव, देवास आपल्याविषयीं पडलेला विसर पाहून, त्यांस मोठी काळजी वाटली व त्यांच्या मनामध्यें मोठी भीति उत्पन्न झाली. तर अशा प्रसंगीं कांहींतरी समाधानकारक निरोप आपणास देवापासून येऊन पोहोंचावा; एखादा तरी आपल्या अंतःकरणामध्यें देवाचा शब्द उमटावा; "ना भी, ना भी," असें करुणायुक्त उत्तर आपणास मिळावें ह्मणून ते फारच उत्कंठित झाले.

एखादे वेळेस परमेश्वराचा शब्द आपल्या अंतःकरणामध्यें उठला नाहीं, त्याची नेहमींप्रमाणें भेट झाली नाहीं, त्याच्या भजनपूजनाचा नेहमींप्रमाणें प्रसाद मिळाला नाहीं, व देव आपणास विसरलासें वाटलें, तर कोण ही तुकोबांची काळजी, भीति, खेद व विनवणी! नाहीं तर बाकीचे लोक. देव आपणांस विसरला नाहीं तरी आपण होऊन बुद्ध्या देवास विसरावयास पाहतात. देव ह्मणजे संसारामध्यें मनःपूत वागण्याच्या आड एक अडथळाच आहे व अंतःकरणांतील विवेकरूप त्याचा प्रतिनिधि ह्मणजे उगाच नसत्या उठाठेवी करणारा

कोणी आहे, असें त्यांस वाटतें. कोणताही प्रसंग आणून देवानें त्यांस जागृत केलें तर ते देवावर रागावतात; देवास नांवें ठेवतात व दोष देतात. कधीं कधीं ते अर्धवटच जागे होऊन पुनः लागलेच झोंपीं जातात, व आपणांस कोणीतरी जागें करीत होतें हेंही ते विसरून जातात. कामक्रोधादि विषयांपासून कांहीं ऐहिक अहित झालें, तर आपण त्यांस वश झालों म्हणून त्या त्या प्रसंगीं त्यांस वाईट वाटतें खरें, परंतु तसें वश होणें यांत कांहीं देवाच्या दृष्टीनें अयोग्य होतें म्हणून वाईट वाटत नाहीं तर केवळ झालेल्या ऐहिक नुकसानामुळें. अशी स्थिति बरी काय म्हणून जर कोणास विचारिलें तर बरी म्हणून कोणीही म्हणणार नाहीं. परंतु अशी स्थिति तर आम्ही आपली जाणून बुजून होऊं देतों. वर सांगितल्याप्रमाणें भक्तांच्या संबंधानेंही आध्यात्मिक भरती ओहटी असते, नेहमीं भरतीच नसते, कधीं कधीं ओहटीही असते, हें खरें. परंतु आमची ही नेहमींचीच ओहटीची स्थिति झाली; आम्हांस भरती कधींच नाहीं; जणूं काय ज्या आध्यात्मिक उदकास भरती यावयाची तें उदकच आम्हांमध्यें नाहीं.

---

२३. देवाशीं तन्मयता.

मम हि संप्रति सातिशयप्राक्तनोपलम्भसंभावितात्मजन्मनः संस्कारस्यानवरतप्रबोधात् प्रतायमानस्तद्विसदृशप्रत्ययान्तरैरतिरस्कृतप्रवाहः प्रियतमास्मृतिप्रत्ययोत्पत्तिसंतानस्तन्मयमिव करोत्यन्तर्वृत्तिसारूप्यतश्चैतन्यम् ।

भवभूतीनें रचिलेल्या मालतीमाधवनामक नाटकांतील नायकाची ही उक्ति आहे. माधव ह्मणतो कीं, नायिका जी मालती हिचें आपल्याला प्रथम स्पष्टपणें दर्शन झालें, त्यामुळें मनावर तिचा संस्कार झाला, त्या संस्काराचें सतत उद्बोधन ह्मणजे जागृति होत आहे, त्यामुळें तिचें स्मरण एकसारखें दीर्घ होत आहे, व त्या स्मरणरूप प्रवाहाच्या आड येऊन तें स्मरण नाहींसें करून टाकील असा कोणत्याही दुसऱ्या वस्तूचा विचार मनांत येत नाहीं, यामुळें माझी अंतर्वृत्ति तिच्याशीं सरूप झाली आहे व माझा अंतरात्मा जसा काय तिचाच (तिजपासूनच) बनला आहे.

उपदेशांच्या शुष्कपणाविषयीं लोकांत नेहेमीं थट्टा होतच असते. तशांत अशा प्रकारचा शृंगारिक उतारा ज्या उद्देशानें आह्मीं येथें घेतला आहे तो उद्देश ध्यानांत आणिला ह्मणजे अप्रयोजकतेची व अरसिकतेची कमालच झाली असें कित्येकांस वाटण्यासारखें आहे. परंतु, अमुक प्रकारें तुझ्या ठायीं माझी भक्ति जडो, असें मागते वेळेस प्रऱ्हादानें देवापाशीं असें मागितलें कीं जशी सांसारिक मनुष्याची संसाराच्या ठायीं भक्ति तशी माझी तुझ्या ठायीं असो. तसेंच, जरी पति व पत्नी, किंवा नायक व नायिका, यांमधील प्रेम हें क्षुद्र तऱ्हेचें प्रेम अशी साधारणतः लोकांची समजूत आहे, तरी तें योग्य प्रकारचें व योग्य प्रमाणानें असलें ह्मणजे त्याच्या ठायीं पवित्रता उत्पन्न होऊन ईश्वरावरील प्रेमाचें अंगच तें होऊन जातें. शिवाय हेंही ध्यानांत ठेवण्यासारिखें आहे कीं, आपल्या वाडवडिलांनीं ज्ञानसंपादन केलें तें केवळ तत्त्वाचा निश्चय करितां यावा ह्मणून, धनाचा आदर केला तो परोपकाराचीं व पुण्याचीं धर्मकृत्यें करितां यावीं ह्मणूनच, विवाह केला तो अपत्यांसाठींच, व जीविताचा आदर केला तो तपश्चरणासाठींच, यामध्यें शृंगारिक पात्रांचें निर्माण करणाऱ्या भवभूतीसही मोठी प्रौढि वाटली. तर त्या भवभूतीस हा आह्मीं येथें उतारा घेतला यामध्यें कांहीं अप्रयोजकता वाटली नसती.

देवाशीं तन्मय व्हावें असा प्रत्येक साधकाचा उद्देश असतो. तर ती तन्मयता कोणत्या प्रकारें घडून येईल हें वरील उक्तीमध्यें निर्दिष्ट झालें आहे. प्रथम देवाचें स्पष्ट रीतीनें दर्शन झालें पाहिजे, त्या दर्शनानें जो देवाचा संस्कार अंतःकरणावर होईल, त्याची पुनः पुनः जागृति झाली पाहिजे, ह्मणजे त्याचें पुनः पुनः स्मरण होईल, व ज्या वस्तूंचें

दर्शन त्या स्मरणाच्या आड येईल त्या वस्तूंपासून दूर राहिलें ह्मणजे आपली अंतर्वृत्ति देवाशीं सरूप होईल व आह्मी देवाशीं तन्मय होऊं, देवाचे अंशच होऊं. देवाचें दर्शन आपणांस अनेक वेळ स्पष्ट होत आहे व होण्यासारखें आहे. आपल्या अंतःकरणामध्यें तो अधिष्ठित आहे. आपण मात्र त्याजकडे वळून त्याला पाहिलें पाहिजे. आणि कधीं कधीं सृष्टीचें विशेष सौंदर्य किंवा विशेष गंभीरता पाहून, कधीं कधीं विशेष आनंदाच्या किंवा दुःखाच्या प्रसंगीं, कधीं कधीं कांहीं कारण नसतां अवचितच, ईश्वराचें दर्शन आपल्यास होतें व त्या दर्शनाचा मनावर संस्कार होतो. परंतु तो संस्कार दृढ झाला पाहिजे; त्याची पुनः पुनः जागृति झाली पाहिजे. ह्मटलेंच आहे कीं, श्मशानामध्यें मनाची जी स्थिति होते, किंवा रोग्याच्या मनाची जी रोगाच्या वेळीं होते, ती सर्वकाळ जर कायम राहील तर या संसाराच्या बंधनांतून कोण सुटणार नाहीं? ती स्थिति कायम रहात नाहीं ह्मणूनच मनुष्य सुटत नाहीं. तर त्या संस्काराचें उद्बोधन व्हावयाचें, तें ध्यानानें, श्रवणानें—साधुसंतांच्या वचनांचें व ग्रंथांचें वाचन हाही श्रवणाचाच प्रकार—सत्पुरुषांच्या चरित्रांच्या अवलोकनानें; व अशाच अन्य उपायांनीं व संस्काराच्या उद्बोधनापासून अंतःकरणामध्यें होणारा जो स्मरणरूप देवाचा प्रत्यय त्याच्या आड येणाऱ्या ज्या गोष्टी, ह्मणजे संसार किंवा विषय, त्यांस आड येऊं न देतां उलट ते सहायभूत होतील अशी त्यांची योजना केली पाहिजे.

२४. धर्माचरणाची कसोटी.

माझा तुह्मीं देवा केला अंगीकार। हें मज साचार कैसें कळे ॥ १ ॥
कां हो कांहीं माझ्या नये अनुभवा। विचारितां देवा आहें तैसा ॥२॥
लौकिकाचा मज लाविसी आभार। शिरोरत्न भार दुःखाचा हा ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं पालट अंतरीं। तेथें दिसे हरी ठकाठकी ॥ ४ ॥

कांहीं गोष्टींचें ज्ञान इंद्रियांनीं होतें, कांहींचें अनुमानानें होतें. ज्या वस्तु इंद्रियांस गोचर नाहींत त्यांचें ज्ञान कोणत्या तरी चिन्हानें, कोणत्या तरी त्यांच्या परिणामानें किंवा कार्यानें, मनुष्यास होतें किंवा तो करून घेतो. तेव्हां देवानें आपला अंगीकार केला किंवा नाहीं हें जर जाणण्याची इच्छा असेल तर वरील अभंगांत दर्शविलेल्या रीतीनें जाणावयास यत्न केला पाहिजे. आपल्या मनाची, आपल्या अंतःकरणाची, स्थिति पालटली आहे कीं नाहीं याचा विचार केला पाहिजे. जर आपलें अंतःकरण पूर्वींपेक्षां शुद्ध होत गेलें, जर आपल्या अंतःकरणामध्यें सर्व काळीं व सर्व स्थळीं समाधान राहिलें, जर आपल्या ठायीं दया क्षमा वाढत गेल्या, तर समजावें कीं, देवानें आपला अंगीकार केला. परंतु या प्रकारचा पालट यत्किंचित्ही जर आपल्यामध्यें झाला नसला, किंवा उलटच प्रकारचा झाला असला, तर समजावें कीं, देवानें आपला अंगीकार केला नाहीं. ह्मणून कोणत्याही धर्माच्या अनुयायांच्या आध्यात्मिक स्थितीवरून त्या धर्माच्या योग्यायोग्यतेचा निर्णय करण्याचा जो लोकांमध्यें प्रकार आहे तो केवळ चुकीचा नव्हे. "तुह्मी आपला धर्म खरा ह्मणून सांगतां; आपल्या धर्माचा स्वीकार केला असतां देव पावतो असें तुह्मी सांगतां. परंतु आह्मांस कांहीं तें खरें वाटत नाहीं; आह्मांस तें कांहीं पटत नाहीं. तुमच्यामध्यें कांहीं चांगल्या तऱ्हेचा पालट झालेला आह्मांस दिसत नाहीं. तुह्मांपैकीं प्रत्येक व्यक्ति इतर व्यक्तीच्या संबंधानें, प्रत्येक वर्ग इतर वर्गांच्या संबंधानें, प्रत्येक राष्ट्र इतर राष्ट्रांच्या संबंधानें, प्रत्येक धर्मपंथ इतर धर्मपंथांच्या संबंधानें, स्पर्धेचें व द्वेषाचें पूर्ण अधिष्ठान बनून गेलीं आहेत; आणि क्षुल्लक कारणांसाठीं एकमेकांवर तुटून पडण्यास तयार असतात. त्या तयारीसाठींच केवळ कोट्यावधि रुपये खर्च करितात, व तुटून पडतात. तर मग देवानें तुमचा अंगीकार केला असें आह्मीं कशावरून खरें मानावें ?" असें जर एका धर्माच्या अभिमान्यानें दुसऱ्या धर्माच्या अभिमान्यास ह्मटलें तर कांहीं वाउगें होणार नाहीं. व जर त्या दुसऱ्या धर्माचे अनुयायी त्या धर्माचें अवलंबन आपल्या सर्व आचारविचारांमध्यें पूर्णपणें करीत असतील आणि असें असूनही, किंवा असें आहे ह्मणूनच, जर त्यांची वर सांगितल्याप्रमाणें स्थिति असेल तर त्या धर्माची योग्यताच कमी असेंही अनुमान कांहीं चुकीचें होणार नाहीं. परंतु पुष्कळदां असें दिसून येईल कीं मनुष्याचा धर्म

त्याच्या आचारापेक्षां पुष्कळ शुद्ध असतो. परंतु तो शुद्ध आहे येवढ्यानेंच कांहीं आपलें कार्य होत नाहीं. जर त्यापासून आपल्यामध्यें कोणत्याही तऱ्हेचा चांगला पालट झाला नाहीं, तर तो शुद्ध असून नसून सारखाच असें ह्मणण्यास फारशी हरकत नाहीं. हा पालट आपल्यामध्यें कां होत नाहीं? आमचा धर्म जरी कदाचित् अत्यंत शुद्ध नसला, तरी जितक्या मानानें तो शुद्ध आहे तितक्या मानानें तरी आह्मांमध्यें चांगला पालट कां होऊं नये? अशा प्रकारचा पालट व्हावा अशी जर सुदैवानें आमच्या मनांत इच्छा उत्पन्न झाली, व कां होत नाहीं ह्मणून जर विचार केला, तर कारण लागलेंच दिसून येईल. एका कल्पित गोष्टीमध्यें सांगितलेल्या एका कृपणाच्या अवस्थेप्रमाणें आपली अवस्था आहे. त्यानें एक मोठा सोन्याचा गोळा एका खळग्यामध्यें ठेविला होता, व नित्य तो पहावयास मात्र जात असे; त्याचा कोणत्याही तऱ्हेनें सदुपयोग करण्याचें त्याच्या मनांत कधींच आलें नाहीं; केवळ आपल्यापाशीं येवढा गोळा आहे या भावनेनेंच तो आपणास धन्य मानीत होता; आणि तो कांहीं त्यास लाभला नाहीं. आह्मी आपला धर्म देवळामध्येंच किंवा देवघरामध्येंच ठेविला तर ठेवितों; दुसऱ्या कोणीं आपल्या धर्माचा अभिमान दाखविल्यास आपणांस अभिमान दाखवितां येण्यापुरता मात्र कायतो आपण तो बाळगितों; कदाचित् धर्मोपदेश आपल्या कानीं चुकून पडलाच, तर तो एका कानानें ऐकून दुसऱ्या कानानें सोडून देतों. आपल्या धर्मास बाहेर आणून प्रत्येक कृत्य त्याच्या अनुरोधानें करावयाचें आमच्या मनांत फारच थोडके वेळ येतें; सर्व प्रकारची जी आपली सध्यांची दीन अवस्था झाली आहे, ती आपले विचार, उच्चार व आचार यांपासून आपला धर्म आपण वेगळा राखितों, धर्म व संसार यांस एकमेकांपासून अलिप्त राखितों, धर्मास संसारांत हात घालूं देत नाहीं व संसारास धर्मापाशीं जाऊं देत नाहीं, ह्मणून. राज्यप्रकरणीं आपली स्थिति आपल्या प्रत्येकाच्या स्वहितपरतेच्या योगें सुधारत नाहीं याचें कारण हेंच; जर साधुसंतांनीं केलेला धर्मोपदेश व त्यांच्या चरित्रांतील बोध नित्य ध्यानामध्यें वागवून आपली स्वार्थपरता आह्मीं थोडीशी कमी केली, तर खचितच आपलें राज्यप्रकरणीं कल्याण होणार आहे. सामाजिक सुधारणेच्या संबंधानें आह्मी मागें घेतों, कितीही अनाचार चालले असले तरी लोकांच्या लाजेमुळें व भीतीमुळें त्यांजकडेस डोळेझांक करितों. परंतु असत्याशीं भांडणें, समाजाचें जितकें होईल तितकें कल्याण करणें हें आमचें कर्तव्य आहे, हा आमचा धर्म आहे, व तें करण्यामुळें कितीही आह्मांस कष्ट झाले तरी ते सोसणें आपणांस भाग आहे, असें जाणून जर आह्मी वागलों, तर समाजाचें फारच कल्याण होईल. तसेंच धर्म आणि संसार यांस एकमेकांपासून दूर राखिलें असतां आपल्या धर्मश्रद्धेपासून आपलें कोणतेंही कल्याण होणार नाहीं हें लक्ष्यांत वागवून जर स्वतःच्या संबंधाचीं किंवा वर सांगितलेलीं इतरांच्या संबंधाचीं सर्व कृत्यें न्यायानें, विवेकानें व शुद्ध अंतःकरणानें केलीं, व सर्वांशीं स्नेहानें व प्रेमानें वागलों, तर आपलें स्वतःचें आध्यात्मिक

कल्याण होईल यांत कांहीं संशय नाहीं. जो पालट आपल्यामध्यें झाला पाहिजे परंतु तो झाला नाहीं अशा भावनेनें तुकोबांस खंती वाटली, तो पालट आपल्यामध्यें अशा प्रकारें होईल. जितक्या मानानें आपण आपली श्रद्धा शुद्ध राखून त्या धर्मश्रद्धेचा व संसाराचा समेट घालूं, त्यांचें ऐक्य करूं, तितक्या मानानें आपल्या अंतःकरणामध्यें इच्छिलेला पालट पडेल.

---

२५. देवाच्या ठायीं मन निश्चळ कां रहात नाहीं ?

एकविध वृत्ति न राहे अंतरीं । स्मरणींच हरी विस्मृति हे ॥ १ ॥
कैसा हा नवलाव वाटतो अनुभवें । मज माझ्या जीवें साक्षित्वेंसीं ॥ २ ॥
न राहे निश्चळ जागवितां मन । किती क्षणेंक्षण सांवरावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे बहु केले वेवसाव । तेणें रंगें जीव रंगलासे ॥ ४ ॥

या तुकोबांच्या अभंगाविषयीं पूर्वी एका प्रकरणामध्यें विचार केला आहे. पुनः आणखी विचार या लेखामध्यें करण्याचें योजिलें आहे. तुकोबासारख्यांच्या वचनांचा जितके वेळां व जितक्या तऱ्हांनीं विचार करावा तितका थोडाच.

देवाचें ध्यान भजन करीत असतां मनास कितीही सांवरलें तरी तें निश्चळ रहात नाहीं, स्मरणींच विस्मृति होते. असा प्रकार कां ? तर याच अभंगामध्यें कारण सांगितलें आहे. पुष्कळ व्यवसाय ह्मणजे उद्योग आपण करितों, त्या उद्योगांच्या रंगानें आपलें चित्त रंगलेलें असतें. त्या उद्योगांच्या संबंधानें आपलें मन इतकें तद्रूप झालेलें असतें कीं देवाच्या ठायीं त्यास गुंतविणें कठीण जातें. परंतु एका विषयामध्यें दंग झालेलें मन काढून दुसऱ्या ठिकाणीं त्यास गुंतविणें नेहेमींच कठीण जातें असें नाहीं. धनानें, मानानें, अधिकारानें, विद्येनें किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें आपणांस पूज्य वाटणारा गृहस्थ आपल्या समोर असला, व तो आपल्यापाशीं किंवा आपण त्याजपाशीं बोलत असलों, तर आपलें मन इतर विषयांनीं कितीही जरी रंगलेलें असलें तरी, तें अशा प्रकारें कधींच भ्रमण करीत नाहीं. मग सर्वांत श्रेष्ठ अशा पुरुषाचा सहवास अनुभवीत असतां त्याला एका क्षणामध्यें आपण विसरून जावें हें केवढें आश्चर्य ! याचें कारण हें कीं आपल्यासारख्या मनुष्यप्राण्याचें सांनिध्य आपणांस जसें स्पष्ट रीतीनें प्रतीत होतें तसें अमूर्त जो परमेश्वर त्याचें होत नाहीं. ह्मणून आमचे मूर्तिपूजक बंधु आह्मांस उपदेश करितात कीं अशा अमूर्त परमेश्वराच्या ठायीं जर आपलें मन निश्चल करावयाचें आह्मांस आहे, तर प्रथम मूर्तींच्या ठायीं तें निश्चल करण्याचा अभ्यास आह्मीं केला पाहिजे आणि असा अभ्यास करून करूनच अमूर्त परमेश्वराच्या ठायीं तें निश्चल करण्यास आह्मी समर्थ होऊं. परंतु, आपलें मन मूर्तींच्या ठायीं निश्चल केलें पाहिजे हा विचार तरी मूर्तींची पूजा करिते वेळेस मूर्तिपूजकांपैकीं किती जणांच्या ध्यानांत येतो, त्यांतूनही किती जण त्याप्रमाणें करूं पहातात, देवाचें पूजन करीत असतां ज्या प्रकारची वृत्ति व्हावी त्या प्रकारची वृत्ति मूर्तिपूजेच्या वेळेस होण्याचा कितपत संभव आहे,हे व अनेक दुसरे अशाच प्रकारचे प्रश्न या त्यांच्या उपदेशापासून, साहजिक उत्पन्न होतात. तथापि ते एकीकडेस राहूंद्या. येरव्हींही हा उपदेश सयुक्तिक नाहीं. एखाद्या मुलास उद्योगाची संवय लावावयाची असल्यास, तूं आळसामध्यें

राहाण्याचा अभ्यास कर ह्मणजे तुला उद्योगाची संवय लागेल, असा आह्मी त्यास उपदेश करीत नाहीं व तशा प्रकारचा अभ्यासही आपण त्यास करावयास लावीत नाहीं. सत्य बोलण्याची त्यास संवय लावावयाची असल्यास असत्य बोलावयाचा अभ्यास त्याला करावयास लावीत नाहीं. ज्या प्रकारची संवय लावावयाची त्याच प्रकारचा अभ्यास पाहिजे. देव आहे अनादि, अनंत, त्यास हस्तपादादि अवयव नाहींत तरी त्या अवयवांनीं करावयाचीं सर्व कांहीं कृत्यें तो करितो; व तो चिन्मय आहे. या व अनेक दुसऱ्या गोष्टींनीं, मूर्ति याच्या अगदीं उलट आहे. तर मूर्तीच्या ठायीं मन निश्चल करावयाचा अभ्यास केल्यानें देवाच्या ठायीं निश्चळ रहाण्यास तें कसें समर्थ होईल? मन निश्चळ करणें कांहीं कठीण नाहीं. आपणां सर्वांचें मन विषयांच्या ठायीं निश्चळ आहेच. कांहीं प्रापंचिक कार्यांमध्यें आपण कधीं कधीं इतके दंग होतों कीं दुसऱ्या कशाचें भान रहात नाहीं. देवाच्या ठायीं त्यास निश्चळ करणें कठीण, कारण कीं देवाचें सान्निध्य व्हावें तितक्या स्पष्ट रीतीनें आह्मांस प्रतीत होत नाहीं.

अशा प्रकारच्या प्रतीतीस मूर्तस्वरूप आवश्यक आहेच असें नाहीं. दूरदेशीं रहाणाऱ्या व पुरातन काळीं होऊन गेलेल्या थोर थोर पुरुषांचीं आह्मी चरित्रें व वचनें वाचतों. त्यांचें कायिक स्वरूप किंवा त्या स्वरूपाची प्रतिमा सुद्धां आमच्या कधींही दृष्टीस पडत नाहीं. तथापि त्यांच्या दर्शनानें, त्यांच्या सहवासानें, आमच्या मनावर घडावयाचे जे परिणाम ते परिणाम त्यांच्या चरित्रांच्या व वचनांच्या वाचनानें आह्मांवर होतात. त्यांच्या विषयीं आदरबुद्धि व पूज्यता मनांत सदैव वागून एका प्रकारचा त्यांचा सहवासच आह्मी अनुभवितों. तसेंच एखादी मनोवेधक कादंबरी वाचीत असतां मन तिजमध्यें गढून जातें व त्यांतील पात्रांस आपआपलीं कार्यें करितांनां व बोलणीं बोलतांनां आपण जणूं काय चर्मचक्षूंनींच पहात आहों अशी आपली स्थिति होते. अशा वेळेस एखाद्या अद्भुत कल्पनाशक्तीच्या वाचकाच्या मनांत त्या पात्रांची त्यांच्या त्यांच्या कार्यांच्या व शब्दांच्या अनुरूप प्रतिमा उभी रहात असेल तर असो. परंतु साधारण प्रतीचे जे वाचक आहेत त्यांच्या मनांत मूर्ति तर कोणत्याही प्रकारची उभी रहात नाहीं; तथापि त्या पात्रांचा अनुभव हा मात्र त्यांस समक्ष स्पष्ट रीतीनें होतो. यावरून असें दिसून येतें कीं सांनिध्याचा स्पष्ट अनुभव होण्यास मूर्त स्वरूपाची अपेक्षा आहेच असें नाहीं.

आतां वर सांगितलें आहे कीं, ज्या गृहस्थास आपण कोणत्याही कारणामुळें मान देतों, असा आपल्या जवळ असला तर, इतर विषयांनीं आपलें मन कितीही जरी रंगलेलें असलें तरी त्याचें आपणांस विस्मरण होत नाहीं. याचें कारण आह्मांस प्रथमदर्शनीं वाटतें कीं तो गृहस्थ आह्मांस चर्मचक्षूंनीं दिसतो. देव तसा दिसत नाहीं ह्मणून त्याचें विस्मरण होतें. परंतु खरोखर पाहिलें असतां तो गृहस्थ कांहीं आपणांस चर्मचक्षूंनीं दिसत नाहीं. दिसतें काय तर त्याचा देह, त्याची चर्या, त्या देहाच्या योगें तो जे व्यापार करितो ते. त्या चर्येवरून व त्या व्यापारांवरून तो साधु किंवा असाधु आहे, आपला मित्र किंवा शत्रु

आहे, हें अनुमानानें आपण काढतों. असें आहे ह्मणूनच पुष्कळदां एखाद्या मनुष्याच्या खऱ्या स्वरूपाविषयीं आह्मी फसतों. जें कांहीं त्या मनुष्यासंबंधीं आह्मांस चर्मचक्षूंनीं दिसतें तेंच जर त्याचें स्वरूप असतें, तर अशी चूक होती ना. या प्रकारें, मनुष्याचें सध्याचें केवळ वसतिस्थान जो देह तो पाहून, त्या देहाची हालचाल पाहून, त्याचें बोलणें ऐकून, त्या मनुष्याचें सान्निध्य जर आपल्यास अशा रीतीनें प्रतिभात होतें कीं त्याचें आपणांस विस्मरण होत नाहीं, तर देवाच्या संबंधानेंही तसा प्रकार कां घडूं नये ? सर्व चराचर विश्वामध्यें देव ओतप्रोत भरला आहे. त्याचें गंभीर, शांत, सुंदर व प्रेमळ असें स्वरूप तें विश्व प्रकाशित करीत आहे. त्याचें ज्ञान, सामर्थ्य वगैरे अनंत गुण त्या विश्वाच्या योगें दिसून येत आहेत. एवंच देहाच्या व त्याच्या व्यापारांच्या योगें मनुष्य जसा आपणांस दिसतो व असत्यतेचा अंश नसला ह्मणजे त्याच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान होतें, तद्वतच विश्वाच्या योगें आपणांस देव व देवाचें स्वरूप दिसतें. फरक येवढाच कीं देहाच्या व त्याच्या व्यापारांच्या ठायीं मनुष्यास पहाण्याची संवय आह्मांस जन्मापासून झालेली असते. विश्वाच्या ठायीं देवास पहाण्याची तशा प्रकारची संवय फारच थोडी असते. नाहीं तर, माणसाच्या सान्निध्याप्रमाणें देवाच्या सान्निध्याचा अनुभव स्पष्ट रीतीनें कां होऊं नये, माणसाच्या सान्निध्याचें विस्मरण पडत नसतां देवाच्या सान्निध्याचें विस्मरण पुनः पुनः कां पडावें, याचें दुसरें कांहीं कारण दिसत नाहीं. ह्मणून स्मरणींच देवाची विस्मृति पडूं नये अशी जर आपली इच्छा असली तर, तुकोबांनीं दुसऱ्या एका अभंगांत ह्मटल्याप्रमाणें, अवघें जन ब्रह्मरूप पहाण्याचा, सर्व सृष्टीमध्यें देवाला पहाण्याचा, अधिकाधिक अभ्यास केला पाहिजे. जसजसा अधिकाधिक अभ्यास होईल, व देहाच्या ठायीं ज्याप्रमाणें आपल्या शत्रूस व मित्रास पहातों त्याप्रमाणें विश्वाच्या ठायीं देवास जसजसें अधिकाअधिक पहावयास लागूं, तसतशी स्मरणींच देवाची विस्मृति पडावयाची कमी कमी होत जाईल.

२६. देवाच्या दर्शनाची उत्कंठा.

अल्प माझी मति । ह्मणोनि येतों काकुळती ॥ १ ॥
आतां दाखवा दाखवा । मज पाउलें केशवा ॥ २ ॥
धीर माझ्या मना । नाहीं नाहीं नारायणा ॥ ३ ॥
तुका ह्मणे दया । मज करा अभागिया ॥ ४ ॥

काकुळतीच्या प्रसंगाचा या अभंगामध्यें उल्लेख केला आहे. काकुळतीचे प्रसंग या संसारामध्यें सर्व लोकांस वारंवार येतात. अतिशय, सोसवत नाहीं अशा, वेदना होऊं लागल्या ह्मणजे त्या वेदना ज्याच्या ज्याच्याकडून दूर होतील असें आपणांस वाटतें त्याच्या त्याच्या काकुळतीस आपण अतिदीनपणें येतों. यःकश्चित् जरी आपली कांहीं ऐहिक हानि होण्याचा प्रसंग आला तर ती दूर होण्याविषयीं आपण लोकांची काकळूत करितों. मग अत्यंत इष्ट सुहृत् किंवा कन्यापुत्रकलत्रादि आप्त यांचा वियोग व्हावयाच्या वेळीं तर आपली स्थिति काय होते ती सांगावयास नकोच. आणि मनुष्याची सर्वांत अतिप्रिय वस्तु जो प्राण त्याच्या उत्क्रमणाच्या वेळेस जी काकुळतीची सीमा होते ती विचारावयासच नको. अशा अंतींच्या प्रसंगीं, मोठमोठे भक्त जरी शेवटीं देवाच्या इच्छेस अत्यंत सादर असले, तरी मनांत त्यांस वाटतें कीं मृत्युरूप उदकानें भरलेलें पात्र आपण प्राशन करावें ह्मणून देवानें जें आपल्यापुढें धरलेलें आहे तें या वेळेस जर देव परत घेईल तर बरें होईल व त्याप्रमाणें देवाची प्रार्थनाही ते करितात.

तर अशा प्रकारच्या काकुळतीस या अभंगामध्यें तुकोबा आले आहेत. कां तर, “ अल्प माझी मति. ” मतीचा किंवा बुद्धीचा उपयोग काय, तर इच्छिलेला आपला हेतु किंवा कार्य कोणत्या प्रकारें सिद्धीस जाईल याचा विचार करून उपायांची योजना करावयाची. आतां, मनुष्याची बुद्धि पाहिली तर, एका प्रकारें तिचें सामर्थ्य कांहीं विलक्षण आहे. पशुपक्ष्यादिकांमध्यें आणि मनुष्यांमध्यें जें इतकें मोठें अंतर आहे तें तिच्यामुळें. तिच्या शोधक व कल्पक शक्तीमुळें जे नवीन शोध सध्यांच्या काळांत चालले आहेत व नवीन नवीन योजना एकसारख्या भराभर चालल्या आहेत, त्यांनीं इतर सृष्टीविषयीं जसें अधिकाधिक आश्चर्य वाटतें तसें या बुद्धीविषयींही आश्चर्य वाटतें. परंतु त्या सृष्टीप्रमाणें मनुष्याची बुद्धि हीही देवाचीच कृति होय. व तिच्यांतील विलक्षण सामर्थ्य, तेंही देवाचेंच होय. तें सामर्थ्य मनुष्याच्या थोरवीचा कांहीं प्रताप नव्हे. व इतकी विलक्षण असूनही ती बुद्धि पुष्कळ गोष्टींमध्यें किती अल्प आहे याचे आपणांस वारंवार दाखले येतात. पुष्कळ काळपर्यंत विचार करून, मोठमोठीं गणितें करून, उपायांची योजना आपण करितों; परंतु सृष्टींतील नेहमींच्या एखाद्या अद्भुत शक्तीचा यत्किंचित् अकस्मात् क्षोभ झाला असतां ते सर्व

उपाय एका क्षणामध्यें फसतात. ह्मणून एका लहान उंदरास उद्देशून बोलतांना एका कवीनें म्हटलें आहे सुद्धां कीं, " दीर्घ विचार करून योजिलेले उपाय तुझ्यासारख्या क्षुद्र प्राण्यांचेच फसतात असें नाहीं, 'मी, मी,' ह्मणणाऱ्या मोठ्या मनुष्यप्राण्याचेही असेच वारंवार फसतात." याप्रमाणें पुष्कळ गोष्टींत मनुष्यप्राण्याची व उंदरासारख्या क्षुद्र प्राण्याची अवस्था एकच.

आतां तुकोबांस देवाच्या पाउलांचें दर्शन पाहिजे होतें. मोठी दुःसाध्य गोष्ट ही. याला मुख्य पाहिजे आत्मसंयम. अमुक मार्गानेंच जावयाचें, अमुकच करावयाचें, अमुक मार्गानें जावयाचें नाहीं, अमुक करावयाचें नाहीं, अशा प्रकारें आत्म्याला कायद्यामध्यें ठेविलें पाहिजे. हें करणें फार कठीण आहे. ह्मटलेंच आहे कीं सैन्याच्या योगें मनुष्य सर्व पृथ्वी जिंकू शकेल, परंतु आत्म्यास जिंकणें किंवा दाबांत ठेवणें कठीण. तर वर सांगितल्याप्रमाणें जी मति अचेतन वस्तूंच्या संबंधानेंही अल्प, हा उपाय बरा कीं तो उपाय बरा, या उपायापासून सिद्धि होईल कीं त्या उपायापासून सिद्धि होईल किंवा कोणत्याच उपायानें सिद्धि होणार नाहीं हें जिला अनेक प्रसंगीं कळत नाहीं, तिला आध्यात्मिक गोष्टींमध्यें योग्य काय, अयोग्य काय, कोणत्या उपायांनीं आत्म्याचें संयमन होईल, कोणत्या उपायांनीं होणार नाहीं, हें कसें कळेल ? तुकोबाही ह्मणतात कीं आपली मति अल्प आणि ह्मणूनच दुसऱ्या एके ठिकाणीं " कैसें करूं ध्यान कैसा पाहूं तुज । वर्म दावीं मज याचकासी ॥ " वगैरे उद्गार त्यांनीं काढिले आहेत. तेव्हां मति तर अल्प आणि देवाच्या पायांचें दर्शन तर पाहिजे. ह्मणून ते दोन दोनदां ह्मणतात कीं " आतां दाखवा दाखवा। मज पाउलें हो देवा." " दाखवा, दाखवा " ही द्विरुक्ति, व तशीच पुढील " नाहीं, नाहीं " ही, "आबाधाची" ह्मणजे पीडेची द्योतक आहे. तुकोबांस मनाची पीडा अत्यंत झाली आहे. भुकेनें व्याकुळ होऊन प्राण जाण्याची वेळ आली ह्मणजे मनुष्य जसा काकळुतीस येतो त्याप्रमाणें ते काकुळतीस आले आहेत; आणि ते ह्मणतातच कीं "धीर माझ्या मना । नाहीं नाहीं नारायणा." ते अगदीं उतावीळ झाले आहेत. भुकेनें जर त्यांचा प्राण जात असता तर कांहीं ते इतके उतावीळ झाले नसते, असें त्यांचें बाकीचें चरित्र लक्ष्यांत आणिलें असतां कळून येईल. कारण प्राण गेला असता तर देहाचाच नाश झाला असता; पण देह कांहीं " मी " नव्हे. त्यांनां भीति पडली आहे आत्म्याच्या किंवा खऱ्या नाशाची. ह्मणून, "कोण जाणे आतां जर मला देवाच्या पाउलांचें दर्शन झालें नाहीं तर कधीं तरी होईल कीं काय तें ? कदाचित् आतांच माझें पाऊल थोडेंसें वाईट मार्गीं पडेल व एकदां तसें थोडें जरी पडलें तरी पुढें अधिकाधिक पडत जाईल. मग देवाच्या पाउलांचें दर्शन घेण्याचीही आपली इच्छा कमी कमी होत जाईल; आणि शेवटीं आपला सर्व प्रकारें नाश होईल," अशा प्रकारची दहशत त्यांस पडली असावी. कारण प्रत्येकाच्या अनुभवांतील गोष्ट ही आहे कीं, अत्यंत नीच दशेस पावलेले जे मनुष्यप्राणी ते कांहीं त्या दशेस एकदम जाऊन पोंचलेले नसतात. त्यांच्या अधोगतीचा प्रारंभ क्षुद्र व ध्यानांत न येण्यासारखाच असतो.

या प्रकारची तुकोबांची तांतड. अशा तांतडीची इतर जनांस त्यांच्यापेक्षां अतिशयच आवश्यकता. परंतु इतर जन कसे स्वस्थ आहेत. भुयार दारूनें भरलेलें आहे, आसपास दिवे आहेत, वाऱ्याची जराशी झुळूक लागून केव्हांच त्यांतील एखाद्या दिव्याची ज्योति दारूला लागेल याचा भरंवसा नाहीं, असें असून आपण त्या भुयारावरती कांहीं काळजी न वाळगतां हंसत, खेळत, नाचत राहिलों आहों. आह्मी अशा स्थितींत आहों हेंही आपल्या ध्यानांत येत नाहीं. परंतु विचार केला असतां व कधीं कधीं विशेष प्रसंगीं ही स्थिति आपल्या ध्यानांत येते. अशा वेळेस झालेल्या ज्ञानाचा उपयोग करून आपली दृष्टि जर अधिकाधिक शुद्ध केली तर अधिकाधिक स्पष्ट रीतीनें आमची जी ही अशा प्रकारची स्थिति आहे ती आपल्याला दिसून येईल, व अधिकाधिक तुकोबांप्रमाणें आपण आपल्यास त्या स्थितींतून सोडविण्याविषयीं देवाच्या काकुळतीस येऊं.